इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक - ७८ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

शनिवार,ता.१८ जुलै २०२६ | आषाढ शुक्ल ५ | www.emahasatta.com | E-mail : mahasatta@gmail.com | पाने १२ | किंमत ₹ ५.००

### राज्यात सोमवारी वैद्यकीय सेवा २४ तास बंद

नागपूर,ता.१७-

डोंबिवली येथील महापालिका रुग्णालयात डॉक्टर, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य शाखेने २० जुलै रोजी राज्यव्यापी २४ तासांच्या वैद्यकीय सेवा बंदची घोषणा केली आहे. हा बंद सोमवारी २० जुलै रोजी सकाळी ६ वाजेपासून मंगळवारी २१ जुलै रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत राहणार आहे. आयएमएच्या आवाहनाला ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी या सर्व वैद्यकीय शाखांतील डॉक्टर, परिचारिका संघटना तसेच पॅरामेडिकल कर्मचारी यांनी पाठिंबा दर्शविला आहे. बंद दरम्यान बाह्यरुग्ण विभाग आणि नियोजित शस्त्रक्रिया स्थगित राहतील. मात्र, आपत्कालीन सेवा, अतिदक्षता विभाग, प्रसूती सेवा आणि अन्य जीवनावश्यक उपचार सुरू राहतील.

## एसटी प्रवास महागला

### तिकीट दरात १३.५६ टक्के वाढ

■ मुंबई,ता.१७ -



राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे डिझेलच्या दरात झालेली वाढ, एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध भत्त्यांमध्ये करण्यात आलेली वाढ तसेच वाहनांचे सुटे भाग, टायर आणि देखभाल खर्चात झालेली लक्षणीय वाढ यांचा सर्वंकष विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. या भाडेवाढीमुळे या पुर्वी केलेली साध्या बसेसची १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द होईल.

एसटी महामंडळाच्या आर्थिक शाश्वततेसह प्रवाशांना सुरक्षित, दर्जेदार आणि अखंड सेवा देण्यासाठी ही भाडेवाढ अपरिहार्य होती. वाढत्या खर्चाचा भार सहन करत राज्यातील लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या दैनंदिन कार्यावर आर्थिक ताण (पान २ वर)

## 'नीट'मध्ये मुलींची बाजी

### महाराष्ट्राची श्रावणी कुदळे देशात पाचवी

■ नवी दिल्ली,ता.१७-



श्रावणी कुदळे

वैद्यकीय क्षेत्रातील प्रवेशासाठी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) यंदा विक्रमी वेळेत पूर्ण झाली आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने अधिकृतपणे नीट परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. एकूण २० लाख उमेदवारांपैकी ११ लाख २१ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून यंदाच्या संपूर्ण निकालात मुलींचे वर्चस्व स्पष्टपणे अधोरेखित झाले आहे.

या परीक्षेत पंजाब, हरियाणा, महाराष्ट्रासहित ८ राज्यांतील विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी करून टॉप १७ मध्ये स्थान पटकावले आहे. महाराष्ट्राची श्रावणी कुदळे ही देशात पाचवी आली आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सीने गुरुवारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट यूजी परीक्षा २०२६ चा निकाल अधिकृतपणे घोषित केला आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू व्हावे आणि वैद्यकीय (पान २ वर)

#### ५८ टक्क्याहून अधिक मुली उत्तीर्ण

यंदाच्या निकालाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीय आहे. एकूण पात्र उमेदवारांपैकी ५८ टक्क्यांहून अधिक मुली आहेत.

विशेष म्हणजे, मुलांच्या तुलनेत मुलींचा उत्तीर्ण होण्याचा सरासरी दर अधिक आहे. परीक्षेस बसलेल्या एकूण मुलींपैकी ५६.८ टक्के मुली पात्र ठरल्या आहेत, तर मुलांचे हेच प्रमाण ५५.१ टक्के इतके आहे. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांपैकी बहुतांश विद्यार्थी हे १७ ते १९ वर्षे वयोगटातील आहेत.



## देशातील पहिली हायड्रोजन रेल्वे सुरू

### पंतप्रधान मोदींनी दाखविला हिरवा झेंडा

■ हरियाणा,ता.१७ -

भारतीय रेल्वेने हरियाणातील जींद येथून देशातील पहिल्या हायड्रोजन फ्युएल सेल ट्रेनचे संचालन सुरू केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक ट्रेनला हिरवा झेंडा दाखवून रवाना केले.

ही केवळ नवीन रेल्वे (पान २ वर)

#### हायड्रोजन ट्रेनची वैशिष्ट्ये

देशातील पहिली हायड्रोजन फ्युएल सेल ट्रेन. ट्रेनमध्येच वीज निर्मितीची व्यवस्था. उत्सर्जन म्हणून केवळ पाण्याची वाफ बाहेर पडते. जवळपास शून्य कार्बन उत्सर्जन करणारे तंत्रज्ञान. ही ट्रेन भारतीय रेल्वेच्या हरित आणि शाश्वत वाहतुकीच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल मानले जाते.



### विठुरायाचे चोवीस तास दर्शन सुरू

■ सोलापूर,ता.१७ -

येत्या २५ जुलै रोजी होणाऱ्या आषाढी एकादशी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देश-विदेशातून मोठ्या संख्येने भाविक पंढरपुरात दाखल होत आहेत. या भाविकांना सुलभ आणि अखंड दर्शन मिळावे यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीने चोवीस तास दर्शन व्यवस्था सुरू केली आहे.

मंदिर समितीच्या निर्णयानुसार ३ ऑगस्ट रोजी होणाऱ्या प्रक्षाळ पूजेपर्यंत विठुरायाचे दर्शन अखंड सुरू राहणार आहे. त्यामुळे कमी वेळेत अधिकाधिक भाविकांना श्री विठ्ठलाच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. (पान २ वर)

## दोन गटात तलवार हल्ला; पाच जखमी

### अतिक्रमणाचे कारण; परस्परविरोधी गुन्हे

■ कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

बिंदू चौक परिसरातील अतिक्रमणाच्या वादातून दोन गटांमध्ये तलवारी व कोयत्याने हल्ला झाला. या हाणामारीत दोन्ही गटांतील पाच जण जखमी झाले. शुक्रवारी सायंकाळी बडीमशीद समोर ही घटना घडली. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू असून लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू होते.

शाहरुख उमरखय्याम बारगीर (वय ३०) आणि उमरखय्याम बालेचंद बारगीर (वय ५५, रा.गंजी गल्ली, बिंदू चौक) हे जखमी झाले. तर दुसऱ्या गटातील समशेर सिराज नुराणी (वय ४४), इक्बाल सिराज नुराणी (वय ४२, दोघे रा.बिंदू चौक) आणि



समशेर नुराणी



अक्रम शिकलगार



शाहरूख बारगीर

अक्रम शौकत शिकलगार (वय ४२, रा.बागल चौक) हेही जखमी झाले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बिंदू चौक परिसरातील रस्त्यावरील हातगाड्यांच्या अतिक्रमणाविरोधात नुराणी यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती.त्यानंतर महानगरपालिकेने परिसरातील चिकन,चायनीज आणि इतर हातगाड्यांवरील अतिक्रमण हटविले. या कारवाईनंतर हातगाडी चालक आणि नुराणी यांच्यात वाद सुरू होता. (पान २ वर)

## गोळीबारप्रकरणी दोघे जेरबंद

■ कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

नवीन वाशी नाका परिसरात भरदिवसा खासगी सावकार तसेच पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार सुरज हणमंत साखरे (रा.देवकर पाणंद) याच्यावर झालेल्या गोळीबारप्रकरणी स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने अवघ्या चोवीस तासांत दोन संशयितांना अटक केली.

### सुपारी घेऊन गोळ्या झाडल्याचा संशय

रफीक उर्फ देवा पिरसाहेब मुल्ला (वय ३९,रा.शाहू कॉलनी, विक्रमनगर) आणि शहाबाज राजू मुल्ला (वय २३, रा. मणेरमळा) अशी अटकेतील संशयितांची नावे आहेत.प्राथमिक चौकशीत दोघांनी गोळीबाराची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली असून, हा हल्ला सुपारी घेऊन केला आहे की दुसरे कोणते कारण आहे, याचा तपास पोलीस करत आहेत. १६ जुलै रोजी दुपारी नवीन वाशी नाका ते फुलेवाडी रिंगरोडवरील (पान २ वर)




### जिल्ह्यातील प्रमुख धरणांचा पाणीसाठा

| धरण | क्षमता (टीएमसी) | साठा (टीएमसी) |
|---|---|---|
| कोयना | १०५.२५ | ५३.९१ |
| राधानगरी | ८.३६ | ०५.५२ |
| तुळशी | ३.४७ | ०२.०२ |
| वारणा | ३४.४० | २१.३८ |
| काळम्मावाडी | २५.३९ | ०८.५९ |
| कासारी | २.७७ | १.६० |
| कडवी | २.५२ | १.४९ |
| कुंभी | २.७२ | १.४५ |
| पाटगाव | ३.७२ | १.८७ |
| चिकोत्रा | १.५२ | ०.६२ |
| चित्री | १.८९ | १.१५ |
| जंगमहट्टी | १.२२ | ०.८५ |
| घटप्रभा | १.५६ | १.५६ |
| जांबरे | ०.८२ | ०.८० |
| आंबेआहोळ | १.२४ | ०.९३ |
| सर्फनाला | ०.६७ | ०.६१ |
| धामणी | १.२९ | ०१.२९ |

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १४१००० रु. | २१८००० रु. |

अंडी ७८० रुपये शेकडा

## विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम -सुप्रिया सुळे

■ नवी दिल्ली,ता.१७-



माझा भाऊ आज राहिला नाही.त्यामुळे माझ्या भावाबद्दल आणि झालेल्या चर्चेला आता पूर्णविराम दिला आहे. माझा भाऊ जाऊन पाच महिने झाले आहेत. आम्ही कुटुंब म्हणून कुठेतरी सावरतोय. माझ्या भावाची जी शेवटची इच्छा होती की, दोन्ही पक्ष एकत्र येवून गुण्यागोविंदाने सर्वांनी राज्याची आणि देशाची सेवा करावी. माझ्या भावाची इच्छा पूर्ण करण्याची इच्छा अजितदादा असतानाही होती आणि अजित दादा गेल्यावरही होती. पण आता तशी काही भावना त्या बाजूने येत नाही. त्यामुळे माझ्या मनात आणि आमच्या संघटनेत त्या गोष्टीला आम्ही पूर्णविराम दिला, अशी स्पष्ट प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दिली.

दिल्लीत जंतर-मंतरवर सोनम वांगचूक (पान २ वर)

### गुजरातमध्ये जैशच्या पाच दहशतवाद्यांना अटक

■ अहमदाबाद,ता.१७-

गुजरात पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) मोठी कारवाई करत प्रतिबंधित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित ५ संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. गुजरातमधील विविध जिल्ह्यांमध्ये ही कारवाई करण्यात आली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची ओळख बिलाल आबिद शेरा, मोहम्मद अयूब कडीवाल उर्फ मोहम्मद खडियासन, मोहम्मद शफी मुखी उर्फ शफी चापी, मोहम्मद हसन क. राडिया उर्फ हसन हैदरपुरी आणि मोहम्मद अयूब सुमासरा उर्फ मोहम्मद खली अशी करण्यात (पान २ वर)

## मान्सून पुन्हा सक्रिय

■ मुंबई,ता.१७ -

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या मान्सूनने पुन्हा एकदा राज्यात जोर पकडण्यास सुरुवात केली आहे. हवेत वाढलेले बाष्प आणि बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली अनुकूल हवामान परिस्थिती यामुळे आगामी काळात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता हवामान विभागाकडून व्यक्त करण्यात आली आहे.



अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने समुद्रात वादळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, दक्षिणेकडील वाऱ्यांचा वेग वाढला आहे. समुद्रात ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहत असून उंच लाटा उसळत आहेत. त्यामुळे पावसासाठी पोषक वातावरण तयार झाले आहे.

२० जुलैनंतर राज्यात मुसळधार पावसाला सुरूवात होईल, असा अंदाज आहे. मात्र, त्यापूर्वीच पाऊस हजेरी लावताना दिसत आहे. राज्यात पुढील दोन ते तीन दिवसात समाधानकारक पाऊस होईल, असा अंदाज आहे. मात्र, शेतकरी राजा चिंतेत असल्याचे दिसून येत आहे. पुढील दोन ते तीन दिवसात पाऊस न झाल्यास दुबार पेरणीचे मोठे संकट हे शेतकऱ्यांवर असणार आहे. जूनमध्ये पावसाने ओढ दिली असताना, जुलैच्या पंधरवड्यातही राज्यातील बहुतांश भागात समाधानकारक पावसाची नोंद झालेली नाही.

मध्य महाराष्ट्रातील काही भागात, तर मराठवाडा आणि विदर्भातील बहुतांश भागात जुलैमधील सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली असून तेथे पावसाची तूट कायम आहे. त्यामुळे निम्मा महाराष्ट्र दुष्काळसदृश स्थितीच्या सावटाखाली असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. पुढील तीन दिवस राज्यातील (पान २ वर)

### हास्यतुषार



महासत्ता



(पान १ वरून)

## मान्सून पुन्हा सक्रिय

काही भागात वादळी पावसाचा अंदाज असला तरीही सर्वदूर पावसाची शक्यता कमी आहे. मोसमी पावसाला बळ देणाऱ्या हवामान प्रणाली सक्रिय झाल्यास पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. पुढील तीन दिवस विदर्भातील बहुतांश भागात वादळी पावसाचा 'यलो अलर्ट', तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागात हलक्या सरींचा अंदाज आहे. दरम्यान मुंबईत शुक्रवारी उपनगरांसह मध्य मुंबईत पावसाच्या हलक्या सरी कोसळल्या. पहाटे आणि दुपारच्या वेळेत पावसाची हजेरी लागली असली तरी वातावरणातील बदलामुळे उकाडा मात्र कायम असल्याचे चित्र आहे. कोल्हापूर जिल्ह्यात आठ दिवसांच्या विश्रांतीनंतर पुन्हा रिमझिम पावसाला सुरुवात झाली आहे. घाटमाथ्यावर पावसाचा जोर वाढला असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. मात्र धरणांमधील पाणीसाठा अद्याप अपेक्षेइतका वाढलेला नसल्याने दमदार पावसाची प्रतीक्षा कायम आहे.

## हायड्रोजन रेल्वे सुरू

सेवा नसून भारतीय रेल्वेच्या ऊर्जा परिवर्तनातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. डिझेलवर आधारित वाहतुकीपासून पुढे जात भारतीय रेल्वे स्वच्छ, टिकाऊ आणि भविष्यातील ऊर्जा तंत्रज्ञानाचा स्वीकार करत आहे. जींद-सोनीपत मार्गावर धावणाऱ्या या देशातील पहिल्या हायड्रोजन ट्रेनमध्ये १० डबे असतील. या ट्रेनमधून एकावेळी सुमारे २६०० प्रवाशांची वाहतूक करण्याची क्षमता आहे.जर्मनी हे व्यावसायिक हायड्रोजन प्रवासी ट्रेन सुरू करणारे पहिले देश ठरले आहे. तर फ्रान्स, इटली, चीन आणि जपान यांसारखे देश प्रायोगिक प्रकल्प किंवा मर्यादित स्तरावरील संचालनावर काम करत आहेत. मात्र, या देशांतील हायड्रोजन ट्रेनमध्ये साधारणपणे दोन ते चार डबे असतात. या हायड्रोजन ट्रेनमध्ये प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी अनेक आधुनिक प्रणाली बसवण्यात आल्या आहेत.

## एसटी प्रवास महागला

निर्माण होत असल्याने, सेवा सुरळीत ठेवण्यासाठी भाडेवाढीचा निर्णय आवश्यक ठरला आहे. ही भाडेवाढ एसटीची सेवा अधिक सक्षम आणि टिकाऊ बनविण्यासाठी करण्यात आली असून, प्रवाशांच्या सुरक्षित व विश्वासार्ह प्रवासासाठी आवश्यक सुविधा आणि गुणवत्तापूर्ण सेवा कायम राखण्यास त्यामुळे मदत होणार आहे.राज्य परिवहन प्राधिकरणाने एसटी महामंडळाच्या १३.५६ टक्के भाडेवाढीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे. ही भाडेवाढ करताना प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडेल, याची काळजी घेण्यात आली आहे. राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित, दर्जेदार आणि अखंडित सेवा देण्यासाठी तसेच एसटी महामंडळ आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा आहे.असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. एसटी महामंडळाने प्रवासी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतल्यानं प्रवाशांना अधिक प्रवास खर्चासाठी अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. महागाईचा सामना करणाऱ्या प्रवाशांना दरवाढीची झळ पोहोचणार आहे.

## विठुरायाचे २४ तास दर्शन

मंदिरात श्री विठ्ठलाच्या मूर्तीच्या पाठीशी लोड, तर श्री रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या देण्यात आला आहे. यामुळे आजपासून श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे २४ तास मुखदर्शन, तर २२ तास १५ मिनिटे पदस्पर्श दर्शन सुरू राहणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.



## माऊलींचा पालखी सोहळा फलटण येथे विसावला

■ फलटण,ता.१७(वार्ताहर)-

**संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा लाखो वैष्णवासह ज्ञानेश्वर माऊली तुकाराम व टाळ मृदंगाच्या गजरात आज फलटण येथे विसावला.**

आषाढी एकादशीच्या यात्रेनिमित्त आळंदीहून पंढरपूरकडे निघालेला श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांचा पायी पालखी सोहळा लाखो वैष्णवासह आज सकाळी फलटण तालुक्यातील तरडगाव येथील मुक्काम संपवून फलटणकडे रवाना झाला. सुरवडी निंभोरे येथील दुपारच्या न्याहारीच्या विसाव्या नंतर फलटण येथे सायंकाळी पोहचला.फलटणच्या शहरात प्रवेश करताना माजी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर, आमदार सचिन पाटील, नगराध्यक्ष समशेरसिंह नाईक-निंबाळकर,उपनगराध्यक्षा सौ. प्रियदर्शनी भोसले, मुख्याधिकारी निखिल जाधव व नगरसेवकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. पालखी सोहळा मलठण सद्गुरू हरिबाबा मंदिर येथून श्रीराम मंदिर येथे आल्यावर नाईक-निंबाळकर देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्रीमंत संजीवराजे नाईक-निंबाळकर व परिवारातील सदस्यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. तसेच पालखी सोहळा महात्मा फुले चौक व गिरवी नाका मार्गे विमानतळ येथील पालखीतळावर आल्यानंतर समाज आरती झाल्यावर पालखी सोहळा विसावला. उद्या शनिवारी सकाळी सहा वाजता पालखी सोहळा फलटण येथून पंढरपूरकडे बरड मुक्कामासाठी रवाना होईल.

## दुचाकीची ट्रकला धडक ; दोघे जखमी

सरूड,ता.१७ (प्रतिनिधी)-

कोल्हापूर-रत्नागिरी महामार्गावरील निळे (ता. शाहूवाडी) गावच्या हद्दीत मोटारसायकलस्वाराचा वाहनावरील ताबा सुटल्याने मोटारसायकलने समोर असलेल्या मालवाहतूक ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात दोन युवक गंभीर जखमी झाले असून, घटनेची नोंद शाहूवाडी पोलिसात दाखल आहे.साहिल पाटील आवतूर (वय २२) व रुपेश पाटील (वय १७) हे दोघे मोटारसायकलवरून प्रवास करत असताना निळे गावच्या हद्दीत मोटारसायकलवरील ताबा सुटला. त्यामुळे मोटारसायकलने पुढे जात असलेल्या मालवाहतूक ट्रकला पाठीमागून धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले.

# वांगचुक यांच्या आंदोलनाचा मुद्दा अधिवेशनात मांडणार

### सुप्रिया सुळेची उपोषणस्थळी भेट

■ नवी दिल्ली,ता.१७-

**दिल्लीत जंतरमंतर मैदानात सोनम वांगचुक यांचे उपोषण सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आंदोलनाला भेट दिली. वांगचुक यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी त्या मैदानावर गेल्या. तिथे त्यांनी सोनम वांगचुक यांची विचारपूस केली.**

यावेळी त्यांनी युवकांना संबोधित केले. सोनम वांगचुक यांची विचारपूस केल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाचा मुद्दा आपण संसद अधिवेशनात मांडू, असे सुप्रिया सुळे यांनी सांगितले.

राज्यात आंदोलन चालले असेल तर ती आमची नैतिक जबाबदारी आहे की, समाजात ज्या गोष्टी सुरु आहेत त्या सरकार दरबारी




पोहोचवल्या पाहिजेत. समाजातील पालकांमध्ये, युवा पिढीत एक भावना आहे, इथे आंदोलन सुरु आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा, या मागणीसाठी आंदोलन चालू आहे. आम्ही जे लोकप्रतिनिधी आहोत, आमची नैतिक जबाबदारी असते की, समाजात ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या संसदेत मांडल्याच पाहिजेत. संसद सुरु होण्याआधी दोन ठिकाणी मी या विषयावर बोलणार आहे. एकतर रविवारी सकाळी सर्वपक्षीय बैठकीत बोलणार आहे. केंद्र सरकारने ही रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत मी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय, भारतात कमी झालेला पाऊस, त्याचबरोबर शिक्षणात झालेला सावळा गोंधळ, राम मंदिरचे जे व्हिडीओज येत आहेत, असे अनेक गंभीर विषय देशासमोर आहेत. सर्वपक्षीय बैठकीत हे सर्व विषय आम्ही महाविकास आघाडी आणि इंडी आघाडीसोबत बोलून मांडणार आहोत, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

## निपाणी परिसरात वरुणराजाची कृपादृष्टी; बळीराजाला दिलासा

■ निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)-

**गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे चिंतेत सापडलेल्या बळीराजाला अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. शुक्रवारी सकाळपासून परिसरात वरुणराजाने जोरदार हजेरी लावली असून, या कृपादृष्टीमुळे सुकणाऱ्या पिकांना नवजीवन मिळाले आहे.**

यंदा मान्सून वेळेवर दाखल झाला नाही त्यामुळे खरीप पेरणीचा हंगाम लांबणीवर पडला.जून महिन्यातील पहिल्या पावसानंतर हवामानातील बदलांमुळे पावसाने मोठा खंड पडला होता.यामुळे शेतातील पिके कोमेजू लागली होती. काही भागांत दुबार पेरणीचे संकट ओढवले होते.मात्र, शुक्रवारी झालेल्या दमदार पावसामुळे जमिनीला चांगली ओल मिळाली आहे.सोयाबीन आणि भुईमूग या प्रमुख पिकांसाठी हा पाऊस अत्यंत फायदेशीर ठरला आहे.पावसाअभावी शेतकरी चिंतेत असतानाच, या पावसाने पिकांना जणू संजीवनीच दिली आहे.हा पाऊस अगदी मोक्याच्या वेळी झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान टळले असून पिकांची वाढ आता जोमदार होण्यासाठी मदत होणार आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवस असाच पाऊस सक्रिय राहण्याचा अंदाज वर्तवल्यामुळे बळीराजाची चिंता आता संपली असून, शेतीकामांना वेग आला आहे.

## विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम

(पान १ वरून)

यांची भेट घेण्यासाठी त्या गेल्या होत्या. त्यावेळी माध्यमांशी बोलताना त्यांनी विलीनीकरणाबाबत भाष्य केले. दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाची चर्चा सध्या सुरु आहे. विलीनीकरणाच्या चर्चेला आधी नकार देणाऱ्या अजित पवार गटाचे खासदार सुनील तटकरेंनी यु टर्न घेत दिवंगत अजित पवार हयात असताना या चर्चा झाल्याचे आता मान्य केले आहे. याविषयी राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रतिक्रिया दिली. दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणाच्या चर्चांना पूर्णविराम दिल्याचे त्यांनी सांगितले.

त्यांनी पुढे सांगितलं की, जेव्हा आमच्यातील नेते गेले आणि समोरच्याने सांगितले की अशी घटना झालीच नाही, तेव्हा आम्हाला प्रचंड दु:ख झालं आणि वेदना झाल्या.

एकतर माझा भाऊ गेला होता आणि माझ्या भावाची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी आमचे सगळे प्रयत्न होते. कारण तो प्रस्ताव माझ्या भावाचा होता. त्यामुळे आमच्याकडून तो विषय आम्ही त्या दिवशीच संपवला. आम्ही स्वाभिमानी लोक आहोत. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, ज्यादिवशी माझा भाऊ गेला आणि समोरच्यांच्या स्टेटमेंटवरुन माझ्या लक्षात आले की दादांची इच्छा पूर्ण करण्यात रस नाही. तेव्हा मी पूर्णविराम दिला आणि त्यानंतर आम्ही राज्याच्या आणि देशाच्या सेवेला लागलो आहोत.

## बावचीतील कोयता हल्ला प्रकरणी आरोपीला दहा वर्षांचा कारावास

■ ईश्वरपूर,ता.१७ प्रतिनिधी)-

**बावची (ता.वाळवा) येथील कोयता हल्ला प्रकरणातील आरोपी सागर मोहन अनुसे (वय २०) याला जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरवत १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच जखमी फिर्यादी नितीन नामदेव भिसे यांना नुकसानभरपाई म्हणून ५ हजार रुपये देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.**



सागर अनुसे

या प्रकरणात १ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास बावची येथील अंबिका मंदिराजवळ पूर्वीच्या भांडणाच्या कारणावरून आरोपी सागर अनुसे याने फिर्यादी नितीन भिसे यांच्यावर लोखंडी कोयत्याने जीवघेणा हल्ला केला होता. या हल्ल्यात भिसे यांच्या उजव्या हाताच्या बोटांवर, डाव्या हाताच्या मनगटाजवळ तसेच डोक्यावर गंभीर वार करण्यात आले. हल्ल्यावेळी आरोपीने फिर्यादीला जीवे मारण्याची धमकीही दिली होती.

या घटनेनंतर आष्टा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक दीपक सदामते यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. अतिरिक्त सत्र न्यायाधीश देविदास एच. केळुस्कर यांनी उपलब्ध पुरावे व साक्षींच्या आधारे आरोपीला दोषी ठरवत १० वर्षे सश्रम कारावास व दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी, पंच साक्षीदार तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. केदार गोरड यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड.एस.डी.केंकणीस यांनी काम पाहिले. खटल्याच्या पैरवीसाठी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक शरद जाधव, पोहेकॉ.उत्तम शिंदे तसेच आष्टा पोलीस ठाण्यातील पैरवी पथकातील चंद्रशेखर बकरे व मेघा खांबे यांनी सरकार पक्षास सहकार्य केले.

## ट्रकच्या धडकेत महिला जागीच ठार

■ हेरले,ता.१७(प्रतिनिधी) -

**पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर टोप हद्दीतील श्रीराम टायरच्या समोर आज सायंकाळी साडेपाच सुमारास भरधाव अज्ञात ट्रकने धडक दिल्याने महिला जागीच ठार झाल्याची घटना घडली आहे.**



मिळालेली माहिती अशी की, सुरेश दादू वाघमारे व त्यांची पत्नी अनिता सुरेश वाघमारे (रा.कोडोली, ता.पन्हाळा, मूळ रा.शिरगाव जि. सांगली), हे दोघे पती पत्नी गडमुडशिंगी येथे अनिताच्या भावाकडे आपल्या मोटारसायकलने गेले होते. तेथे त्यांना भेटून ते कोडोलीला आपल्या घरी परत चालले होते. त्यांची मोटारसायकल पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावर टोप हद्दीतील श्रीराम टायरच्या समोर आली असता पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने दुचाकीला जोराची धडक दिली. या धडकेत सुरेश हे हायवेच्या बाजुला फेकले. तर त्यांची पत्नी अनिता या महामार्गावर पडल्यानंतर त्यांच्या अंगावरून ट्रकची चाके गेल्याने त्यांच्या शरीराचा अक्षरशः चेंदामेंदा झाल्याने अनिता सुरेश वाघमारे त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रक चालकाने धडक देताच न थांबता धूम ठोकली.

घटनास्थळावर दृश्य अंगावर शहाराआणणारे होते. शिरोली एमआयडीसी पोलीसात याची नोंद झाली. जिल्हा महामार्ग वाहतुक कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक राणी पाटील यांनी अपघातस्थळी भेट देऊन पाहणी केली.रस्ता अरुंद असल्याने हा अपघात झाल्याने त्यांनी तात्काळ महामार्ग अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलवून चांगलेच सुनावले. या ठिकाणचा रस्ता तात्काळ रुंद करून देण्याची सूचना केली.

## मुसळधार पावसामुळे चीनमध्ये भूस्खलन

■ बीजिंग,ता.१७-

**चीनच्या नैऋत्येकडील चोंगकिंग शहरात भूस्खलनामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. चीनच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, या भूस्खलनात अनेक निवासी इमारती माती व दगडांच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या असून १,१०० हून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे.**

सरकारी प्रसारमाध्यमांने सांगितले की, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या सुमारे १० जणांचीही यशस्वीरित्या सुटका करण्यात आली आहे. दरम्यान, चोंगकिंगमध्ये शोध आणि बचावकार्य अद्याप सुरू आहे. या भूस्खलनात अनेक वीजखांब गाडले गेल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला.

माहितीनुसार, हे भूस्खलन शुक्रवारी सकाळी नऊ वाजता चोंगकिंगमधील पेंगशुई काउंटी येथे झाले. मोठ्या प्रमाणात दगड आणि माती डोंगरउतारावरून खाली कोसळल्याने १० हून अधिक निवासी इमारती ढिगाऱ्याखाली दबल्या गेल्या.

## 'नीट'मध्ये मुलींची बाजी

(पान १ वरून)

महाविद्यालयांमधील प्रवेश तसेच समुपदेशन प्रक्रिया विनाअडथळा पार पडावी, यासाठी एनटीएने अत्यंत जलद गतीने काम करत नियोजित वेळेत हा निकाल जाहीर केला आहे. या वर्षी २१ जून २०२६ रोजी देशातील ५५१ शहरांमध्ये आणि भारताबाहेरील १४ प्रमुख शहरांमधील एकूण ५,४४० परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडली होती. या परीक्षेसाठी जवळपास २० लाख विद्यार्थ्यांनी हजेरी लावली होती. जाहीर झालेल्या निकालानुसार, यापैकी ११ लाख २१ हजार उमेदवार उत्तीर्ण झाले असून ते देशातील विविध वैद्यकीय, दंतवैद्यकीय, आयुष आणि इतर संलग्न पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत.

सर्व उमेदवारांना त्यांचे स्कोअरकार्ड एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर पाहता येणार आहे. देशातील गुणवत्तेचा विचार केला तर पंजाबचा आर्यन गुप्ता आणि हरियाणाचा पानशुल बन्सल यांनी ७२० पैकी ७१५ गुण मिळवून देशात संयुक्तपणे प्रथम क्रमांक पटकावला आहे. टॉप रँकर्सचा विचार केल्यास, ७०५ पेक्षा जास्त गुण मिळवणारे देशातील आघाडीचे १७ रँकर्स हे महाराष्ट्र, पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, तामिळनाडू आणि तेलंगणा या ८ वेगवेगळ्या राज्यांमधून आले आहेत. ७२० पैकी ६९० पेक्षा जास्त गुण मिळवणारे १३८ विद्यार्थी देशातील ६६ शहरांमध्ये पसरलेले आहेत, ज्यामध्ये तब्बल ९३ टक्के विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळवले आहे. याशिवाय लडाखमध्ये जिग्मेत यांगचन लामो (५३० गुण), अंदमान आणि निकोबार द्विप समूहातून ध्रुव त्रिपाठी (६०६ गुण), लक्षद्वीपमधून फहमिदा अनीस (५७३ गुण) गुण मिळवले आहेत. यात ईशान्य राज्यातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. १७ राज्यातील टॉपर्सने ७०० हून अधिक गुण मिळवले आहेत. तर २६ टॉपर्सने ६९० हून अधिक गुण मिळवले आहेत.

## दोन गटात तलवार हल्ला; पाच जखमी

(पान १ वरून)

शुक्रवारी सायंकाळी याच कारणावरून समशेर नुराणी, उमरखय्याम बारगीर आणि इतर काही जणांमध्ये वाद झाला. शाब्दिक बाचाबाचीनंतर दोन्ही गटांनी तलवारी व कोयत्याने एकमेकांवर हल्ला केला. या घटनेमुळे परिसरात काही काळ धावपळ उडाली. जखमींना तातडीने सीपीआर रुग्णालयात दाखल करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच जुना राजवाडा पोलीस ठाण्याचे निरीक्षक किरण लोंढे आणि लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक विठ्ठल जाधव पोलिसांसह घटनास्थळी पोहोचले. त्यांनी जमाव पांगवून परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान, दोन्ही गटांचे नातेवाईक मोठ्या संख्येने सीपीआर रुग्णालयात जमा झाले होते. त्यामुळे तेथेही पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. या प्रकरणी लक्ष्मीपुरी पोलीस ठाण्यात दोन्ही गटांकडून परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## गुजरातमध्ये जैशच्या पाच दहशतवाद्यांना अटक

(पान १ वरून)

आली आहे. गुजरात एटीएसकडून प्राप्त माहितीनुसार, हे संशयित पाकिस्तानस्थित दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित असल्याचा संशय आहे. त्यांचा संबंध यापूर्वी देशातील विविध भागांतून अटक करण्यात आलेल्या ८ दहशतवाद्यांशी असल्याचे सांगण्यात येत आहे.अटक करण्यात आलेले दहशतवादी जैश-ए-मोहम्मद गुजरातमध्ये स्लीपर सेल तयार करण्याचा प्रयत्न करत असल्याचा संशय आहे. विशेषतः उत्तर गुजरातमधील काही व्यक्तींना संघटनेशी जोडून दहशतवादी कारवायांसाठी जाळे निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे तपासात समोर आले आहे.गुजरात एटीएसचे पोलीस उपअधीक्षक हर्ष उपाध्याय यांनी सांगितले की, यापूर्वी अटक करण्यात आलेल्या आठ संशयितांच्या संपर्कात असलेल्या या ५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून संशयितांच्या हालचाली आणि संपर्कांची चौकशी करण्यात येत आहे.

## गोळीबारप्रकरणी दोघे जेरबंद

**सुपारीचा संशय; सूत्रधाराचा शोध सुरू**

गोळीबाराची कबुली संशयितांनी दिली असली तरी हा हल्ला सुपारी घेऊन करण्यात आला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. त्यामुळे हल्ल्यामागील मुख्य सूत्रधार कोण, सुपारी कोणी दिली आणि त्यासाठी आर्थिक व्यवहार झाला का, याचा तपास आता एलसीबीकडून सुरू आहे.

(पान १ वरून)

स्टार लोकल मार्टजवळ दुचाकीवरून आलेल्या दोघांनी सुरज साखरेवर जवळून गोळीबार केला होता. या हल्ल्यात साखरे गंभीर जखमी झाला. घटनेनंतर करवीर पोलीस ठाण्यात अज्ञात हल्लेखोरांविरुद्ध खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपींचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार दोन स्वतंत्र पथके तयार करून तपास सुरू करण्यात आला. पोलिसांनी घटनास्थळ व परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. तसेच हॉटेल, लॉज आणि परिसरातील संशयित हालचालींची पडताळणी करण्यात आली. तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने संशयितांची ओळख पटविण्यात आली.

दरम्यान, एलसीबीचे पोलीस अंमलदार वैभव पाटील यांना दोन्ही संशयित कर्नाटकातून परत येऊन जयसिंगपूरजवळील अंकली पुल परिसरात येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान सुरुवातीला त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, कसून चौकशीनंतर सुरज साखरेला ठार मारण्याच्या उद्देशाने गोळीबार केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

या गुन्ह्यामागे सुपारीचे कारण असल्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत असून, हल्ल्याचा सूत्रधार कोण, सुपारी कोणी दिली आणि त्यामागील नेमका हेतू काय, याचा तपास सुरू आहे.

पुढील तपास पोलीस अधीक्षकांनी एलसीबीचे निरीक्षक सुशांत चव्हाण यांच्याकडे सोपविला आहे. कारवाईत पो. उपनिरीक्षक जालिंदर जाधव, कॉन्स्टेबल वैभव पाटील, संतोष बरगे, गजानन गुरव, महेंद्र कोरवी, सत्यजित तानुगडे, शिवानंद मठपती, परशुराम गुजरे आणि सागर चौगले यांनी सहभाग घेतला.

### ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥



**श्री. कल्लाप्पाण्णा भरमू आरगे**

आमचे परममित्र श्री. कल्लाप्पाण्णा भरमू आरगे यांचे गुरुवार, दि. १६/०७/२६ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हिच ईश्वरचरणी प्रार्थना!

बाळासाहेब रुईकर (आण्णा)
लक्ष्मण घंटा * गोविंद टिळंगे
शंकर लाखे * अरुण केटकाळे
जगन्नाथ बजाज * जयकुमार खटावणे
भगत सिंह हास्य. योग ज्येष्ठ मंडळ, इचलकरंजी.

### ॥ शोकसंदेश ॥



**श्री. रामावतार मांगीलाजी जाजू**

अत्यंत दु:ख के साथ सूचित करना पड़ रहा है कि, हमारे परिवार के पूज्यनीय श्रेष्ठ श्री. रामावतार मांगीलाजी जाजू का परम धाम गमन दिनांक १७/०७/२०२६ शुक्रवार को हो गया है। विधी के विधान के आगे हम सब नतमस्तक है।

* शोकाकुल *

**पुत्र - रमेशकुमार, कृष्णाकुमार**
**भतीजे - ओमनारायण, राजेंद्र विष्णु**
**पौत्र - महेश, अखिलेश, संकेत, गोविन्द, नवनीत, राघव, मयंक**
**पड़पौत्र - विख्यात, सक्षम**
**ससुराल पक्ष - गुरुदत्तजी शरदजी लड्डा, जयपूर एवं समस्त जाजू परिवार कुराडा, इचलकरंजी.**

* अंतिम यात्रा - शनिवार, दि. १८/०७/२०२६ रोजी सुबह ११.०० बजे हमारे निवास स्थान से निकलेगी।
* निवास स्थान - श्री राम कुंज, हत्ती चौक, पंचरत्न बिल्डींग के पास, इचलकरंजी.



## सम्राट अशोकनगर परिसरातील नळांना आळ्यायुक्त दुषित पाणी

इचलकरंजी, ता. १७ –

**येथील सम्राट अशोकनगर परिसरात नळांना आळ्यायुक्त दुषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत वारंवार कळवुनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे संतप्त नागरीकांनी महापालिकेत जलअभियंत्यांची भेट घेऊन जलवाहिनी त्वरीत दुरुस्ती करुन शुध्द पाणी पुरवठा न केल्यास अधिकाऱ्यांना दुषित पाणी पाजण्याचा इशारा दिला.**

येथील सम्राट अशोकनगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून नळांना आळ्यायुक्त दुषित पाणी पुरवठा होत असल्याने नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. याबाबत प्रशासनाला वारंवार कळवुनही दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे दुषित, आळ्यायुक्त पाण्याच्या बाटल्या घेऊन सदा मलाबादे, जॉन लुद्रीक, रोहन लुद्रिक यांच्यासह नागरीकांनी महापालिकेत धाव घेतली. यावेळी घोषणाबाजी करत प्रशासनाचे लक्ष वेधले. जलअभियंता अभय शिरोलीकर यांची भेट घेऊन जलवाहिनी दुरुस्तीची मागणी केली. तसेच त्वरीत दुरुस्ती करुन शुध्द पाणी पुरवठा न केल्यास अधिकाऱ्यांना दुषित पाणी पाजण्याचा इशारा दिला. त्यामुळे शिरोलीकर यांनी अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष पाहणी करुन त्वरीत जलवाहिनी दुरुस्तीचे आदेश दिले.

## दुचाकीची समोरासमोर धडक; माय-लेकीसह दोघे गंभीर जखमी

मिरज,ता.१७ (प्रतिनिधी)–

**मिरज येथील कोल्हापूर –मिरज रोडला जोडणाऱ्या उत्तमनगर रेल्वे उड्डाणपुलावर दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात दुचाकीवरील माय–लेकी गंभीर जखमी झाल्या असून, संबंधित दुचाकी चालकाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.**

मोहसीन अबुबकर मोमीन (वय ३३, रा. मोमीन गल्ली, मिरज) या आपल्या आई रिजवाना अबुबकर मोमीन यांच्यासह बजाज ॲव्हेंजर ( एमएच १० ईवाय २४०४) या दुचाकीवरून जात होत्या. मंगळवारी रात्री सुमारे ११.१५ वाजण्याच्या सुमारास उत्तमनगर रेल्वे उड्डाणपुलावर समोरून येणाऱ्या आयशर कंपनीच्या दुचाकीने (डीडी ०३ पी १२८६) त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली.अपघातात मोहसीन मोमीन यांच्या दोन्ही हातांना व डाव्या पायाला गंभीर दुखापत झाली, तर रिजवाना मोमीन यांच्या डोक्याला, चेहऱ्याला आणि उजव्या खांद्याला गंभीर मार लागला. दोन्ही दुचाकींचेही मोठे नुकसान झाले आहे. वाहन चालक जावेद सिकंदर शेख (वय ३६, रा. हतीद, ता. सांगोला) याने निष्काळजी व भरधाव वाहन चालवून अपघात घडवल्याप्रकरणी महात्मा गांधी चौक पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

# हॉकी मैदान शेजारील गटारीत प्लास्टिक कचरा

## डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने आरोग्य धोक्यात

इचलकरंजी, ता.१७–

**पावसाळ्याच्या पार्श्वभूमी शहरातील सारंग गटारांची साफसफाई केली असल्याचा दावा महानगरपालिका प्रशासन करत असले तरी आणि ठिकठिकाणी गटारीचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात साचत असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे दिसून येत आहे. येथील हॉकी मैदान शेजारील मोठ्या सारण गटारीमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचल्याने गेले काही दिवसापासून सदरची गटार तुंबून राहिली आहे. तेव्हा महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने तातडीने गटारीची स्वच्छता करावी, अशी मागणी होत आहे.**



हॉकी मैदानालगतच्या सारण गटारीत तुंबलेला प्लास्टिक कचरा. (छाया : मयूर चिंदे)

महानगरपालिकेच्या कामकाजाचा कायम चर्चेचा विषय असतो. पावसाच्या तोंडावर पूरग्रस्त भागात तसेच शहरातील अनेक भागातील सारण गटारी स्वच्छ करण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. मात्र, बऱ्याच ठिकाणी थोडा जरी पाऊस पडल्यास गटारी तुंबून त्याचे सांडपाणी रस्त्यावर पसरत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी अद्याप पाहायला मिळते. त्यामुळे स्वच्छतेचे काम कशाप्रकारे केले जाते, याची चर्चा रंगू लागली आहे. येथील रिंग रोडवरील हॉकी मैदान शेजारी असलेल्या मोठ्या गटारीमध्ये गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा साचला आहे.

तो वेळेवर काढला जात नसल्याने दुर्गंधी पसरून डासांचे प्रमाण वाढत चालले आहे. तेव्हा तातडीने या गटारीची स्वच्छता करावी,अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. त्याचबरोबर शहरातील अनेक सखल भागामध्ये गटारीचे पाणी मोठ्या प्रमाणात साचत असल्याने त्या गटारींचीही स्वच्छता कायमपणे राबवावी त्यासाठी खास पथक तयार करण्यात यावे,अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.



बंदमुळे आळते गावातील बाजार पेठेत पसरलेला शुकशुकाट.

## आळते कडकडीत बंद; वांगचूक यांच्या उपोषणाला पाठिंबा

हातकणंगले ता. १७ (प्रतिनिधी)–

**लडाखचे पर्यावरण, घटनात्मक अधिकार आणि देशातील शिक्षण व्यवस्थेतील गैरव्यवहारांविरोधात दिल्ली येथे चालू असलेल्या उपोषणाच्या समर्थनाथ व सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना हातकणंगले तालुक्यातील आळते गावाने कडकडीत बंद पाळून अभूतपूर्व पाठिंबा दिला आहे. व्यापारी, व्यावसायिक व नागरिकांनी स्वत:हून दुकाने बंद ठेवून या आंदोलनात सहभागी झाल्याचे पहायला मिळाले.**

अनेक दुकाने, व्यावसायिक आस्थापने आणि इतर व्यवहार दिवसभर बंद ठेवण्यात आले.बंददरम्यान गावात शांततेचे वातावरण होते.दरम्यान, केंद्र शासनाने वांगचूक यांच्या उपोषणाची अद्यापही गांभीर्याने दखल घेतलेली नाही तर दुसरीकडे वांगचूक यांच्या उपोषणाला पाठिंबा वाढताना दिसत असून उपोषणाच्या समर्थनार्थ गांवे देखील उत्स्फूर्तपणे बंद ठेवण्यात येत आहेत.आळते बंदसाठी ग्रा.पं.सदस्य जावेद मुजावर, सुरेश आळतेकर, शिरीष थोरात, सागर आळतेकर, राम कांबळे, सुहास कांबळे, गौतम दिवाण यांनी आवाहन केले होते.

## इचलकरंजीच्या एसटीचा बर्निंग थरार

### पांढरी पिंपळगाव येथील घटना : प्रवाशी सुखरुप

इचलकरंजी,ता.१७ –

**संभाजीनगरहून इचलकरंजीच्या दिशेने येत असलेल्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एस.टी.ला लागलेल्या आगीची माहिती पाठीमागून येत असलेल्या कारचालकाच्या प्रसंगावधानामुळे वेळीच मिळाल्याने तसेच चालक आणि वाहकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला. एस.टी.मधील सर्व ३८ प्रवाशी सुखरुपपणे बचावले. ही घटना सकाळी ८.३० वाजता पांढरी पिंपळगाव याठिकाणी घडली.**



याबाबत समजलेली माहिती अशी, इचलकरंजी आगारातून संभाजीनगरसाठी सकाळी आणि सायंकाळी अशा दोन सत्रात दोन एस.टी. सोडल्या जातात. त्यानुसार शुक्रवारी सकाळी ७.३० वाजता इचलकरंजी आगाराकडील एस.टी. (एमएच ०९ एफएल ८१३४) संभाजीनगर येथून निघाली. ही एस.टी. पांढरी पिंपळगाव याठिकाणी आली असताना एस.टी.मधून धूर येत असल्याचे या एस.टी.च्या पाठीमागून येणाऱ्या एका कारचालकाच्या निर्दशनास आले. तात्काळ त्यांनी ही माहिती एस.टी. चालकासह प्रवाशांना दिली. चालकाने तात्काळ एस.टी. रस्त्याकडेला घेऊन आतील सर्वच ३८ प्रवाशांना बाहेर काढण्यास सुरुवात केली. तर काही प्रवाशी संकटकालीन दरवाज्यातून बाहेर निघाले. आगीने रौद्ररुप घेतल्याने एस.टी. जळून खाक झाली. सुदैवाने यामध्ये कोणत्याही प्रकारची जिवीतहानी झाली नाही. घटनेची माहिती मिळताच संभाजीनगर येथील यंत्र अभियंता व त्यांचे सहकारी घटनास्थळी रवाना झाले आहेत.

## अंतिम मतदार यादी १९ ऑक्टोबरला

कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी)

**राज्यातील मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाला भारत निवडणूक आयोगाने मुदतवाढ दिली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार मतदार याद्यांची अंतिम प्रसिद्धी आता १९ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार आहे.**

आयोगाचे अवर सचिव संदीप कुमार यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. गेल्या काही दिवसांपासून मुंबई, कोकण आणि राज्यातील विविध भागांत झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना गृहभेटी देऊन मतदार पडताळणीचे काम पूर्ण करण्यात अडचणी येत होत्या. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने आयोगाकडे मुदतवाढीची मागणी केली होती.





हार्दिक अभिनंदन!

**कु. इन्शा सुहेल बाणदार**

नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र एअर गण स्पर्धेत मॅंचेस्टर सिटी शुटिंग अकॅडमी इचलकरंजीची खेळाडू कु. इन्शा सुहेल बाणदार हिने ओपन साईट एअर रायफल प्रकारामध्ये सब युथ गटात ४०० पैकी ३३४ गुण मिळवत सुवर्ण पदक प्राप्त केले. हिचे हार्दिक अभिनंदन! व पुढील कार्यकिर्दीस शुभेच्छा!

श्री दस्तगीर रमजानशेठ बाणदार
स्टार डायग्नोस्टीक ॲण्ड इमेजींग सेंटर, इचलकरंजी.


## सहा. कामगार आयुक्त कार्यालयासमोर निदर्शने

इचलकरंजी, ता.१७ –

**बांधकाम कामगारांच्या मुलांच्या अनेक शैक्षणिक सहाय्य योजना महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बंद केल्याचे १३ जुलैला परिपत्रक काढले आहे. हे परिपत्रक त्वरीत रद्द करुन पूर्वीप्रमाणे सर्व शैक्षणिक सहाय्य योजना सुरु कराव्यात यासह विविध मागण्या कामगार संघटना संयुक्त कृती समितीने केल्या आहेत. या मागण्यांसाठी समितीच्यावतीनें शुक्रवारी येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.**



कामगार संघटना संयुक्त कृती समितीच्यावतीने निर्दशने करताना घेतलेले छायाचित्र. (छाया : मयूर चिंदे)

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने बांधकाम कामगारांसाठी विविध योजना सुरू केल्या आहेत. मात्र शैक्षणिक सहाय्य योजनांपैकी पहिली ते आठवी, दहावी उत्तीर्ण ५० टक्के गुण, पदवी, डिप्लोमा या सर्व योजना बंद केल्या आहेत. याबाबत १३ जुलै रोजी परिपत्रक काढले आहे. त्यामुळे कामगारांच्यात असंतोष पसरला आहे. या पार्श्वभूमीवर शैक्षणिक सहाय्य योजना बंदचे परिपत्रक त्वरीत रद्द करुन पूर्वीप्रमाणे योजना सुरु कराव्यात, कामगारांचे नूतनीकरण आणि नवीन नोंदणीचा कोठा वाढवा, जिल्हा सुविधा केंद्राकडे आधार क्रमांक दुरुस्ती, नावात दुरुस्तीचे २ वर्षांपासून बंद असलेले काम तालुका आणि जिल्हा सुविधा केंद्रांना द्याव्यात,अशा मागण्या कामगार संघटना संयुक्त कृती समितीने केल्या आहेत. या मागण्यांसाठी समितीच्यावतीने येथील सहा. कामगार आयुक्त कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. त्यानंतर शिष्टमंडळाने सहाय्यक कामगार आयुक्त जानकी भोईटे यांची भेट घेऊन मागण्यांबाबत चर्चा केली असता त्यांनी मागण्यांबाबत शासनाला कळवुन पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या आंदोलनात आनंदा गुरव, राजेंद्र निकम, मदन मुरगुडे, सुनील बारवाडे, रजनीकांत माने, बंडोपत सातपुते, सचिन साठे, दीपक रेपाळ, अमित वडर यांच्यासह कामगार संघटनांचे प्रतिनिधी, कामगार सहभागी झाले होते.

## आंदोलनकर्ते - महावितरण अधिकाऱ्यांमध्ये खडाजंगी

### जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविल्याचा आरोप

शिरढोण,ता.१७(प्रतिनिधी)–

**शिरढोण (ता.शिरोळ) येथे स्मार्ट मीटरविरोधातील साखळी आंदोलनादरम्यान शुक्रवारी आंदोलनकर्ते आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या बैठकीत जोरदार खडाजंगी झाली. ग्राहकांच्या परवानगीशिवाय घरांचे कडी–कोयंडे काढून जबरदस्तीने स्मार्ट मीटर बसविल्याचा आरोप करत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी करत आंदोलकांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर चर्चा निष्फळ ठरल्याने आंदोलन सुरुच राहीले आहे.**



स्मार्ट मिटर सक्ती रद्द व्हावी, ग्राहकांची परवानगी न घेता स्मार्ट मिटर बसविलेले तात्काळ काढण्यात यावे तसेच मिटर बदलणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई व्हावी या मागणीसाठी शिरढोण बचाव कृती समितीच्या वतीने ग्रामपंचायतीसमोर गेल्या दोन दिवसांपासून साखळी उपोषण सुरू आहे.या आंदोलनाबाबत चर्चा करण्यासाठी दुपारी जयसिंगपूर विभागाचे महावितरण कार्यकारी अभियंता विजयकुमार आडके आंदोलनस्थळी आले. आंदोलकांचे शिष्टमंडळ,अधिकारी यांची ग्रामपंचायत कार्यालयात बैठक झाली. बैठकीच्या सुरवातीलाच ग्राहकांच्या संमतीशिवाय घरात प्रवेश करून मिटर बदलण्याचा अधिकार कोणी दिला? असा सवाल उपस्थित करताच शाब्दिक वादाला सुरुवात झाली. अधिकारी आडके यांच्यावर प्रश्नांचा भडीमार केल्याने वादातून तणावाची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे अधिकारी बैठकीतून निघून गेले.





वडगाव नगरीचे भाग्यविधाते,
रौप्यमहोत्सवी नगराध्यक्ष

**स्व. विजयसिंह यादव साहेब**

यांच्या जयंतीनिमित्त

**विनम्र अभिवादन!**

सकाळी १० वा.
स्व. विजयसिंह यादव साहेब यांच्या पूर्णकृती पुतळ्यास अभिवादन
स्थळ : स्व. विजयसिंह यादव चौक

सकाळी १०.३० वा.
ए.एम.सी.हेल्थ केअर संचलित गिरीजा हॉस्पिटलच्या वतीने हृदयरोग निदान शिबिर
स्थळ : यादव वाडा

सायंकाळी ६.३० वा.
मुंबई येथील अंध व दिव्यांग बांधव कलाकारांचा संगीतमय कार्यक्रम 'नेत्रस्वरदीप'
स्थळ : श्री. बळवंतराव यादव हायस्कूल क्रीडांगण

**यादव पॅनेल आघाडी**

माजी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व तरुण मंडळे, पेठ वडगाव





मार्गदर्शक – मा. श्री. कल्लाप्पाणा आवाडे (दादा)
कार्यसम्राट आमदार – मा.श्री.राहूल प्रकाशराव आवाडे
खंबीर साथ – मा.श्री.प्रकाशराव आवाडे (आण्णा)
खंबीर साथ – मा.श्री.सुरेशराव हाळवणकर
खंबीर साथ – मा. श्री. स्वप्निल आवाडे



मा. श्री. श्रेणिक दादासो मगदूम

**हार्दिक अभिनंदन...शुभेच्छा!**

आमचे सहकारी परममित्र
**मा. श्री. श्रेणिक दादासो मगदूम**
यांची मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी गठीत करण्यात आलेल्या विधानसभा क्षेत्र स्तरीय समितीमध्ये सह अध्यक्षपदी निवड झालेबद्दल हार्दिक अभिनंदन ! त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा!

तानाजी तातोबा हराळे (माजी नगरसेवक, इ.न.प.)
श्रीकांत लास्कर
दिपक वाळकुंजे
मधुकर सिद्धाप्पा वाळकुंजे
सुधाकर वाळकुंजे
अजय पुजारी
निखील वठारे
सोमाभाऊ वाळकुंजे
मिलिंद नेमिष्टे
नाथा वाळकुंजे
नितीन हराळे
चंद्रकांत भागाजे

**हराळे परिवार, इचलकरंजी.**

**सुविचार :-** नैराश्य हे धारदार तलवारीवर साचलेल्या धुळीसारखे असते. धुळ झटकली की तलवार पुन्हा धारदार बनते.



■ संपादकीय ■

# निद्रीस्त व्यवस्थेचा धिक्कार

राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरच्या तापलेल्या रस्त्यांवर जेव्हा एखादा विचारवंत, समाजसेवक किंवा देशाचे भविष्य असणारा तरुण उपोषणाला बसतो, तेव्हा ती केवळ एक साधी घटना नसते; तर ते व्यवस्थेच्या अपयशाचे जळजळीत उदाहरण असते. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा गुरुवारी १९ वा दिवस आहे. १९ दिवस झाले ते त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष दिले जाण्याची वाट पाहत आहेत. त्यांचे नऊ किलो वजन घटले आहे, त्यांच्या शरीरातील साखरेची पातळी खालावली असून अंतर्गत अवयवांवर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा इशारा वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे. पण दिल्लीच्या सत्तेच्या वातानुकूलित दालनांमध्ये बसलेल्या प्रशासनाला या वेदनेची तिळमात्र जाणीव आहे का, हा खरा प्रश्न आहे. नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहार आणि पेपरफुटीच्या प्रकरणाने देशातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लावले. ज्या देशात गुणवत्ता हाच मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील मुलांचा एकमेव आधार असतो, तिथे परीक्षांच्या विश्वासार्हतेचाच लचका तोडला जावा, यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते ? त्याच्या विरोधात किंवा त्याच्या सुधारणेसाठी म्हणूया हवे तर, सोनम वांगचुक यांनी पुकारलेले हे आंदोलन केवळ एका मंत्र्याचा राजीनामा मागण्यासाठी नाही, हे सगळ्यात प्रथम समजून घेणे गरजेचे आहे. ही देशाच्या शिक्षण व्यवस्थेच्या शुद्धीकरणाची लढाई आहे. कॉपी करून पास झालेले इंजिनिअर्स तुमच्या इमारती बांधतील, मात्र त्यांच्या सुरक्षेची कोणीच हमी देऊ शकणार नाही. या इमारती कोसळतील व त्यातून जीवितहानी होईल. जर प्रश्नपत्रिका अशाच फुटत राहिल्या तर त्यातून तयार झालेले डॉक्टर कसे असतील ? असे डॉक्टर तुमच्यावर आणि तुमच्या कुटुंबावर उपचार करतील. प्रश्नपत्रिकेपासून मतपत्रिकेपर्यंत सगळेच विकले जात आहे. अशा स्थितीत एखादा देश प्रगती करू शकतो का ? पंतप्रधानांनी जनमानस समजून घ्यावे आणि त्यानुसार निर्णय घ्यावेत असे आवाहन खुद्द वांगचुक यांनीच केले आहे व कोणत्याही सूज्ञ माणसाला ते पटणारेच आहे. खासदार शशी थरूर यांनी आंदोलकांना लिहिलेले पत्रही सध्या चर्चेत आहे. थरूर यांच्या राजकीय भूमिकांशी कोणी सहमत असेल किंवा नसेल, पण त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे नाकारता येणारे नाहीत. थरूर यांनी म्हटल्याप्रमाणे, श्रीमंत आणि प्रभावशाली लोकांच्या मुलांना या व्यवस्थेच्या पडझडीचा फटका बसत नाही. त्यांच्याकडे प्रगतीसाठी इतर अनेक शिड्या असतात. खरी होरपळ होते ती त्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांची, ज्यांचे आई-वडील पोटाला चिमटा काढून, तुटपुंज्या पगारावर आपल्या मुलांच्या स्वप्नांना पंख देण्याचा प्रयत्न करत असतात. जेव्हा एखादा पेपर फुटतो किंवा परीक्षा रद्द होते, तेव्हा केवळ एक परीक्षा रद्द होत नाही, तर एका अखंड कुटुंबाचा त्याग, त्यांचे आर्थिक गणित आणि त्या तरुण विद्यार्थ्याचा स्वाभिमान या सर्वांचा एका रात्रीत खून होतो. आज जंतर-मंतरवर आणि देशाच्या कानाकोपऱ्यात जो संताप उमटत आहे, त्याला बेशिस्त म्हणण्याची घोडचूक सत्ताधाऱ्यांनी करू नये. हा संताप नसून, सर्व काही प्रामाणिकपणे करूनही व्यवस्थेने पाठीत खंजीर खुपसल्याची ती एका अख्ख्या पिढीची भावना आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने अखेर या प्रकरणात हस्तक्षेप करत वांगचुक यांच्या प्रकृतीवर चोवीस तास लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. कोणत्याही नागरिकाचा जीव मौल्यवान असतो, हे न्यायालयाला सरकारला बजावून सांगावे लागते, यातच प्रशासकीय असंवेदनशीलता आणि बधीरता दिसते. शेतकरी नेते राकेश टिकैत असोत, दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल असोत, की कला क्षेत्रातील विशाल दादलानी आणि सयाजी शिंदे, या सर्वांनी वांगचुक यांच्या ढासळत्या प्रकृतीबद्दल चिंता व्यक्त केली आहे. मात्र, केंद्र सरकारकडून चर्चेचे साधे सोपस्कारही पार पाडले जात नाहीत, हे लोकशाहीला शोभणारे नाही. आंदोलकांशी चर्चा करणे हे दुर्बलतेचे लक्षण नसून मुत्सद्दीपणाचे लक्षण आहे. लोकशाहीत संवाद हाच अंतिम मार्ग असतो. सरकार जर हट्टीपणा कवटाळून चर्चा करणार नसेल, तर ते स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेत आहेत. सोनम वांगचुक यांनी आपल्या खालावलेल्या प्रकृतीची पर्वा न करता २० जुलै रोजी होणाऱ्या 'चलो संसद मार्च' मध्ये सामील होण्याचे आवाहन केले आहे. सुमारे दीड लाख तरुणांनी या मार्चमध्ये सामील होण्याची तयारी दर्शवली आहे. हा आकडा सरकारसाठी धोक्याची घंटा आहे. तरुण पिढी ही हाताळायची समस्या नाही, तर ती देशाच्या भविष्याचे उत्तर आहे, याचे भान सत्ताधाऱ्यांना असले पाहिजे. एका व्यक्तीच्या राजीनाम्यामुळे परीक्षा पद्धती सुधारणार नाही हे जरी खरे असले तरी त्यामुळे उत्तरदायित्व निश्चित करण्याचा मार्ग नक्कीच मोकळा होईल. सरकारने जर ते केले नाही तर हा मनमानीपणा भविष्यात असाच सुरू राहील. सोनम वांगचुक यांनी लडाखच्या पर्यावरणापासून ते देशाच्या शिक्षण व्यवस्थेपर्यंत नेहमीच विधायक स्वरूपाचा लढा दिला आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी सरकारने तत्काळ हस्तक्षेप करणे गरजेचे आहे.

# होर्मुझ नव्या वादचक्रात....

**पश्चिम आशियातील संघर्षाला आता केवळ लष्करी किंवा राजकीय परिमाण राहिलेले नाही. तो जागतिक अर्थकारण, ऊर्जा सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय सागरी व्यवस्थेच्या भवितव्याशी निगडित प्रश्न बनला आहे. या संघर्षाच्या केंद्रस्थानी असलेला होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा एकदा जगाचे लक्ष वेधून घेत आहे.**

जगातील समुद्री मार्गाने होणाऱ्या कच्च्या तेलाच्या वाहतुकीपैकी जवळपास पाचवा हिस्सा आणि मोठ्या प्रमाणातील द्रवीकृत नैसर्गिक वायू याच अरुंद जलमार्गातून जातो. त्यामुळे होर्मुझमध्ये निर्माण होणारा कोणताही तणाव केवळ इराण किंवा अमेरिकेपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे पडसाद आशिया, युरोप आणि आफ्रिकेपर्यंत उमटतात. भारतासारख्या ऊर्जा आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या देशासाठी तर हा प्रश्न अधिकच संवेदनशील ठरतो. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुझमधून जाणाऱ्या व्यापारी जहाजांकडून सुरक्षा शुल्क आकारण्याची आणि या जलमार्गाचा संरक्षक म्हणून अमेरिकेने भूमिका स्वीकारण्याची घोषणा करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. व्यापारी दृष्टिकोनातून प्रत्येक आंतरराष्ट्रीय घडामोडीकडे पाहण्याची ट्रम्प यांची प्रवृत्ती यापूर्वीही दिसून आली आहे. मात्र होर्मुझसारख्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या समुद्री मार्गावर अमेरिकेने एकतर्फी संरक्षकत्वाचा दावा करणे ही केवळ राजकीय घोषणा नाही; तर विद्यमान आंतरराष्ट्रीय सागरी व्यवस्थेलाच आव्हान देणारी भूमिका आहे. त्याला प्रत्युत्तर देताना इराणनेही होर्मुझची सुरक्षा ही स्वतःची जबाबदारी असल्याचा पुनरुच्चार केला आहे. परिणामी या जलमार्गावर वर्चस्व कोणाचे, हा प्रश्न आता दोन्ही देशांच्या प्रतिष्ठेचा विषय बनला आहे. मात्र कोणत्याही महासत्तेच्या घोषणेपेक्षा आंतरराष्ट्रीय कायदा अधिक महत्त्वाचा असतो. संयुक्त राष्ट्रांच्या सागरी कायद्यानुसार होर्मुझसारख्या आंतरराष्ट्रीय सामुद्रधुनीतून सर्व देशांच्या जहाजांना निर्बंधाशिवाय मार्गक्रमण करण्याचा अधिकार आहे. या तत्त्वाला 'ट्रान्झिट पॅसेज' म्हणून मान्यता देण्यात आली आहे. इराण आणि ओमान यांच्या प्रादेशिक समुद्री हद्दीतून हा मार्ग जात असला, तरी त्या कारणावरून कोणत्याही देशाला जागतिक व्यापारी जहाजांवर मनमानी निर्बंध लादण्याचा किंवा शुल्क आकारण्याचा अधिकार मिळत



नाही. त्याचप्रमाणे अमेरिकेलाही स्वतःला या जलमार्गाचा स्वयंघोषित संरक्षक घोषित करून जगातील सर्व जहाजांकडून शुल्क आकारण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. अशी कोणतीही कृती आंतरराष्ट्रीय सागरी व्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच धक्का देणारी ठरेल. होर्मुझच्या सामरिक महत्त्वामुळे यापूर्वीही अनेकदा तणाव निर्माण झाला आहे. इराणने वेळोवेळी व्यापारी जहाजांची तपासणी केली, काही जहाजे ताब्यात घेतली, तर अमेरिकेनेही आपल्या नौदलाच्या साहाय्याने या परिसरात लष्करी उपस्थिती सातत्याने वाढविली. प्रत्येक वेळी त्याचा तात्काळ परिणाम जागतिक तेलबाजारावर झाला. तेलाच्या किमतींमध्ये उसळी आली, विमा प्रीमियम वाढले, जहाजवाहतुकीचा खर्च फुगला आणि जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यामुळे होर्मुझ हा केवळ भौगोलिक जलमार्ग नसून जागतिक अर्थव्यवस्थेची महत्त्वाची जीवनवाहिनी आहे. भारतासाठी या परिस्थितीचे परिणाम अधिक गंभीर ठरू शकतात. भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेपैकी मोठा हिस्सा आखाती देशांकडून आयात करतो. त्यातील बहुतांश पुरवठा होर्मुझमधूनच भारतात येतो. या मार्गावरील अस्थिरता वाढल्यास आयात खर्च वाढेल, रुपयावर दबाव निर्माण होईल, चालू खात्यातील तूट वाढण्याची शक्यता निर्माण होईल आणि त्याचा थेट परिणाम पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस तसेच वाहतूक खर्चावर होईल. वाहतूक महागली की महागाईचे दुष्टचक्र सुरू होते आणि त्याची झळ सर्वसामान्य नागरिकांपासून उद्योगक्षेत्रापर्यंत प्रत्येक घटकाला बसते. याहून मोठी चिंता म्हणजे भारतीय सागरी कर्मचाऱ्यांची सुरक्षितता. आखाती प्रदेशात धावणाऱ्या व्यापारी जहाजांवर मोठ्या संख्येने भारतीय नाविक कार्यरत आहेत. संघर्ष तीव्र झाल्यास या कर्मचाऱ्यांचे प्राण धोक्यात येऊ शकतात.

**दैनंदिनी**

अलीकडील संघर्षात काही भारतीय नागरिकांना जीव गमवावा लागल्याच्या घटना ही धोक्याची घंटा आहेत. त्यामुळे भारतासाठी हा केवळ ऊर्जा सुरक्षेचा विषय नसून मानवी सुरक्षेचाही प्रश्न आहे. चीनने या परिस्थितीची दखल घेत आपल्या ऊर्जा साठ्यांची आणि शुद्धीकरण क्षमतेची तयारी वाढविण्यास सुरुवात केली आहे. भारतानेही पर्यायी पुरवठा, सामरिक तेलसाठे, ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण आणि नूतनीकरणक्षम ऊर्जेचा विस्तार या दिशेने अधिक वेगाने पावले उचलण्याची गरज आहे. होर्मुझवर कोणत्याही एका देशाचे आर्थिक किंवा लष्करी वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना भारताने तत्त्वतः विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियम महासत्तांच्या इच्छेनुसार बदलू लागले, तर उद्या मलक्का, बाब-अल-मंदेब किंवा सुएझसारख्या इतर महत्त्वाच्या जलमार्गांबाबतही अशाच दाव्यांना खतपाणी मिळू शकते. त्याचे परिणाम संपूर्ण जागतिक व्यापार व्यवस्थेला भोगावे लागतील. होर्मुझचा प्रश्न हा दोन राष्ट्रांमधील वाद म्हणून पाहण्याची वेळ आता संपली आहे. तो मुक्त सागरी मार्ग, आंतरराष्ट्रीय कायदा आणि जागतिक आर्थिक स्थैर्य यांची कसोटी बनला आहे. महासत्तांच्या स्पर्धेतून जर समुद्री मार्गांचे व्यापारीकरण आणि लष्करीकरण वाढत गेले, तर त्याची किंमत अखेरीस संपूर्ण जगाला मोजावी लागेल. म्हणूनच या संघर्षाचे उत्तर शक्तिप्रदर्शनात नसून आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन, राजनैतिक संवाद आणि बहुपक्षीय सहकार्य यातच आहे. अन्यथा होर्मुझवरील संघर्ष हा केवळ आखातापुरता मर्यादित न राहता जागतिक अर्थव्यवस्थेला दीर्घकाळ अस्थिर करणारा ठरू शकतो.

# सरकारी शाळातील विदारक स्थिती चिंतनीय

## शालाबाह्य कामांमुळे शिकणारे शाळेत अन् शिकविणारे बाहेर

**महाराष्ट्रातील खाजगी व विनाअनुदानित तसेच अल्पसंख्यांक शाळेमधील शिक्षकांना जनगणनेच्या कामाची सक्ती करण्यात आली होती. त्या विरोधात अनएडेड स्कूल फोरम आणि इतरांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यांनी राज्यघटनेतील तरतुदीनुसार या शिक्षकांना जनगणना किंवा अन्य कामांची सक्ती करण्याचे अधिकार शासकीय यंत्रणेला नसल्याचा युक्तिवाद केला होता. त्यावर त्यावर न्यायमूर्ती गौतम अखंड आणि न्यायमूर्ती संदेश पाटील यांच्या खंडपीठाने २२ मे २०२६ रोजी अंतरीम आदेश जारी करून पुढील आदेश देईपर्यंत खाजगी विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांना जनगणनेचे काम न देण्याचे आदेश दिले आहेत.याची पुढील सुनावणी ३१ जुलैला होणार आहे. मात्र मुंबई उच्च न्यायालयाचा हा अंतरिम आदेश राज्य सरकारने धुडकावून लावल्याचे दिसत आहे.**

लहान मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिकवण्याचे काम अग्रक्रमाने शिक्षकांकडून अपेक्षित असते. मात्र केंद्र सरकार आणि राज्य सरकारे न्यायालयीन आदेश सहजपणाने धुडकावताना गेल्या काही वर्षात दिसत आहेत. सध्या जनगणना आणि मतदार याद्यांची पडताळणी ही दोन्ही कामे एकत्र सुरू आहेत.या कामात अनेक शाळांतील संपूर्ण स्टाफ आणि अनेक शाळातील अर्ध्याहून अधिक स्टाफ कार्यरत आहे. अनेक ठिकाणी शाळांचे दरवाजे उघडे मात्र आत ज्ञानदान सुरू नाही असे सर्रास चित्र आहे. एकीकडे सरकारचे शाळा बंद करण्याचे धोरण अत्यंत वेगाने कार्यरत आहे. त्याचा मोठा परिणाम विद्यार्थ्यांच्या गळतीवर होत आहे.

केंद्र सरकारच्या नीती आयोगाचा शालेय शिक्षणावरील अहवाल मे २०२६ मध्ये जाहीर झाला होता .गेल्या दहा वर्षातील म्हणजे २०१४-१५ ते २०२४-२५ या काळातील देशातील शाळांची संख्या, विद्यार्थी प्रवेश, किती विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक याचे प्रमाण, विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण, शाळेत दिल्या जाणाऱ्या सुविधा, अध्ययनपद्धती अशा विविध बाबींचा अभ्यास करून हा अहवाल तयार करण्यात आला.'' स्कूल एज्युकेशन सिस्टीम इन इंडिया : टेम्पोरल अनेलीसिस अँड पॉलिसी रोडमॅप फॉर क्वॉलिटी इन्हान्समेंट'' हे या अहवालाचे नाव आहे. सरकारी शाळेतील प्रवेश ७१ टक्क्यांवरून ४९ टक्क्यांवर आल्याचे या अहवालात स्पष्ट झाले आहे.

या अहवालानुसार गेल्या दहा वर्षात



एक लाखहून अधिक शाळा बंद झालेल्या आहेत.त्यामधील ९४ हजार शाळा सरकारी आणि चार हजार सरकारी अनुदानित शाळा आहेत. मार्च २०१५ मध्ये देशात पंधरा लाख सोळा हजार शाळा होत्या. मार्च २०२५ अखेर त्या १४ लाख ७१ हजार झालेल्या आहेत.म्हणजे एकूण ४५ हजार शाळांची संख्या घटली आहे. मार्च २०१५ मध्ये सरकारी शाळा ११.०७ लाख होत्या. मार्च २५ मध्ये त्या १०.१३ लाख झाल्या आहेत. अनुदानित शाळा ८३ हजार होत्या त्या ७९ हजार झालेल्या आहेत. म्हणजेच सरकारी शाळा व अनुदानित शाळांची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. याच काळामध्ये खाजगी मान्यताप्राप्त शाळा २.८८ लाख वरून ३.३९ लाख झालेल्या आहेत. तर मदरसा आणि इतर तशा प्रकारच्या शाळा ३८ हजारांवरून ३९ हजार झाल्या आहेत. गेल्या दशकभरामध्ये शिक्षणावरील खर्च जीडीपीच्या ३.८७ ते ४.२४ टक्क्यांपर्यंत गेलेला आहे. मात्र तो किमान सहा टक्क्यांपर्यंत नेण्याची गरज आहे.

तसेच या अहवालानुसार गेल्या दशकभरात विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशाचे प्रमाण २६.९५ कोटींवरून २४.६९ कोटी पर्यंत खाली आलेले आहे.याचे कारण देताना या अहवालात कमी झालेला प्रजनन दर, शालेय विद्यार्थ्यांच्या वयोगटातील लोकसंख्येतील घट, सरकारी शाळांचे विलीनीकरण, काही शाळा बंद करणे अशी कारणे दिली आहेत.आज देशामध्ये ७९९३ शाळांमध्ये एकाही विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला नाही. तर एक लाख चार हजार एकशे पंचवीस शाळा एकशिक्षकी आहेत. देशातील १४.७१ लाख शाळांमध्ये एक कोटी एक हजार शिक्षक आहेत. त्यावरही या अहवालात भाष्य केले आहे.

एकूणच हा अहवाल भारतीय शिक्षण व्यवस्थेच्या भविष्याविषयी काही गंभीर प्रश्न निर्माण करतो. तसेच या अहवालाने नव्या शैक्षणिक धोरण २०२० च्या मर्यादाही स्पष्ट केल्या आहेत. गेल्या काही वर्षात सर्वत्रच शिकवणारे आणि शिकणारे यांच्यात कुठेतरी अंतर पडत चालले आहे असे दिसते. सदोष शिक्षण पद्धती हे त्याचे मुख्य कारण आहे. युडायस प्लस (युनिफाईड डिस्ट्रीक्ट इन्फॉमेशन सिस्टीम फॉर एज्युकेशन प्लस) ही भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाची एकीकृत प्रणाली आहे. शाळा, शिक्षक आणि विद्यार्थी या तीन स्तरावर ती विश्लेषण करत असते. युडायस प्लसच्या ताज्या अहवालानुसार भारतात विद्यार्थ्यांच्या नववी- दहावीमध्ये शाळा सोडण्याच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या गळतीची जी अनेक कारणे आहेत त्यापैकी सर्वात महत्त्वाचे कारण माध्यमिक शाळांची संख्या कमी होत चाललेली आहे हे आहे. हे प्रमाण पहिली ते पाचवीत ०.३ टक्के आहे. सहावी ते आठवीतील गळतीचे प्रमाण ३.६ टक्के आहे.तर नववी - दहावीच्या गळतीचे प्रमाण त्याच्या तिपटीने म्हणजे ९.५ टक्के इतके आहे. महाराष्ट्रातही अशी गळती ९ टक्के आहे. याचाच अर्थ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेपेक्षा माध्यमिक शाळांच्या गळतीचे प्रमाण फार मोठे आहे. वास्तविक राज्य सरकारकडून विविध मोफत पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य,मोफत बसपास पुरविले जातात. पण तरीही गळती होतेय.याचे कारण चुकीच्या धोरणातून शाळा बंद केल्या जात आहे आणि सुरू असलेल्या शाळेतील शिक्षकांना अतिरिक्त काम लावले जाते त्यात लपलेले आहे.

■ प्रसाद कुलकर्णी,इचलकरंजी

## वाचकांचा पत्रव्यवहार

### इस्त्रोच्या शास्त्रज्ञांसह, तांत्रीक तज्ञांच्या राजीनाम्यांचा अर्थ काय ?

भारताला चंद्रापर्यंत नेणाऱ्या आणि मंगळ मोहीम यशस्वी करणाऱ्या, नासासारख्या बलाढ्य संस्थेसमोर अगदी भक्कमपणे उभ्या राहणाऱ्या इस्त्रोसमोर नवे संकट उभे राहतांना दिसून येते आहे शास्त्रज्ञांसह तांत्रीक तज्ञांचे राजीनामे हि देशासमोरील मोठी समस्या निर्माण झाल्याचे वृत्त आहे.राजीनामा सत्रांमुळे इस्त्रोच्या अडचणी वाढल्या आहेत शास्त्रज्ञांसह, तांत्रीक, तज्ञ देखील इस्त्रोतून बाहेर पडत आहेत त्यामुळे भारत सरकारची चिंता वाढली आहे. परिणामी अंतराळ विभागाला यासंदर्भात नवीन आदेश काढावा लागला आहे.

मागील काही दिवसांपासून इस्त्रोतील अनेक शास्त्रज्ञ आणि तांत्रिक विषयातील तज्ञांनी राजीनाम्यांचा आणि ऐच्छिक निवृत्तीचा सपाटा लावला आहे. आतापर्यंत सुमारे १०० ते १२० शास्त्रज्ञांनी इस्त्रो सोडले आहे. यातील ८० जण युआर राव सॅटेलाईट सेंटरचे कर्मचारी आहेत तर विक्रम साराभाई स्पेस सेंटरच्या किमान २० शास्त्रज्ञांचा सहभाग आहे. विशेष करुन यातील बरेच शास्त्रज्ञ भारताच्या महत्वाकांक्षी गगनयान अंतराळ मोहिमेवर काम करत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे इस्त्रोसह भारत सरकारची चिंता वाढली आहे.

सेंटरच्या संचालकांना अशा प्रकरणांमध्ये अंतिम मंजुरीचे अधिकार देण्यात आले होते मात्र राजीनामा सत्रांमुळे आता हे सर्वाधिकार पुन्हा एकदा केंद्र सरकारकडे आले आहेत. देशातील अंतराळ संशोधन मोहिमेतील अतिशय अग्रगण्य संस्था म्हणून इस्त्रोकडे पाहिले जाते. येथील जर शास्त्रज्ञांसह, तांत्रीक तज्ञ राजीनामे देत असतील तर ती भारतासाठी मोठी गंभीर समस्या आहे. यावर सरकारने तातडीने विचार करुन मार्ग काढणे कधीही हिताचे ठरणार आहे !

■ राजू जाधव,मांगूर

### प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी कसोटीचा



यंदाचा खरीप हंगाम शेतकऱ्यांसाठी मोठ्या चिंतेचा विषय बनला आहे. अनेकांनी कर्ज काढून, उसनवारी करून आणि मोठा खर्च करून कशीबशी पेरणी पूर्ण केली. पण पेरणीनंतर अपेक्षित पाऊस झाला नाही. त्यामुळे उगवलेली पिके म्हणावीत तशी जोमदार वाढलेली नाहीत. अनेक ठिकाणी पिकांचा रंग फिका पडत आहे, वाढ खुंटली आहे आणि शेतकऱ्यांच्या मनात काळजीचे ढग दाटून आले आहेत.कधी नव्हे ते जुलै महिन्यातही पावसाचा पत्ता नाही. उलट उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडत आहे. जमिनीतील ओल झपाट्याने कमी होत आहे.ही परिस्थिती अशीच राहिली तर पिके टिकवणेही कठीण होईल.आज पिकांना अजून किमान तीन महिने जगवायचे आहे. त्यानंतरच ते धान्याच्या पोत्यात भरतील. मात्र सध्याची परिस्थिती पाहता ते दिवस येतील की नाही, याचीही शाश्वती उरलेली नाही. प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी कसोटीचा ठरत आहे.

अशा वेळी केवळ पावसाची वाट पाहून चालणार नाही. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची नियमित पाहणी करावी, उपलब्ध ओलावा जपण्याचा प्रयत्न करावा आणि सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व नोंदी वेळेत पूर्ण कराव्यात.विशेषतः प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत पीक विमा, तसेच आवश्यक असल्यास पीक नुकसानीची नोंद, शासनाच्या सूचनांनुसार सर्वेक्षणाची माहिती आणि इतर आवश्यक प्रक्रिया तातडीने पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. संकट आल्यावर धावपळ करण्यापेक्षा आजच आवश्यक खबरदारी घेतलेली अधिक हिताची ठरेल.शेतकऱ्यांनी योग्य वेळी योग्य पावले उचलली तर होणारे नुकसान काही प्रमाणात कमी करता येईल.आपल्या हक्काच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी जागरूक रहावे, आवश्यक नोंदी वेळेत कराव्यात आणि इतर शेतकऱ्यांनाही याबाबत माहिती देणे गरजेचे आहे.

■ चैतन्य श.नेसरीकर,निपाणी-यरनाळ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शनिवार,ता.१८.७.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नाम संवत्सरे, दक्षिणायणे, ग्रीष्म ऋतो,आषाढ मासे,शुक्ल पक्षे, पंचमी तिथी२७.४४ नंतर,षष्ठी तिथी,पूर्वा नक्षत्र १८.०१ नंतर उत्तरा नक्षत्र,सिंह रास,२३.५९ नंतर कन्या रास, वरियान योग २०.४६ नंतर परिघ योग,बव करण १६.०८ नंतर, बालव करण २७.४४ पर्यंत,दिनमान १२.५४,सुर्योदय ६.१२, सुर्यास्त १९.०६ (कोल्हापूरचे) राहू काळ सकाळी ९ ते १०.३०, श्री वल्लभाचार्य वैकुंठागमन,घबाड २७.४४ नंतर,स्थावराची कामे

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## * राशीभविष्य

**मेष**-मनोरंजनावर पैसा आणि वेळ खर्च करण्यावर नियंत्रण ठेवा. इतरांना दुखावू नका आणि कुटुंबाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करा.मनासारख्या घटना घडतील. सहलीमुळे तुमचा दिवस आनंदात जाईल.

**वृषभ**-तुमचा निर्धार आणि मेहनत याकडे सर्वांचे लक्ष जाईल आणि काही आर्थिक पारितोषिकही आज तुम्हाला मिळेल. मनासारख्या घटना न घडल्याने निराश होऊ नका.

**मिथून**- जे लोक लघु उद्योग करतात त्यांना जवळच्या लोकांचा सल्ला मिळू शकतो. ज्यामुळे आर्थिक लाभ ही मिळण्याची शक्यता आहे. नवीन योजना आखाल.

**कर्क**-महत्त्वाच्या व्यक्तींकडून आर्थिक मदत मिळेल. कुटुंबात त्रासदायक प्रश्न निर्माण होतील. कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होईल. रागावर नियंत्रण ठेवा.

**सिंह**- कुटुंबातील सदस्यांशी जवळिक साधून काम करा, आयुष्यातील चढ-उतार त्यांच्याशी शेअर करा. आपला हा बदललेला स्वभाव त्यांना अमर्याद आनंद मिळवून देईल.

**कन्या**- उतावीळपणे कोणताही निर्णय घेऊ नका, अन्यथा त्यामुळे आयुष्यात नंतर पश्चाताप करावा लागेल. अचानक पाहुण्यांचे आगमन होईल. कामाचा ताण वाढेल.

**तुळ**-दुसऱ्यांना पटवून देण्याच्या क्षमतेमुळे तुम्हाला लाभ होईल.तुमच्या अपेक्षेप्रमाणे लाभ होणार नाही. पैसे गुंतवताना घाईगडबडीने कोणताही निर्णय घेऊ नका.

**वृश्चिक**-घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. मुलांसमवेत वेळ घालविणे महत्त्वाचे ठरेल.मानसिकदृष्ट्या कणखर बनण्यासाठी ध्यानधारणा आणि योगासने करा.

**धनु**-आज अनुभवी आणि नावीन्यपूर्ण कल्पना असलेल्या लोकांच्या सल्ल्यानुसार पैसे गुंतवा. नातेवाईकांसोबत वेळ आनंदात जाईल. मनावरील दडपण कमी होईल.

**मकर**- चांगली गुंतवणूक फक्त परतावा मिळवून देतील - त्यामुळे तुमच्या कष्टाचे पैसे गुंतवताना नीट विचार करा.आपल्या अडचणी प्रश्न घेऊन येणाऱ्यांना तुम्ही मदत कराल.

**कुंभ**- अचानक धनलाभ होईल.ज्यामुळे तुमच्या बऱ्याच आर्थिक समस्या दूर होतील. नातेवाईक/मित्रमंडळींचे अचानक आगमन होईल. वेळेचा सदुपयोग करा.

**मीन**- जुन्या ओळखी आणि संबंधाना उजाळा देण्यासाठी चांगला दिवस. गुपचूप केलेले व्यवहार तुमच्या प्रतिष्ठेला बाधा आणू शकतात. अनावश्यक कृतीने दिवस तापदायक ठरू शकेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अ‍ॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६० , सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.* कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

# सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस सरकार कटीबद्ध

## खास.प्रियांका जारकीहोळी यांचे प्रतिपादन; कोगनोळीत रस्ता कामाचा शुभारंभ

कोगनोळी,ता.१७(प्रतिनिधी)–

**काँग्रेस सरकारने नेहमीच सर्वसामान्य जनता, शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या हिताला प्राधान्य दिले आहे. कोगनोळी परिसरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी विशेष प्रयत्न केले असून आगामी काळातही मतदारसंघातील पाणी, वीज व दळणवळणाची साधने मजबूत करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत.**

ग्रामीण भागाचा कायापालट करणे आणि सामान्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच काँग्रेस सरकारचे मुख्य ध्येय आहे. मतदारांनी विश्वास ठेवून कमी वयामध्ये माझ्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. ती पूर्ण करण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करीत आहे.

कोगनोळीसह संपूर्ण सीमाभागातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस सरकार कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन खास.प्रियांका जारकीहोळी यांनी केले.



कोगनोळी येथे रस्ता कामाचा शुभारंभ करताना खासदार प्रियांका जारकीहोळी शेजारी उपस्थित वीरकुमार पाटील,लक्ष्मण चिंगळे,पंकज पाटील, निर्मला पाटील, सुप्रिया पाटील व मान्यवर.

कोगनोळी (ता. निपाणी) येथील बाजारपेठेमध्ये खासदार प्रियांका जारकीहोळी यांच्या फंडातून मंजूर झालेल्या १ कोटी २५ लाख रुपये रस्ता कामाच्या शुभारंभप्रसंगी उद्घाटक या नात्याने त्या बोलत होत्या.

अध्यक्षस्थानी माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील हे होते तर व्यासपीठावर चिकोडी जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष लक्ष्मण चिंगळे, चिकोडी जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा निर्मला पाटील, राज्य महिला काँग्रेस सरचिटणीस सुप्रिया पाटील, माजी जिल्हा पंचायत उपाध्यक्ष पंकज पाटील, युवा नेते सुजय पाटील,माजी जिल्हा पंचायत सदस्य राजेंद्र पवार-वडर, बेडकिहाळ ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष बसवराज पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी पंकज पाटील यांनी स्वागत करुन कोगनोळीतील रस्त्यांची दुरावस्था दूर करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी तत्परतेने निधी मंजूर केला आहे. या दर्जेदार रस्त्यांमुळे ग्रामस्थांचा प्रवासाचा त्रास कायमचा दूर होऊन गावच्या आर्थिक विकासाला गती मिळणार असल्याचे सांगितले.

तत्पूर्वी माजी ऊर्जामंत्री वीरकुमार पाटील व मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून तर खासदार प्रियांका जारकीहोळी यांच्या हस्ते कुदळ मारुन रस्ता कामाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी विविदोध्देश पीकेपीएस संघाचे चेअरमन अनिल चौगुले, माजी ग्रामपंचायत अध्यक्ष ज्ञानेश्वर डांगरे, माजी ग्रामपंचायत सदस्य सचिन खोत, तात्यासाहेब कागले, झाकीर नाईकवाडे, संजय डूम, अशोक हेंगाडे, आप्पासो माने, दिलीप पाटील, आप्पासो खोत, कुमार पिडाप-पाटील, रोहित माणकापूरे, तात्यासो पाटील, अक्षय सांगरोळे, संदीप माने यांच्यासह काँग्रेस प्रेमी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.प्रकाश कदम यांनी सूत्रसंचलन करुन आभार मानले.

# निपाणी स्थानकातील प्रवाशी तहानलेलेच

निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–

**येथील बसस्थानकात दररोज हजारो प्रवाशांची वर्दळ असून बस वेळेवर न लागल्याने त्यांना तासन्तास ताटकळावे लागते.मात्र, बसस्थानकावर थांबल्यानंतर येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्थाच नाही.प्रवाशांसाठी असलेले पिण्याच्या पाण्याचे नळ बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे गैरसोय होत असून बस स्थानकावरील प्रवाशांनी विकतच पाणी प्यायचे का, असा प्रश्न या प्रवाशातून विचारला जात आहे.**

कर्नाटक राज्य परिवहन महामंडळाची बस ही प्रवाशांच्या सेवेसाठी असून दररोज हजारो प्रवासी रोज बसने प्रवास करत आहेत.मात्र बसस्थानकावर त्यांना मूलभूत सुविधाही मिळत नाहीत.आगारातील अधिकारी व



निपाणी: प्रवाशांसाठी असलेले बंद केलेले नळ.

कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र पिण्याच्या पाण्याचे फिल्टर बसविण्यात आले आहे.मात्र प्रवाशांना पिण्याच्या पाण्याविना ठेवण्यात आले आहे. प्रवाशांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था म्हणून चार नळ बसविण्यात आले होते. मात्र फिल्टरच्या पाण्याचे नाव पुढे करून नळ बंद करण्यात आले आहेत.नळ असूनही पाणी नसल्यामुळे प्रवाशांना तहान भागवण्यासाठी १० ते २० रुपये देऊन पाणी प्यावे लागत आहे. याशिवाय बसस्थानकावर बसची प्रतीक्षा करत थांबलेल्या प्रवाशांसाठी आसन व्यवस्थाही अपुरी असल्याने वृद्ध प्रवासी व महिलांना तासन्तास ताटकळत उभे राहावे लागत आहे. सध्या पावसाळा सुरू झाला असून प्रवासी बसण्याच्या ठिकाणी पावसाचे पाणी येत आहे. त्यामुळे हायटेक बस स्थानकात भिजत थांबावे लागत आहे.

**पिण्याच्या पाण्याचे नळ बंद अवस्थेत;मुलभूत सुविधा पुरविण्याची मागणी**



महांगावः हृदय शस्त्रक्रियेप्रसंगी उपस्थित तज्ञ डॉक्टरांचे पथक.

## संत गजानन हॉस्पिटलची ऐतिहासिक कामगिरी

गडहिंग्लज,ता.१७(वार्ताहर)–

**महागाव (ता.गडहिंग्लज) येथील संत गजानन महाराज मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलने ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे.**


परिसरात प्रथमच अत्याधुनिक हृदय समन्वय संरक्षक उपकरण प्रत्यारोपण शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत यशस्वीपणे पार पडली असून, ७४ वर्षीय हृदयविकारग्रस्त रुग्णाला नवसंजीवनी मिळाली आहे. सदर रुग्णाला तीव्र हृदयविकाराचा त्रास असल्याने उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.तपासणीनंतर रुग्णाच्या हृदयाची रक्त पंप करण्याची क्षमता अत्यंत कमी झाल्याचे तसेच भविष्यात जीवघेण्या अनियमित हृदयस्पंदनांचा धोका असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तज्ज्ञ डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.अत्यंत जटिल आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक शस्त्रक्रिया हॉस्पिटलचे संचालक डॉ.यशवंत चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हृदयरोगतज्ज्ञ डॉ.सचिन निकम आणि त्यांच्या अनुभवी हृदयवाहिनी प्रयोगशाळा पथकाने यशस्वीरीत्या पूर्ण केली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर असून उपचारांना उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

## सौंदलगा ते पंढरपूर पायी दिंडीचे प्रस्थान

सौंदलगा,ता.१७(वार्ताहर)–

**श्री.विठ्ठल-रुक्मिणी वारकरी संप्रदाय संघ, सौंदलगा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २१ व्या सौंदलगा ते पंढरपूर आषाढी वारी पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान गुरुवार, ता.१६ जुलै रोजी सौंदलगा येथून झाले. सदर दिंडी सोहळा मृदुंगाचार्य श्री पंडित महाराज व सचिन आडसूळ यांच्या साथीने होणार आहे.**

दिंडी प्रमुख म्हणून बाबुराव हातकर, संदेश पाटील, बाबुराव पाटील व मारुती पाटील हे काम पाहणार आहेत. तर दिंडी चालक म्हणून आनंदा शेवाळे, शशिकांत पाटील, चंद्रकांत पाटील (कोठवाळे), नंदकुमार पाटील, पांडुरंग पाटील व मोहन सुतार कार्यरत आहेत ता.२५ जुलै रोजी पंढरपूर मुक्काम एकादशी, काकडा व रात्रीचा फराळ कार्यक्रम होईल. ता.२६ जुलै रोजी द्वादशी प्रसादानंतर दिंडीचा परतीचा प्रवास सुरू होणार आहे.



अथणी शहरातील मोटगी मठाच्या अनुभव मंडपासमोरील सीसी रोडचे भूमिपूजन करताना खास.प्रियांका जारकीहोळी व इतर.

## अथणीमध्ये रस्ता कामाचा शुभारंभ

अथणी,ता.१७–

**'मी सत्तेत असो वा नसो, केंद्र सरकारकडून निधी मिळवून चिकोडी लोकसभा मतदारसंघाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न करीन आणि केलेले काम विश्वासार्ह असेल याची खात्री करण्यासाठी मी माझे सर्वोत्तम प्रयत्न करीन,'असा विश्वास चिकोडीच्या खास.प्रियांका जारकीहोळी यांनी व्यक्त केला.**

अथणी शहरातील मोटागी मठाजवळ सीसी रस्त्याच्या बांधकामासाठी भूमिपूजन केल्यानंतर कार्यक्रमाला संबोधित करताना त्या बोलत होत्या. त्यांनी विरोधी पक्ष कितीही अपप्रचार करत असले तरी, कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विकासासाठी काम करावे, असे आवाहन केले.याप्रसंगी मोटागी मठाचे प्रभू चन्नबसवा महास्वामी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी नगरपरिषदेचे अध्यक्ष शिवलीला बुटाली, राव साबा ऐहोळे, रमेश सिंदगी, गजानन मंगसळी, चिदानंद मुकाणी, सुनील सांका आदींसह अनेकांनी उपस्थिती होती.

# शेतीसाठी कालव्याद्वारे अखंडित पाणी द्या

## श्रीमंत पाटील यांची मागणी;अन्यथा आंदोलनाचा इशारा

कागवाड,ता.१८(वार्ताहर)–



**दुष्काळी भागातील खेड्यांना वरदान ठरलेल्या करिमसुती, बसवेश्वर आणि ऐनापूर कालव्यांमध्ये कृष्णा नदीच्या पात्रात वाहते पाणी उपलब्ध असेपर्यंत अखंडितपणे पाणी सोडण्यात यावे. पाणीपुरवठा कोणतेही ठोस कारण नसताना मध्यंतरीच बंद करण्याचा निर्णय घेतल्यास शासनाच्या शेतकरीविरोधी भूमिकेविरोधात तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा माजी मंत्री श्रीमंत (तात्या) पाटील यांनी दिला.**

मदभावी येथे पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी मुरग्याप्पा मगदूम, दिलीप पवार, बाळू मगदूम, आर. एम. पाटील, रामू मगदूम, ईश्वर कुंभार, रमेश नेवलगी, महांतेश कांबळे, रावसाहेब मगदूम, शिवराय मनीजोळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

माजी मंत्री पाटील बोलतांना पुढे म्हणाले यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झाले असले, तरी कृष्णा नदीच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहत आहे. या पार्श्वभूमीवर करिमसुती, बसवेश्वर आणि ऐनापूर कालव्यांत कृष्णेचे पाणी सोडण्यात आले. मात्र सध्या पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याचे कारण पुढे करून कालव्यांतील पाणीपुरवठा थांबविण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती समोर येत आहे. हा निर्णय दुष्काळी भागातील हजारो शेतकऱ्यांच्या हिताला बाधा आणणारा ठरेल, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

अथणी व कागवाड तालुक्यातील बहुतांश शेतकरी विहिरी, कूपनलिका आणि पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून ऊस, उडीद, मूग, शेंगदाणा, सोयाबीन आदी पिकांची लागवड करतात. सध्या पावसाअभावी पिके संकटात सापडली असून त्यांना तातडीने पाण्याची गरज आहे. कालव्यांतून सातत्याने पाणी सोडल्यास विहिरी व कूपनलिकांतील जलसाठा वाढेल, भूजल पातळीत सुधारणा होईल आणि पिकांना मोठा दिलासा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

कृष्णा नदीत सध्या मोठ्या प्रमाणात पाणी वाहत असूनकालव्यांतील पाणीपुरवठा कोणत्याही परिस्थितीत खंडित करू नये. अन्यथा शासनाच्या या भूमिकेविरोधात शेतकऱ्यांना सोबत घेऊन उग्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही श्रीमंत पाटील यांनी यावेळी दिला.



## कौशल्यामुळेच यशाच्या संधी उपलब्ध होतात-सुरेश घरबुडे

चिकोडी,ता.१७(वार्ताहर)–

**बदलत्या काळात केवळ ज्ञान असून चालत नाही, तर त्यासोबत कौशल्याची जोड असणे आवश्यक आहे.कौशल्यामुळेच उत्तम संधी उपलब्ध होतात आणि त्या यशाकडे घेऊन जातात असे प्रतिपादन उद्योजक सुरेश घरबुडे यांनी केले.**

ते येथील शासकीय टूल रूम अँड ट्रेनिंग सेंटर (जीटीटीसी) व उन्नती स्वयंसेवी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक युवा कौशल्य दिन कार्यक्रमात बोलत होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. शीतलकुमार देवलापूर हे होते.यावेळी उद्योजिका पार्वती कमते यांनी मार्गदर्शन केले तर विद्यार्थी कौशल दांधले, राचप्प शिवापूरे, रोहित घरबुडे, लक्ष्मी हत्तरकी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी विमला चिनकेकर,सचिन मनगोळी,श्रुती हेग्गरे, चंद्रशेखर चिनकेकर,सुरेश सावित्रीगोळ, प्रदीप माने, स्वप्नील हुगार, विजय जुट्टदवर,चनवीर कंबार यांच्यासह विद्यार्थी व मान्यवर उपस्थित होते.

# आजरावासियांना नागरी सुविधा पुरवा

## अन्याय निवारण समितीची मागणी

आजरा,ता.१७(प्रतिनिधी)–

**सामाजिक सेवा प्रतिष्ठान, प्रणित अन्याय निवारण समितीच्या वतीने आजरा नगरपंचायतीकडे प्रभाग क्रमांक ११ व १५ मधील विविध नागरी समस्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.**

यासंदर्भातील सविस्तर निवेदन मुख्याधिकाऱ्यांना देत सात दिवसांत ठोस निर्णय न झाल्यास ता.२१ जुलै रोजी नगरपंचायत कार्यालयासमोर भजन,ढोल-ताशा व भारतीय बैठकीच्या माध्यमातून शांततापूर्ण आंदोलन करण्यात येईल, असा इशारा समितीने दिला आहे.

निवेदनात शहरातील रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविणे, मंजिरी परिसरातील स्ट्रीट लाईट सुरू करणे, चराटी कॉलनी, आपटे कॉलनी येथील मुख्य पाणीपुरवठा



आजरा-विविध नागरी सुविधा पुराविण्याविषयीचे निवेदन मुख्याधिकाऱ्यांना देताना अन्याय निवारण समितीचे शिष्टमंडळ.

लाईन बदलणे, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, नवीन स्ट्रीट व सोलर लाईट बसविणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.

निवेदनावर नगरसेवक परशुराम बामणे,नगरसेविका डॉ.स्मिता कुंभार यांच्यासह गौरव देशपांडे, पांडुरंग सावरतकर,जावेद पठाण, बंडोपंत चव्हाण,संजय जोशी, जोतिबा आजगेकर, मिनीन डिसोझा, रामचंद्र पंडीत,सईद पेंटर, संतोष बांदिवडेकर आणि अभिजित परीट यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मुरगूडमध्ये १.६७ कोटीच्या विकासकामांचे उद्घाटन

मुरगूड,ता.१७(प्रतिनिधी)–

**मुरगूड नगरपरिषदेच्या शहरातील ८ ठिकाणच्या १ कोटी ६७ लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे उद्घाटन व प्रारंभ नगराध्यक्षा सुहासिनीदेवी पाटील, पश्चिम महाराष्ट्र युवासेना निरीक्षक अ‍ॅड.वीरेंद्र मंडलिक, दिग्विजयसिंह पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले, मुख्याधिकारी अतिश वळुंज उपस्थित होते.**

यावेळी आंबेडकरनगर, रोहिदास गल्ली, शांतीनगर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथे स्ट्रीट लाईट सौर पथदिवे बसवणे, आंबेडकरनगर येथे मरगाई मंदिर सांस्कृतिक हॉलसमोर पेव्हिंग ब्लॉक, आंबेडकरनगर येथील आंबेडकर भवन सभोवताली संरक्षक भिंत बांधणे, वाघापूर रोड



ऑक्सीजन पार्क येथील विविध कामांच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित नगराध्यक्षा सुहासिनीदेवी पाटील,अ‍ॅड.वीरेंद्र मंडलिक,दिग्विजय पाटील उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले,मुख्याधिकारी श्री वळुंज आदी मान्यवर.

स्मशानभूमी विकसित करणे आदी कामांचा समावेश आहे.कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नामदेवराव मेंडके, नगरसेवक शिवाजीराव चौगले, सत्यजितसिंह पाटील,दत्तात्रय मंडलिक, सुनील रणवरे, राहुल शिंदे,रणजित भारमल,सुहास खराडे,नगरसेविका गीतांजली आंगज, वैशाली गोधडे, विजयमाला शिंदे, सुरेखा लोकरे, शिवाजी सातवेकर, संजय भारमल,उदय मगदूम,जयसिंगराव भोसले,जगन्नाथ पुजारी,राजू कांबळे, दीपक शिंदे, राजेंद्र चव्हाण,मारुती कांबळे, दिलीप कांबळे, संभाजी आंगज, प्रविण लोहार,विजय मेंडके, राजू जमादार, विजय साफळे आदी प्रमुख उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी पीक विमा योजनेचा लाभ घ्यावा

## कृषी विभागाचे शेतकऱ्यांना आवाहन

निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–

**जिल्हा पंचायत व कृषी विभाग, बेळगाव यांच्यावतीने बेळगाव जिल्ह्यात २०२६ च्या मान्सून हंगामासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.**

ही योजना क्षेत्र-आधारित आणि उत्पन्न-आधारित आहे.ग्रामपंचायत स्तरावर पीक विमा घेतलेले शेतकरी उत्पन्नातील तुटीच्या आधारावर पीक विमा भरपाई मिळण्यास पात्र असतील.

चालू हंगामात जर अपुऱ्या पावसामुळे किंवा इतर प्रतिकूल हवामानामुळे अधिसूचित क्षेत्रातील ७५ टक्क्यांहून अधिक क्षेत्रावर पेरणी झाली नाही तर विमा कंपनी विमाधारक शेतकऱ्यांना विमा रकमेच्या जास्तीत जास्त २५ टक्के रक्कम देईल. अधिसूचित क्षेत्रात अतिवृष्टी, पुरामध्ये पिक पाण्याखाली जाणे, दीर्घकाळचा दुष्काळ यांसारख्या हवामानातील अनियमिततेमुळे कोणत्याही अधिसूचित विम्याचे अपेक्षित उत्पन्न, सुरुवातीच्या उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल, तर विमा कंपनी विम्यासाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना अंदाजित पीक विमा नुकसान भरपाईच्या २५ टक्के रक्कम आगाऊ देईल.या विमा योजनेमुळे गारपीट, भूस्खलन, पिकांचे नुकसान, ढगफुटी इत्यादी स्थानिक नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीपासून (वैयक्तिक) संरक्षण मिळणार आहे.

जर कापणीनंतर पीक शेतातच वाळायला ठेवले असेल आणि कापणीच्या दोन आठवड्यांच्या आत चक्रीवादळ, चक्रीवादळी पाऊस किंवा अवकाळी पावसामुळे पिकाचे नुकसान झाले, तर विमा कंपनी प्रत्येक प्रकरणानुसार नुकसानीचे मूल्यांकन करून पीक नुकसानीची भरपाई देईल. सुधारित पंतप्रधान पीक विमा योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ज्या शेतकऱ्यांना पीक कर्ज मंजूर झाले आहे, त्या सर्वांचा या योजनेत अनिवार्यपणे समावेश केला जाईल.

तथापि, ज्या शेतकऱ्यांनी पीक कर्ज घेतले आहे, त्यांना या योजनेत सहभागी होण्याची इच्छा नसल्यास, पीक नोंदणीच्या अंतिम तारखेच्या ७ दिवस आधी, त्यांनी संबंधित बँकेच्या व्यवस्थापकाला विहित नमुन्यात लेखी नकारपत्र दिल्यास, त्यांना पीक विमा योजनेतून वगळले जाईल. नोंदणीसाठी शेतकऱ्यांकडे फ्रुट्स आयडी असणे आवश्यक आहे.शेतकरी त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेत, सहकारी संस्थेत, ग्राम-वन केंद्रात (सामान्य सेवा केंद्र) विम्याचा हप्ता भरून पीक विम्यासाठी नोंदणी करू शकतात.निपाणी भागातील भात, सोयाबीन, शेंगा, शाळू या पिकांसाठी पिकविमा योजनेचा लाभ घेता येणार आहे.

# गोकाक धबधब्यावर रोपवे बांधण्यात येणार

## मंत्रीमंडळ बैठकीत निर्णयाची शक्यता

बेळगाव,ता.१७(प्रतिनिधी)–

**राज्य सरकारने गोकाक धबधब्यावर रोपवे बांधण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. वित्त विभागाने मंजुरी दिल्यानंतर, या महिन्यात होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळण्याची शक्यता आहे, असे पर्यटन मंत्री के.जे.जॉर्ज यांनी सांगितले.**

गोकाकला राज्यातील एक प्रमुख पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे आणि रोपवेच्या बांधकामामुळे पर्यटनाला नवी चालना मिळेल. यामुळे स्थानिक व्यापार, रोजगाराच्या संधी आणि आर्थिक घडामोडींनाही मदत होईल, असे म्हटले जाते.सार्वजनिक बांधकाम मंत्री सतीश जारकीहोळी यांचे अनेक वर्षांपासूनचे हे एक प्रमुख स्वप्न होते की हा प्रकल्प साकार व्हावा. आता या प्रकल्पाला सरकारकडून मंजुरी मिळण्याचा टप्पा गाठल्याने गोकाक परिसरातील लोक आनंदी आहेत.

रोपवे प्रकल्पाला मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर कामाला सुरुवात होण्याची अपेक्षा असून, गोकाकमधील पर्यटन विकासात हा एक नवीन मैलाचा दगड ठरेल, अशी नागरिकांना आशा आहे.

# पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

## * खरेदी विक्री *

**फेडरल बँक,** गिरनार अपार्टमेंट फ्लॅट विकणे आहे व तसेच हिरा पन्ना लस्सीसमोर (बेसमेंट गाळा) आरसीसी १२५० फुट विकणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**१ ते ५ गुंठ्याचे** प्लॉट उपलब्ध, शेती पुरक व्यवसाय (गोठ्यासाठी) फार्म हाऊस इ.साठी उपयुक्त. मो.९१३०९३२३६६.

**सर्व सोईनीयुक्त** प्रशस्त व सुसज्ज ३ बीएचके फ्लॅट विकणे आहे. श्रीकृष्ण रेसिडेन्सी, नवीन बाय शोरूम, सांगली रोड, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. ८८७९५०८५७२.

**मान्सून धमाका** किचन ट्रॉली लेटेस्ट असंख्य व्हरायटीज, बेडरूम, वार्डरोल फर्निचर, जुन्या ट्रॉली रिप्लेसमेंट रिपेअरी एकाच छताखाली. किचन सम्राट, इचलकरंजी. मो. ९८२२२४३६९३.

**प्लॉट विकणे** रूई, मानेनगर येथील सव्वा सहा गुंठेचा एनए प्लॉट ४ खोल्यांसह बोअर, लाईट सर्व सोईनीयुक्त. संपर्क- ९४२२०३२०९९.

**६८'' इंची- ६०'' इंचीचे** बिमे चालवणारा कारखानदार पाहिजे. संपर्क-७७९६७७३३११, सावंत, हत्ती चौक, इचलकरंजी.

**गाळा विकणे आहे.** बेसमेंट ४०० स्क्वे. फूट महालक्ष्मी नगर, सी-विंग, सांगली रोड, इचलकरंजी. फोन- ९८२३१८१४४८

**कबनूर येथे** दिड गुंठा १६ मागाची रिकामी आरसीसी शेड ५८ बाय २६ एनए प्लॉट व १ बीएचके राहणेस विकणे आहे. ८७८८०३३७९२

**जुने व नवीन** पॉवरलूम देवू व घेवू तसेच फवारा, कांडी मशिन, डक्टींग घेवू व देऊ. मो. ८३१७२९१००८.

**रोज कपडे वाळत** घालण्याचे हॅंगिंग स्टॅन्ड, डासांची जाळी, किचन ट्रॉली, कबुतर जाळी, राहूल एंटरप्राईजेस-७५०७७१६६६४, ७७५८९३४१६५

**१ बीएचके** आरसीसी घर विकणे आहे, कबनूर, जागा ८९० स्क्वे.फूट, बांधकाम ८०० स्क्वे. मो. ९८६०४८११८०. वेळ १० ते १, दु. ४ ते ७.

**विकणे आहे** Pc Open End खरड विकणे आहे. संपर्क - ९७६६५५९२३४.

## * कर्ज विषयक *

**जागा घेवून** बांधकाम करण्यासाठी तसेच असेसमेंट उतारा व घरफाळा पावतीवर होमलोन किंवा तारण कर्ज मिळेल. पत्ता- रजिस्टर ऑफिस समोर, गाळा नं. ८. संपर्क- ९१४५७५३८१०.

**श्री असोसिएटस फायनान्शियल** कन्सलटंट पर्सनल लोन, व्यवसाय कर्ज, गृहकर्ज, शेती कर्ज, वाहन कर्ज, कॅश क्रेडिट (सी.सी.) मालमत्ता तारण कर्ज, एमएसएमई कर्ज, प्रोजेक्ट लोन, बॅलेन्स ट्रान्स्फर, टॉपअप लोन, टेक ओव्हर लोन, शैक्षणिक कर्ज, पत्ता- रत्नप्लाझा बिल्डींग, आमराई रोड, जी-१ शॉप, महासत्ता चौक, इचलकरंजी. मो. ९५११९९५१७९, ९५११९९६१३६.

## * बोअर विषयक *

**राज बोअरवेल** आमचेकडे ४।। व ६।। इंची बोअरवेल तसेच आर्थिंगची कामे माफक दरात करून मिळेल. मो. ९६०४०३५६८७, ९४२०३५३६८७.

## * व्यवसाय विषयक *

**आंतरराष्ट्रीय ब्रॅन्ड कंपनीमध्ये** करिअर करण्याची सुवर्णसंधी करिअर करण्यासाठी सुवर्णसंधी. उत्पन्न सोबत ४ फॉरेन टूर इ. मिळवा. वयाची, शिक्षणाची अट नाही. मो. ७२४९१७२८५८

## * नोकरी विषयक *

**URGENT HIRING-YADRAV.** "PARVATI INDUSTRIS" 1) QUality Engineer-2, Positions (3-4 Years) 2) Quality Inspector-2, Positions (1-2 Years) 3) CNC/VMC/HMC Operator- 8 Positions (0-1 Years) 9764780101, hr@gmtcpl.com

**झेरॉक्स दुकानात** पार्टटाईम लेडीज ऑपरेटर पाहिजे. सकाळी १० ते २.००, धनश्री जंबो झेरॉक्स, मो. ८६२४९२६४४६.

**अनुभवी व्हीएमसी** ऑपरेटर व सुपरवायझर पाहिजेत. आकर्षक पगार, गणेशनगर ७ वी गल्ली, इचलकरंजी. मो. ९४२३०४१०२०, ९७६३४१४३३८.

**पाहिजेत** १) पॅकींग कामाकरीता महिला-१० (आणणे व सोडणे गाडीची सोय आहे.) २) बेकरी मशिन मेंटनन्सकरीता - ४, आयटीआय फिटर, इलेक्ट्रीशियन, अनुभवी. ३) ड्रायव्हर-४, टी.आर. लायसन आवश्यक. ४) डिस्पॅच करीता मुले-४, १२ वी, अनुभवी. मो.९७६६२५६६५५.

**ड्रायव्हर पाहिजे** छोटा हत्ती मालवाहतूक गाडीवर अनुभवी व हुशार लायसनधारक (एलएमव्ही-टीआर) ड्रायव्हर पाहिजे. मो. ९८९०२२०९४३, ७५१७५०६६८२

**कॉम्प्युटर ऑपरेटर** महिला स्टाफ पाहिजे. मराठी व इंग्लिश भाषेचे ज्ञान असले पाहिजे. मो. ९१४५०१८७५७.

**हेअर ऑईल** विक्री करीता सेल्समन पाहिजेत. फिरतीची आवड व स्वत:ची दुचाकी असणे आवश्यक. मो. ९६३७७४५४४६.

**सेल्समन पाहिजे** इलेक्ट्रीक दुकानात कौंटरवर शिकाऊ किंवा अनुभवी समक्ष भेटा. महालक्ष्मी इलेक्ट्रीकल्स वरचे दुकान, राणी बागेजवळ. ९०११९४२१६९.

**दिवाणजी पाहिजे** इलेक्ट्रीक दुकानात वसुलीसाठी हुशार व अनुभवी दिवाणजी पाहिजे. समक्ष भेटा- महालक्ष्मी इलेक्टीकल्स, वरचे दुकान, राणी बागेजवळ, ९०११९४२१६९.

**कपड्याच्या शोरूममध्ये** अनुभवी सेल्समन आणि मॅनेजर पाहिजे. जेन्टस् किंवा लेडीज,आकर्षक पगार व सोयी. गांधी पुतळ्याजवळ, इचलकरंजी. मो. ८६६८९४५३५५.

**ऑफिस कामाकरीता** इंग्रजी लिहता+वाचता येणे आवश्यक आहे. मुलगा पाहिजे, टॅली ऑपरेटरना प्राधान्य. ९८२२४३३४२६.

**ऑफिसबॉय पाहिजे** टू व्हिलर आवश्यक वय १८ ते ४५ पर्यंत. संपर्क- एकता ग्रुप, जुना बस स्टॅण्ड, इचलकरंजी. मो. ९४२२०४३३१३.

**मार्केटिंग व सुपरव्हिजनसाठी** बांधकाम क्षेत्रामधील अनुभवी व्यक्ती पाहिजेत. कागल एमआयडीसी येथील आरसीएम प्लॉटकरीता. मो. ९५७९५५३२१६.

**पाहिजे लेडीज** अकौंटट, टॅली प्राईम अनुभवी/फ्रेशर. मो. ९२२५८०६०९९, ८८८८६६०७८९.

**Wanted**- Full Time Accountant. B.Com/M.Com, Experience 5 to 10 Years Knowledge of IT/GST Must Salary as per Company Rule. Contect 9422043659.

**स्वयंपाकासाठी बाई** पाहिजे. शुध्द शाकाहारी, तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९०४९९५४४२४.

**पारले बिस्कीट** एजन्सीमध्ये गाडी भरणे, उतरणे कामासाठी लोडर मुलगा पाहिजे. १८ ते २५ वयोगटातील. मो. ८७८८८९२१७७, ८६९८२८७३९७.

**सोमनाथ नागरी** सह पतसंस्थेच्या शाखा इचलकरंजी येथे क्लार्क व शिपाई नेमणे आहे. इच्छुक उमेदवारांनी खालील नंबरवर संपर्क साधावा. मो. ८३८०९५०६४४.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

**कामगार पाहिजे** लाकडी कोळसा भरणेसाठी स्त्री/पुरूष पाहिजे. योग्य पगार दिला जाईल. प्रत्यक्ष भेटा, आण्णासो पिरगोंडा पाटील (कोळसा वखार), सारडा कापड दुकानासमोर, गावभाग, इचलकरंजी. मो. ९८८१२०११२६.

**परमीट रूम** व बारसाठी अनुभवी वेटर व साफ सफाईसाठी पाहिजेत. समक्ष भेटा. मो. ९७६७४९९५४०.

**शिक्षिका पाहिजेत** एसआयपी अकॅडमीमध्ये फुल टाईम व पार्ट टाईम, पात्रता- पदवीधर, लहान मुलांना शिकवण्याची आवड असलेली विशेष प्रशिक्षण दिले जाईल (अनुभव असल्यास प्राधान्य) पत्ता- अनंत प्लाझा, आर. के. टॉकीजजवळ, इचलकरंजी. मो. ९०२११२३९७४.

**नारायणी फुडस्‌मध्ये** गरजू कामगार हवा आहे. पत्ता- सांगली रोड, झुडिओ शेजारी ९३०७९८५८१३.

**पाहिजेत लेसर्स** एमआयसी वरती ऑपरेटर-०१ अॅटोकॅड ड्राफ्टमॅन-०१, हेल्पर्स-०४ भरती करणे आहे. भेटा-परफेक्ट लेसर्स, कोरोची, ८७९३५४४४९७, ९३२६१०७६४४.

**पाहिजे हार्डवेअर** दुकानात कामासाठी बिलिंगसाठी कॉम्प्युटर ऑपरेटर जेन्टस् पाहिजे. उमिया हार्डवेअर मार्ट, वखार भाग, इचलकरंजी. मो. ९९६०९१५९१९.

**मिल स्टोअर्स** दुकानात अनुभवी शिकाऊ कामगार पाहिजे. नारायण पेठ, इचलकरंजी. मो. ९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३.

**टेक्स्टाईल युनिटमध्ये** सुपरवायझर या पदासाठी उमेदवार पाहिजेत. पगार १५००० ते २५००० रूपये, पुढील नंबरवर फोन करून त्वरीत भेटावे. ९८९०१२१०४२, पत्ता- प्राईड इंडिया टेक्स. पार्क, तारदाळ २) रूई फाट्याजवळ, रूई.

**सिक्युरिटी गार्ड** पाहिजेत. आकर्षक पगारासह डे/नाईट, फिक्स ड्युटी, कोरोची, शाहू पुतळा, शहापूर, इचलकरंजी परिसर. मो. ९६८९५६४००४, ९३२६६३३४४५.

**वार्पर पाहिजेत.** बेळगावमध्ये साडी बीम ओढणेसाठी वार्पर पाहिजेत. बिमावर मजूरी, भरपूर काम मिळेल. अंदाजे पगार दरमहा ३०,००० ते ५०,००० अनुभवी वार्परांनी संपर्क साधावा. मे. पी. ए. चौधरी अॅण्ड सन्स, बेळगाव. ९४४८०१३७८१.

**डिजीटल बँक** अॅप्लीकेशनच्या प्रमोशनसाठी मुले/मुली पाहिजेत. १२ वी ग्रॅज्यएट, एमबीए वाल्यांना प्राधान्य. सध्याच्या कामासोबत करू शकता. (वय १८ ते ३५) ७७५८०७७६८७

**रंगाच्या दुकानात** कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- नवभारत पेंटस, बंगला रोड, इचलकरंजी. फोन-९८२३१८१४४८

**ग्राफिक डिझायनर** व ऑफिस कामासाठी अनुभवी मुलगी पाहिजे. कोरल, सॉफ्टवेअर येणे आवश्यक. वेळ-१० ते ७. संपर्क- ९२७०२०९७५४

**प्लॅस्टिक कंपनीमध्ये** मटेरियलच्या मार्केटिंगसाठी सांगली, कोल्हापूर, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यासाठी शिकावू/अनुभवी उमेदवार पाहिजेत. ९९६०३६६९४३, ९४०४४२७८८०

**गोडावून किपर पाहिजे.** वस्तूंची आवक-जावक नोंदी ठेवणे, स्टॉक मेन्टेन करणेसाठी शिक्षण- किमान दहावी, वयोमर्यादा १८-३५ वर्षे. कॉम्प्युटर नॉलेज आवश्यक. संपर्क-९९६००९९८७६ (वेळ-सकाळी ९ ते १२ पर्यंत)

**अनुभवी सिव्हील** इंजिनिअर पाहिजे. ड्राईंग आणि साईट कामाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. इचलकरंजी. संपर्क- ९८२२१८७१९९

**सेवासदन निरामय प्रा.लि.** इचलकरंजी येथे तातडीने भरती. मेंटेनन्स मॅनेजर-०१ पद- (आयटीआय), ड्रायव्हर-०१ पद. संपर्क-८९७५९६६०५५, ९२२६५०८८५९

**नविन फर्मसाठी जागा भरणे आहे.** १) अकौंटंट-१, २) सेल्समन-४, ३) क्लिरीकल बिलींग कामासाठी -३ ४) स्टॉक डिलीव्हरीसाठी मुले-३, ५) गोडावूनकिपर-३, ईएसआय/पीएफ सोय, अनुभवींना प्राधान्य.संपर्क-प्रो. संजय अवतार लाईफ केअर एलएलपी, एएससी कॉलेजजवळ, जिव्हाजी मंदिरसमोर, इचलकरंजी. ९७३००८५९७७. (भेटणेची वेळ- ११ ते १ अर्जासह)

**सीए फर्ममध्ये** शिकाऊ व संगणक/टॅली चे ज्ञान असणारी मुले/मुली पाहिजेत. संपर्क-८०८८२३५३२४. t9326141599@gmail.com

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये वेटर कामासाठी कामगार पाहिजे. जेवणाची व राहणेची सोय. संपर्क- ८९७५६९८४७४

**हॉटेल/फूड कार्टसाठी** अनुभवी व शिकाऊ मुले पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. संपर्क- ९८६०२६३०९८

**Orbit tree India Pvt. Ltd.** इचलकरंजी येथे बॅक आफिससाठी महिला व पुरुष कर्मचारी त्वरीत आवश्यक आहेत. पात्रता- संगणकाचे मुलभूत ज्ञान आवश्यक. संपर्क-८८८८२८२४४३

**इचलकरंजी येथील** नामवंत टेक्स्टाईल फर्ममध्ये एच.आर. पदाकरीता लेडीज अथवा जेंटस उमेदवाराची आवश्यक आहे. पूर्वी काम केले असल्यास अनुभवाच्या दाखल्या सहीत भेटावे. संपर्क- ९३७१०९२३६९

**पाहिजेत.** प्रोग्रॅमर व सीएनसी, व्हीएमसी ऑपरेटर १० वी/१२ वी/डीएमई आयटीआय व लेडीज ऑपरेटर पाहिजेत. हेल्पर पाहिजे. संपर्क-९६८९५८३४९५

**वधुवर सुचक ऑफिसाठी** लेडीज पाहिजे. शिक्षण किमान पदवीधर, शहापूर. फोन-९८२३४२५४०४

**इचलकरंजी छत्रपती संभाजी** महाराज चौक येथे इंग्रजी माध्यमासाठी बालवाडी व १ ली ते ५ वी साठी शिक्षिका पाहिजेत. संपर्क-८६५५१३७१७१, ८६८६१३७१७१

**कपड्याच्या दुकानात** अनुभवी जेंटस कामगार पाहिजेत. आकर्षक पगार व कमिशन देऊ. संपर्क- ८३९०५३४१४३, इचलकरंजी.

**लेडीज क्लार्क पाहिजे.** कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक अर्जासह भेटा. ओम मोटर्स, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**सेवा भारती** संचलित सेवा भारती औषधालय युनिट नंबर २ या मेडिकल करिता डी.फार्मा, बी. फार्मा या जागा भरावयाच्या आहेत. वेळ सकाळी ९ ते रात्री ९ असेल. तरी इच्छुकांनी आपले अर्ज ४/१८५, नाट्यगृह चौक येथे दि. २० जुलैपर्यंत जमा करावेत.

**इचलकरंजी येथे** मध्यवर्ती पेट्रोल पंपासाठी कामगार पाहिजेत. दु. ३ ते रात्री ११. कॉलेज करणाऱ्या मुलांना सुवर्णसंधी. पार्ट टाईम सुपरवायझर पाहिजे. सेवानिवृत्त चालेल.मो.९९२१०२३०६८.

**नेमणे आहे** एएनएम/जीएनएम रिसेप्नशिष्ट पाहिजेत. फुलटाईम-१, अर्जासहीत समक्ष भेटा. श्री स्किन केअर क्लिनिक. ९०२२००२१८१, ०२३०-२४२०३०५.

**घरी येऊन** शिकविणारे शिक्षक पाहिजे. इयत्ता ६ वी (सीबीएइई अभ्यासक्रम) शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुभवी आणि समर्पित घरगुती शिक्षक पाहिजे आहे. मो. ९६०४०३८८९८.

**ऑफिस कामासाठी** मुलगी किंवा महिला पाहिजे. इंग्रजी संभाषण कौशल्य आवश्यक. तसेच ११ वी, १२ वी करीता इंग्रजी व इतर विषयाकरीता शिक्षक आवश्यक. संपर्क- चंद्रशिला, इचलकरंजी. मो. ८६०५०७६५५५.

**रिटेल मेडिकल** दुकानासाठी फार्मासिस्ट मुलगा/मुलगी पाहिजे. संपर्क- ८४८५८८७९४९.

**पतसंस्थेमध्ये विवाहित** महिलांची अकौंटंट म्हणून नेमणूक करणेचे आहे. टॅली व कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक. मो. ७४४७४४५३८१, ७४४७४४५५६१.

**ऑफिस कामासाठी** १२ वी शिकलेली व कॉम्प्युटरची माहिती असलेली लेडीज पाहिजे. संपर्क- वर्धमान हौसिंग सोसायटी, महावीर जैन मंदिरसमोर, राँवका सदन, इचल. भेटण्याची वेळ- दुपारी ३ ते सायं. ७.

**छोटा हत्ती** (टाटा एस) गाडी चालविणेकरीता ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- तुषार इलेक्ट्रीकल्स, मो. ९५७९५५८५०९, ७०२०१५१४५५.

**केतन वाईन्स** हुपरी येथे खालील पदासाठी भरती सुरू आहे. कौंटर बॉईज ३ पदे, गोडाऊन बॉईज ३ पदे. संपर्क- ९८२२२४३२५६. संपर्क करण्याची वेळ- सकाळी ११ ते संध्याकाळी ७.

**पाहिजेत मेडिकल** (औषध दुकान) मध्ये काम करणेसाठी शिकाऊ व अनुभवी फार्मासिस्टची नेमणूक करणेची आहे. मो. ९३५६१८८५१०, ९८५८७११११७.

**मेकॅनिक पाहिजेत** टु व्हिलर गाड्यांच्या शोरूमकरीता मेकॅनिक पाहिजेत. अनुभवी किंवा शिकाऊ चालेल. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**कामगार पाहिजेत** टु व्हिलर गाड्यांच्या शोरूमकरीता वॉशिंगसाठी कामगार पाहिजेत. संपर्क- बोरगावे टीव्हीएस, शाहू पुतळ्याजवळ, इचलकरंजी.

**इलेक्ट्रॉनिक्स दुकानात** कामाकरीता सेल्समन/कामगार पाहिजेत. अनुभवी/शिकाऊ, मॉडर्न इलेक्ट्रॉनिक्स, सम्राट अशोकनगर, आवळे मैदानशेजारी, इचलकरंजी. मो. ९८९०५४७०७८.

**जेन्टस् कामगार** पाहिजेत- ऑफिस व इतर कामासाठी. संपर्क- ९६३१३१६०३०.

**पाहिजे लेडीज** ऑफिस स्टाफ. एक्सल, टॅली व अकौंटस् ज्ञान असणारी व व्हीएमसी ऑपरेटर अनुभवी. संपर्क- ग्रिनवेल इको प्रोडक्टस् प्रा.लि. प्रेम सागर, कापड मार्केट, इचलकरंजी. मो. ९३७०४१०४४९.

**कामगार पाहिजे.** हार बुकेच्या दुकानात कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्क- ८८८८२३१७३५, ९१२०९१७१७७, इचलकरंजी.

**साध्या सायझिंगमध्ये** वार्पर पाहिजेत. संपर्क-९०११७३५३८४, इचलकरंजी.

**पाहिजेत.** पावडर कोटींगसाठी हेल्पर लेडीज/जेंटस, सोओ२ वेल्डर, ऑरगन वेल्डर. संपर्क- विशाल इंडस्ट्रिज, खोतवाडी. ९१४६७६९६५६

**शिक्षिका पाहिजे** प्री प्राइमरी अनुभवी शिक्षिका पाहिजे. पत्ता- आभार फाटा, चंदूर. संपर्क- ९६२३१९८८३८.

**चार चाकी** गाडी शिकविण्यासाठी ड्रायव्हर (प्रशिक्षक) पाहिजे. संपर्क-श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**१२ वी टायपिंग** ३० व संगणक ज्ञान असणारी ऑफिस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क- श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**पीयुसी करिता** फुल टाईम संगणक ज्ञान असणारा कामगार (मुलगा) पाहिजे. संपर्क- श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**ऑफिससाठी मॅनेजर** पाहिजे. अनुभव व चार चाकी गाडी येणे आवश्यक. श्री बालाजी ड्रायव्हिंग स्कूल, हॉटेल स्टेटस इन शेजारी, इचलकरंजी. मो. ९८५०११४६६०.

**सिक्युरिटी गार्ड** १५०००+पगार, ८ तास ड्युटी. कागल एमआयडीसी व अंबपवाडी फाटा. ७४४७४०१८६७, ७४४७४०१८६२.

**कायझन व्हिल्स** या नामांकित शोरूममध्ये स्पेअर पार्ट एक्झीक्युटीव्ह व सिक्युरिटी गार्ड पाहिजेत. अनुभवींन प्राधान्य. ईएसआय/पीएफ सोय. मो. ९८८१७५९९९६.

**इचलकरंजीत फॉर्च्युन** फ्लाझाजवळ लहान मुलगी सांभाळण्यासाठी महिला पाहिजे. पगार २५०० रूपये महिना. कामाची वेळ सकाळी ७.३० ते सकाळी १० वाजेपर्यंत. मो. ७३५०७५८७८७.

**अनुभवी व निर्व्यसनी** ड्रायव्हर पाहिजे. मो. ७७२००१८४०६.

**मोफत कॉम्प्युटर** प्रशिक्षण योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू. १००% नोकरी व व्यवसायभिमुख प्रशिक्षण Graphic Design, ms-office, Tally Prime, Advance Excel कोर्सेसना प्रशिक्षण, नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर, पत्ता- इचलकरंजी बस स्टॅण्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, इचलकरंजी. मो. ९२८४२६४९८०.

**पाहिजेत** १) सीएनसी/व्हीएमसी ऑपरेटर-०६, २) शिफ्ट सेटिंग सुपरवायझर -०२ ३) लाईन इन्स्पेक्टर-०२ ४) लेडीज कामगार इन्स्पेक्टर-०५, संपर्क- ८०८७७५७१७१.

### छोटी जाहीरात मोठा प्रतिसाद

## * भाड्याने देणे/घेणे *

**३ रूम** सर्व सोईनीयुक्त भाड्याने देणे आहे. महासत्ता चौक, जामा मस्जिद जवळ, इचलकरंजी. मो. ९९२१४४६९८५.

**१ बीएचके**/२ बीएचके सर्व सोईनीयुक्त ग्राऊंड फ्लोअर, बोअरसह भाड्याने देणे. गुरू कन्ननगर, इचलकरंजी. मो. ९४२०७७६२६८.

**२ बीएचके घर**, ३ बीएचके फ्लॅट, १ बीएचके चे २ फ्लॅट गहाणवट देणे आहे. ९०२८९०८८५२, भेटण्याची वेळ- दुपारी ४ पासून.

**सर्व सोईनीयुक्त** १ बीएचके घर भाड्याने देणे आहे. सुदर्शन चौक, हत्ती चौक, राम मंदिरजवळ, इचलकरंजी. मो. ८०८७२९०४४१.

**स्टेशन रोड, कॅबसन** हॉटेल शेजारी, १५ बाय १५ रेडी गाळा, खाद्य विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त, भाड्याने देणे आहे. मे. ९०३९६९३९६९.

**मेन रोड,हिंदुस्थान** हार्डवेअर समोर ३०० फुट गाळा फर्निचरयुक्त खाद्य विक्री, कापड विक्री व कॉस्मेटिकसाठी उपयुक्त. भाड्याने देणे आहे. मो. ९०३९६९३९६९.

**२ बीएचके** फ्लॅट किंवा रो हाऊस भाड्याने पाहिजे. सांगली रोड परिसरात (एजंट क्षमस्व). संपर्क- ९९२१४८५११४.

**गोडाऊन भाड्याने** देणे १५७० स्क्वे.फूट पोटमाळासहीत सर्व सोईनीयुक्त तीन बत्ती चौक, इचलकरंजी. मो. ८६६८५१०९९१.

**गर्ल्स हॉस्टेलकरीता** भाड्याने देणे आहे. फक्त मुलींसाठी कॉट बेसीसवर रूम मिळेल. पत्ता- काँग्रेस कमिटीमागे, इचलकरंजी. मो. ९८९०९२३२३६.

**२७ बाय ६५** रिकामे शेड भाड्याने देणे आहे. जय सांगली नाका,इचलकरंजी. मो. ९७६६६०६७१३.

**सर्व सोईनीयुक्त** सिंगल रूम भाड्याने देणे. सर्व्हिसवाल्यांना प्राधान्य. फॉर्चुन प्लाझा समोर, बालाजी कॉलनी, गल्ली नं. २, इचलकरंजी. ९६०४४७३६२३.

**सर्व सोईनीयुक्त** प्रशस्त बंगला भाड्याने देणे. ३ मास्टर बेडरूम, २ कारसाठी पार्किंग, २४ तास पाणी, स्टार नगर, यड्राव फाटा, शहापूर. ९२८४९८७५७६, ८०५५१६१४८५.

**पहिल्या मजल्यावर** ६०० स्क्वे.फूट हॉल भाड्याने देणे आहे. नारायण पेठ, इचलकरंजी. मो. ९७६२२६८९९३, ९४२२०४३७४३.

**३ बीएचके स्वतंत्र बंगला** भाड्याने देणे आहे. सर्वसोयीनियुक्त हायफाय शिवाजीनगर कोरोची, चिंतामणी, गणेशमंदिरजवळ. ७०३८६८४९८७, ८४८३८१४६८३

**मंगळवार पेठ परिसरात** सर्वसोयीनियुक्त फॅमिलीसाठी २ रूम व विद्यार्थ्यांसाठी कॉट बेसिसवर आरसीसी रूम भाड्याने देणे. मो. ९९२१२९९१५०, ९८८१८१४२८७

**२ बीएचके** सर्व सोयीनियुक्त बंगलो पहिला मजला भाड्याने देणे आहे. (शाकाहारीसाठी) यशोलक्ष्मी मंगल कार्यालयाजवळ इचलकरंजी. फोन-९८२२८६०२३६, ७८४१८८०००९

**रूम भाड्याने** देणे आहे. ऑफिस भाड्याने देणे आहे. धान्य ओळ, फेडरल बँकेसमोर, इचलकरंजी. मो. ९४२२४२४००७, ९४०४२५९७०१.

**सर्वसोईनीयुक्त** २ बीएचके बंगला भाड्याने देणे आहे. इंदिरा हौसिंग सोसायटी, इचलकरंजी. मो. ९८८१२२२२४३.

**डी मार्टजवळ,** संभाजी चौक येथे पहिल्या मजल्यावरील ९ बाय १७ गाळा अॅटॅच टॉयलेट बाथरूमसहीत ऑफिस, पेढी,ओपीडी साठी भाड्याने देण्याचे आहे. मो. ८८०५९०३८७८, ८८८८४४०००६.

**गोडाऊन भाड्याने देणे.** ३००० स्क्वे. फूट शांतीनगर, थोरात चौक, इचलकरंजी. ९९६०२५४८०१

**मुलांसाठी किंवा** मुलींसाठी ५० बेडचे ६००० स्क्वे. फूट जागेमध्ये पूर्ण तयार वस्तीगृह भाड्याने देणे आहे. मो. ७४९८१८४१३७.

**जागा व शेड** भाड्याने देणे आहे. २२०० स्क्वे.फूट. ८८८८३०००३८, सुतार मळा, इचलकरंजी.

**जनता बँकेपासून** जवळच नारायण पेठमध्ये सर्वसोईनीयुक्त आरसीसी गाळे भाड्याने देणे. मो. ९३७२०६६८८३, ९७६४७११३५०.

**१ बीएचके** भाड्याने देणे. सांगली नाका टीव्हीएस शोरूममागे, यड्राव, मो. ७४४७६५७६७६, ९६०४६१७७८४.

**१ बीएचके** भाड्याने देणे आहे. छोट्या कुटुंबासाठी, हत्ती चौक, इचलकरंजी. मो. ९६५७८३९९३९, ९६२३१०१६५०.

**भाड्याने देणे** वन (हॉ.की) टॉयलेट-बाथ अॅटॅच छोट्या कुटुंबाकरीता, स्टॅण्डर्ड एरियामध्ये, मारूती शोरूम जवळ, को. नाका. ९६६५४०८८२८.

## * वर पाहिजे *

**वर पाहिजे.** गरीब घरची मुलगी १२ वी २८ घरगुती पॅकिंग १२०००/- आई वडील नाही. आजी बाबाकडे राहते. आजीची प्रकृती ठिक नाही. त्वरीत विवाह. अपेक्षा कष्टाळू, समजूतदार मुलगा हवा. जातीची शिक्षणाची अट नाही. ७३५०५८९२८४

*मुर्शिदाबाद,ता.१७ – पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात पहाटे रेल्वे रूळ ओलांडणाऱ्या स्कूल व्हॅनला पॅसेंजर रेल्वेने धडक दिल्याने तीन शाळकरी विद्यार्थी व एका सायकलस्वारासह पाचजणांचा मृत्यू झाला.कर्णसुवर्ण स्टेशन जवळील गोविंदपूर रेल्वे गेटवरील घटनेत चौघे गंभीर जखमी झाले.

# नंदवाळ यात्रेसाठी प्रशासन सज्ज; भाविकांना सुविधा देण्यावर भर द्यावा

■ कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी) –

**नंदवाळ हे प्रति पंढरपूर म्हणून राज्यभर प्रसिध्द असून, आषाढी एकादशीनिमित्त येथे लाखो वारकरी आणि भाविक श्री विठ्ठल-पांडुरंगाच्या दर्शनासाठी येतात. या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांच्या उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक झाली.**

बैठकीत वाहतूक नियोजन, आरोग्य सेवा, रुग्णवाहिका, वैद्यकीय पथके, औषधसाठा, आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठीची यंत्रणा, स्वच्छता, सार्वजनिक स्वच्छतागृहे, सुरक्षित अन्नपुरवठा, अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी, अखंड वीजपुरवठा तसेच भाविकांसाठी आवश्यक नागरी सुविधांचा आढावा घेण्यात आला.

आम. चंद्रदीप नरके म्हणाले, आषाढी एकादशीसाठी नंदवाळमध्ये येणाऱ्या प्रत्येक वारकरी आणि भाविकाला कोणतीही अडचण येता कामा नये. पायी दिंडी मार्गावरील सुविधा, वाहतूक व्यवस्था, वैद्यकीय सेवा, रुग्णवाहिकांची उपलब्धता,औषधसाठा, स्वच्छता आणि वीजपुरवठा यामध्ये कोणतीही त्रुटी राहू नये. सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करून भाविकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी. जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनीही संबंधित विभागांना आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, प्रांताधिकारी मौसमी चौगुले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी मनोज ओतारी, करवीर तहसीलदार स्वप्नील पवार, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता अजित अस्वले, सहाय्यक गटविकास अधिकारी अविनाश मेश्राम, कोल्हापूर महानगरपालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक जयवंत पवार, जिल्हा वैद्यकीय अधिकारी डॉ. सुशांत रेवडेकर, किरण कागलकर, ए. बी. सानप, पन्हाळा पंचायत समितीचे सभापती रवींद्र पाटील, अजित पाटील, नंदवाळच्या ग्रामविकास अधिकारी प्रियंका पाटील, सरपंच अमर कुंभार, तानाजी कांबळे, नंदवाळ विठ्ठल मंदिरचे व्यवस्थापक भीमराव पाटील, बबन पाटील, संदीप उरमाले, विठ्ठल मंदिर व्यवसाय समितीचे सदस्य तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# २०२९ नंतर राज्यात राजकीय बदल अटळ

## जयंत पाटील महायुतीत जाणार नाहीत : आम.सतेज पाटील

■ कोल्हापूर, ता. १७ (प्रतिनिधी)–

**राज्यातील सध्याचा कठीण राजकीय काळ लवकरच संपेल आणि २०१९ नंतर राज्याच्या राजकारणात बदल होईल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व घटकांनी एकजुटीने राहण्याची गरज आहे. शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा आणि यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय-सामाजिक वारशाचा वारसा पुढे नेणारे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे महायुतीसोबत जाण्याचा कोणताही निर्णय घेणार नाहीत. ते आमच्यासोबतच राहतील, असा विश्वास काँग्रेसचे विधान परिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी शुक्रवारी व्यक्त केला.**

नीट परीक्षा घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असून, शिक्षण व्यवस्थेतील त्रुटींविरोधात सोनम वांगचुक यांचे आंदोलन सुरूच आहे. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करण्याची केंद्र सरकारची भूमिका अयोग्य असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतल्याने आकाश कोसळणार नाही, असे ते म्हणाले.

राज्याला स्वतंत्र गृहमंत्र्याची आवश्यकता असल्याची भूमिका आपण यापूर्वीही मांडली होती, याची आठवण करून देत पाटील म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे असलेले गृहखाते प्रभावीपणे चालत नसल्याचे दिसून येत आहे. गृहखाते कमकुवत झाल्याने गुन्हेगारांचे धाडस वाढले असून, भरदिवसा गोळीबाराच्या घटना घडत आहेत. पोलिसांचा धाक उरलेला नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

पाटील म्हणाले, शक्तिपीठ महामार्गाविरोधात गेली अडीच वर्षे शेतकरी रस्त्यावर आहेत. तरीही विधिमंडळात या विषयावर चर्चा होऊ न देणे, ही सरकारची हुकूमशाही वृत्ती आहे. मुख्यमंत्री विठ्ठलाच्या चरणी शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी प्रार्थना करतात; मग या महामार्गामुळे शेतकऱ्यांचे नेमके काय भले होणार, हे त्यांनी स्पष्ट करावे. विठूमाऊलीने मुख्यमंत्र्यांना हा महामार्ग कायमचा रद्द करण्याची सुबुद्धी द्यावी, अशी प्रार्थना आम्ही करणार आहोत.

आता शासन विठ्ठलाचे तरी ऐक्ते का, हे पाहावे लागेल, असा टोला त्यांनी लगावला. एका बाजूला सरसकट कर्जमाफीची घोषणा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला अनेक जाचक अटी घालून शेतकऱ्यांना त्यापासून दूर ठेवले जाते. अटींचा भडीमार करून त्याला सरसकट म्हणणे योग्य नाही. सरकारच्या घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये मोठी मिसिंग लिंक असल्याने शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याची टीकाही त्यांनी केली.

# दुबार ठरावांवरील अहवालही विभागीय उपनिबंधकांकडे

■ कोल्हापूर, ता.१७(प्रतिनिधी)

**गोकुळ दूध संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीची प्रक्रिया निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, सभासदत्व रद्द करण्याबाबत कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आलेल्या ४१० दूध संस्थांचा समावेश असलेली प्रारूप मतदार यादी सोमवारी विभागीय उपनिबंधक (दुग्ध), पुणे यांच्याकडे पाठविण्यात येणार आहे. या संस्थांवरील सुनावणीची प्रक्रिया सुरू असली तरी निवडणुकीचे वेळापत्रक अबाधित ठेवत पुढील कार्यवाही सुरू ठेवण्यात येणार आहे.**

प्रशासकीय मंडळाने ४१० दूध संस्थांना त्यांचे सभासदत्व रद्द का करू नये, याबाबत कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. त्यानंतर या संस्थांकडून खुलासे मागविण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, निवडणूक कार्यक्रमानुसार सहाय्यक दुग्ध निबंधक कृष्णा ठाकरे यांच्या माध्यमातून प्रारूप मतदार यादी विभागीय उपनिबंधक (दुग्ध) पुणे यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

याचबरोबर, निवडणुकीसाठी दुबार ठराव दाखल केलेल्या ५६ दूध संस्थांबाबत झालेल्या सुनावणीचा अहवालही प्रारूप मतदार यादीसोबत पुण्याला पाठविण्यात येणार आहे. या अहवालाच्या आधारे दुबार ठरावांची वैधता तसेच कारणे दाखवा नोटिसा देण्यात आलेल्या ४१० दूध संस्थांबाबत अंतिम निर्णय विभागीय उपनिबंधक (दुग्ध) पुणे घेण्याची शक्यता आहे.गोकुळच्या निवडणुकीतील पुढील घडामोडी या निर्णयावर अवलंबून राहणार असल्याने सर्वच राजकीय गट, इच्छुक उमेदवार आणि दूध संस्थांचे लक्ष पुण्याकडे लागले आहे.

# नवे पारगांवला म.गांधी मेडिकल कॉलेजची पायाभरणी

## एमबीबीएस महाविद्यालयामुळे दर्जेदार आरोग्य सुविधा मिळणार

■ भादोले,ता.१७(वार्ताहर)– ग्रामीण भागातील नागरिकांना अत्याधुनिक व दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या दारात उपलब्ध करून देतानाच वैद्यकीय शिक्षणासाठी नवे दालन खुले करणाऱ्या महात्मा गांधी चॅरिटेबल मेडिकल ट्रस्ट संचलित एमबीबीएस वैद्यकीय महाविद्यालय व अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी रुग्णालयाच्या भव्य प्रकल्पाची पायाभरणी नवे पारगांव (ता. हातकणंगले) येथे वारणा समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे यांच्या हस्ते झाली.



नवे पारगाव येथील समारंभाप्रसंगी बोलताना आम. डॉ. विनय कोरे.समोर उपस्थित मान्यवर.

आम.डॉ. विनय कोरे म्हणाले, दर्जेदार वैद्यकीय सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देणारा हा प्रकल्प वारणा परिसरातील ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील ऐतिहासिक टप्पा ठरणार आहे. यासोबतच एमबीबीएससारख्या वैद्यकीय शिक्षणाची सुवर्णसंधीही निर्माण होणार आहे.

प्रास्ताविकात प्रा. जीवनकुमार शिंदे यांनी, महात्मा गांधी हॉस्पिटलमध्ये विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ, अल्पदरातील उपचार सुविधा देण्यात येणार असल्याचे सांगितले.

यावेळी विकास गायकवाड, राजकुमार जाधव, डॉ. अनुराधा सूर्यवंशी, डॉ. सतीश पाटील आणि डॉ. किरण पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

समारंभास जि. प. शिक्षण सभापती शितल यादव, जि.प. सदस्य अमरसिंह पाटील, माजी जि.प. सदस्य सर्जेराव पाटील– पेरीडकर, जनसुराज्य शक्तीचे प्रदेशाध्यक्ष समीत कदम, कर्णसिंह गायकवाड, वारणा दूध संघाचे अध्यक्ष एच. आर. जाधव, उपाध्यक्ष ॲड. एन. आर. पाटील, वारणा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रतापराव पाटील, वारणा बँकेचे उपाध्यक्ष उत्तम पाटील, वारणा विद्यापीठाचे कुलाधिकारी एन. एच. पाटील, कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, व्ही.व्ही. कार्जिनी, डॉ. शिल्पाताई कोठावळे, किशोर पाटील, प्राचार्य डॉ. हरीष कुलकर्णी यांच्यासह संचालक, विविध संस्थांचे प्रतिनिधी, सभासद आणि कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रा.नामदेव चोपडे यांनी मानले.

# जयवंत महाविद्यालयात क्रिएटिव्हिटी क्लब चॅम्पियन प्रशिक्षण कार्यशाळा

■ तारदाळ,ता.१७ (वार्ताहर) प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन, (कोल्हापूर) यांच्या वतीने शहापूर येथील जयवंत महाविद्यालयात क्रिएटिव्हिटी क्लब चॅम्पियन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलता, नेतृत्वगुण, संवादकौशल्य, समस्या सोडविण्याची क्षमता आणि विकसित करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजिली होती.



जयवंत महाविद्यालयात क्रिएटिव्हिटी क्लब चॅम्पियन प्रशिक्षण कार्यशाळेप्रसंगी घेतलेले छायाचित्र.

कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना विविध कृतीआधारित उपक्रम, गटचर्चा, सर्जनशील खेळ आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले. प्रत्येक उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यशाळेसाठी प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या वतीने क्रिएटिव्हिटी कॉर्डिनेटर शीतल कांबळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हातकणंगले तालुका मेंटॉर निता आवळे यांनी एज्युकेशन फाऊंडेशनच्या विविध शैक्षणिक व कौशल्य विकास उपक्रमांची माहिती देत विद्यार्थ्यांना भविष्यातील संधींचा लाभ घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास डॉ.वसंत भागवत, डॉ.माधुरी खोत, डॉ.कपिल राजहंस, डॉ.आवळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांना सर्जनशील विचार, नवोपक्रम आणि कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देत अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी होण्याचे आवाहन केले. कार्यशाळेत उत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रिएटिव्हिटी क्लब चॅम्पियन म्हणून प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या प्रशिक्षण कार्यक्रमांला प्रतिसाद दिला.

# शिरोळ तालुक्यात पावसाची दडी; खरीप पिके वाळू लागल्याने चिंता

जयसिंगपूर, ता.१४(प्रतिनिधी) शिरोळ तालुक्यात जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या दमदार पावसानंतर आता पावसाने अचानक दडी मारल्याने शेतकरी पुन्हा संकटात सापडला आहे.पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्यामुळे खरीप हंगामातील पिके कोमेजू लागली असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

जुलैच्या सुरुवातीला झालेल्या जोरदार पावसामुळे रखडलेल्या पेरण्या पूर्ण झाल्या. सोयाबीन, भुईमूग तसेच इतर खरीप पिकांची मोठ्या प्रमाणात लागवड करण्यात आली. पेरणीनंतर पिकांची उगवणही चांगली झाली. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण होते.तालुक्याच्या पश्चिम भागातील अनेक शेतजमिनी पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहेत.सध्या शेतात उगवलेली पिके पाण्याअभावी वाळू लागली असून पुढील दोन ते चार दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास खरीप पिकांना मोठा फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते. मात्र आता पुन्हा पावसाने दडी मारल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला असून सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

# युवकास बेदम मारहाण

■ सांगली,ता.१७ (प्रतिनिधी)– शहरातील भारती हॉस्पिटलच्या पाठीमागे असणाऱ्या गवळी गल्लीत राहणाऱ्या तिघांनी एका युवकास लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या महिलांचे व्हिडिओ काढू नको असे सांगितल्याचा राग आल्याने संशयितांनी हे कृत्य केले. मारहाणीत सियोन समसन केदारी (वय १८ रा. गवळी गल्ली, सांगली) हा जखमी झाला आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलीसात नोंद झाली आहे.

फिर्यादी सियोन केदारी हा महाविद्यालयात शिकत आहे. बुधवारी सायंकाळी ७ च्या सुमारास तो घराशेजारील कट्ट्यावर बसला होता. त्यावेळी तेथे संशयित यश बाळू भोसले (वय २०), सुमित बाळू भोसले (२४) आणि संदेश प्रमोद सावळजकर (१८ तिघेही रा. गवळी गल्ली, सांगली) हे आले. यावेळी फिर्यादी केदारी याने तिघांना रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या महिलांचे व्हिडिओ किंवा फोटो काढू नका असे सांगितले. याचा राग आल्याने त्यांच्यात वाद झाला. वादाचे पर्यवसान हाणामारीत होवून संशयित यश भोसले याने लोखंडी रॉडने केदारी याच्या डोक्यावर आणि खांद्यावर मारले. अन्य दोघांनी केदारी यास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी पोलिसांनी तिघा संशयितांवर गुन्हा दाखल केला आहे.

* लातूर,ता.१७– २००३ मध्ये दाखल झालेल्या पत्नीचा शारीरिक व मानसिक छळ तसेच हुंड्यासाठी त्रास दिल्याच्या प्रकरणात तब्बल २३ वर्षांच्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर चार आरोपींना दोषी ठरवत न्यायालयाने शिक्षा सुनावली.

# कारवाईच्या भीतीने भेसळयुक्त दूध ओढ्यात फेकल्याचा संशय

■ मिरज,ता.१७ (प्रतिनिधी)– मिरज तालुक्यातील टाकळी येथे ओढ्यात दूध ओतण्यात आल्याचे निदर्शनास आले. ओढ्यात ओतण्यात आलेले दूध भेसळयुक्त असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाकडून भेसळयुक्त दूध व अन्न भेसळी विरोधात जोरदार कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कारवाईच्या भीतीने ओढ्यात दूध ओतून देण्याचे कृत्य करण्यात आल्याचा संशय ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. ओढ्याच्या पात्रामध्ये दूध ओतल्याने ओढ्यातील पाणी पांढरे दिसू लागले होते. मिरज–सलगरे रोडवर टाकळी येथे ओढा आहे. ओढ्यामध्ये असलेल्या पाण्यामध्ये अज्ञातांनी मोठ्या प्रमाणात दूध ओतले आहे. ग्रामस्थांना येथील पाणी पांढरे दिसल्यानंतर त्यांनी माहिती घेतली. अज्ञातांनी या ठिकाणी मोठ्या संख्येने दुधाचे कॅन ओढ्यात ओतून रिकामे केल्याचे सांगण्यात येत आहे. राज्यभरात अन्न व औषध प्रशासनाकडून अन्न भेसळी विरोधात कारवाईची मोहीम राबविण्यात येत आहे. दोन दिवसांपूर्वी मिरज तालुक्यातील सलगरे येथे दूध भेसळ करणाऱ्या दोघांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने कारवाई केली आहे. या कारवाईच्या पार्श्वभूमीवरच कारवाई टाळण्यासाठी भेसळयुक्त दूध अशा रीतीने ओढ्यात ओतून नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला असावा, असा संशय ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. १७० पैकी प्लॉट नं २४ चे क्षेत्र १०१.३७ चौरस मीटरची मिळकत.. यासी चतुःसिमा– पुर्वेस – उत्तम बागडे यांची मिळकत, पश्चिमेस – २० फुट रस्ता दक्षिणेस – सचिन मस्कर यांची मिळकत, उत्तरेस–रावळ यांची मिळकत, सदर मिळकत ही मूळची श्री. सुखदेव यशवंत डांगे रा. धामणी यांच्या कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना करारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही बोजा, हक्क, दावा, पोटगी, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता.१७/०७/२०२६

ॲड.आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे चंदूर येथील गट नं. ५७२ पैकी क्षेत्र हे ०.१५.०० आर यासी चतुः सिमा– पुर्वेस – श्री संजय पाटील (कुगे) यांची मिळकत, पश्चिमेस – किरण पाटील यांची उर्वरीत मिळकत, दक्षिणेस – १२ फुट रस्ता, उत्तरेस – रेखा पाटील यांची मिळकत. सदर मिळकत ही श्री किरण रावसाहेब पाटील रा. चंदूर यांचे कब्जे वहिवाटीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांच्याशी करारपत्र केलेले आहे. सदर मिळकती संदर्भात सोसायटीच्या कर्जा व्यतिरिक्त अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता.१७/०७/२०२६

ॲड.आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

कबनूर येथील नंबर ७२१ पैकी बिगरशेती प्लॉट नंबर १८ चे क्षेत्र १५४०–०० चौरस फुटची खुली जागा मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस – बंदिस्त भिंत, पश्चिमेस – धनंजय देसाई यांची मिळकत, दक्षिणेस– गट नंबर ७२०, उत्तरेस–रस्ता. सदरची मिळकत ही संतोष विलासराव इंगवले रा.कबनूर यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमच्या अशिलांच्याकडून संचकार रक्कम स्वीकारून संचकार पावती करून दिलेली आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा हक्क, दावा, पोटगी, बोजा कोर्ट केस इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. १७/०७/२०२६

ॲड. शिवकुमार सुखदेव लकडे
३ / १५३, देवमोरे वाडा, राणाप्रताप चौक, टाकवडे वेस,इचलकरंजी
मो.नं. ९८८१०१४७२५

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ७५१ पैकी समजुतीच्या नकाशाप्रमाणे प्लॉट नं. १९ चे क्षेत्र ८८.९२ चौरस मीटर खुली जागा मिळकत, यासी चतुःसिमा– पुर्वेस – १८ फुट रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नंबर १८, दक्षिणेस – १० फुट रस्ता, उत्तरेस – १८ फुट रस्ता, सदरची मिळकत ही श्री विनायक घनश्याम जोशी तर्फे वटमु समीर आप्पालाल मुजावर रा. शहापूर, इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी आमचे अशिलांचेकडून संचकार रक्कम स्वीकारून त्यांना संचकारपत्र करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात अन्य कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, बोजा, करार, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता . १६/०७/२०२६

ॲड.आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

ता. हातकणंगले पैकी इ.म.न.पा. हद्दीतील इचलकरंजी येथील रि.स.नं. ४४२/प्लॉ.नं./९ पैकी भुखंड क्र. ९/ क ची क्षेत्र १८३–५५ चौ. मी. ची बिगरशेती खुली जागा मिळकत यास इ.म.न.पा. मालमत्ता क्र. १३/ रि.स.नं. ४४२ पी चा नविन १३५०००१४८ असा नोंद आहे यासी चतुःसिमा–पुर्वेस–भुखंड क्र.९/ब ची हिराणी यांनी बांधलेली अपार्टमेंट मिळकत,पश्चिमेस – रि.स.नं. ४४७ पैकी ओपन स्पेसची मिळकत, दक्षिणेस – भुखंड क्र.९/ अ ची श्रीकृष्ण कुलकर्णी यांची मिळकत,उत्तरेस रस्ता व रि.स.नं.४५१/२ ची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत सर्व ही श्री. किशोरकुमार राधाकिसन मुंदडा (एचयुएफ) रा. इचलकरंजी यांचे मालकी वहिवाटीची असून ती त्यांनी आमचे मित्र यांना खरेदी देणेचे ठरवुन तसा करारपत्र करुन देवुन संचकार रक्कम स्विकारलेली आहे. सदर वरील मिळकत ही निर्वेध व निष्कर्जी असल्याचा निर्वाळा श्री. मुंदडा यांनी आमचे मित्र यांना दिलेला आहे.

सदर वरील मिळकतीवर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, करार, लेखी अगर तोंडी व्यवहार केलेला असलेस अथवा कसलाही हक्क, अधिकार, वगैरे असलेस ते त्यांनी सात (७) दिवसाचे आत खालील पत्त्यावर अस्सल कागदपत्रासह समक्ष भेटुन खात्री करुन द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस आमचे मित्र वरील मिळकतीचा व्यवहार पुर्ण करुन घेतील म्हणून दिली जाहीर नोटीस सही.

दि. १७/०७/२०२६

श्री.भाऊसाहेब कुबेर पाटील (स्टँपरायटर)
राजाराम स्टेडियम,गाळा नं.२४, इचलकरंजी मो.नं.९९२१६०२७००

## जाहीर नोटीसीस हरकत

आमचे अशिल जालिंदर बाळू काकडे रा.यड्राव यांनी दिले माहीतीवरुन,अधिकारावरुन ॲड.एम.एन.माने रा.जयसिंगपूर यांनी त्यांचे अशील श्री आनंदा शंकर काकडे, सदाशिव शंकर काकडे व श्री.विष्णू शंकर काकडे यांच्याकरिता दिनांक १६/७/२०२६ इ. रोजी दैनिक महासत्ता वृत्तपत्रामधील पान नंबर ७ वर प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटिसीस हरकत देण्यात येते की,

१) ॲड एम.एन.माने यांनी त्यांचे अशीलकरिता प्रसिद्ध केलेल्या जाहीर नोटीस मधील संपूर्ण मजकूर खोटा लबाडीचा व चुकीचा असून आमच्या अशीलांना कोणत्याही प्रकारे मान्य कबूल नाही

२) मिळकतीचे वर्णन –

मौजे यड्राव येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर २१ याचे एकूण क्षेत्र हेक्टर ०. ७८ आर आकार रुपये ३.१९ ची शेतजमीन पैकी वहिवाटीप्रमाणे दक्षिण बाजूची हे.०.२६ आर ची शेत जमीन मिळकत यासी चतुःसीमा पूर्वेस अशोक रेंदाळे यांची जमीन, पश्चिमेस रस्ता, दक्षिणेस राजाराम रेंदाळे यांची जमीन उत्तरेस याच गट नंबर पैकी उर्वरित जमीन

३) वर चर्तुसिमेतील नमूद मिळकत आमच्या अशिल यांचे वडील बाळू दत्तु काकडे यांच्याकडून नोंदणीकृत खरेदीपत्र दस्त क्रमांक १९५९/२००६ अन्वे दिनांक. १२/४/२००६ इ. रोजी खरेदी घेतली आहे त्याप्रमाणे आमच्या अशिलांची नावाची नोंद ७/१२ पत्रकी मालकी कोष्टकी नोंद आहे असे असताना ॲड माने यांच्या अशिलांनी आमच्या अशिलां विरुद्ध मे. सिव्हिल जज्ज ज्युनिअर डिव्हिजन जयसिंगपूर यांचे कोर्टात रे.क.नं. १४५/२०२४ चा खोटा दावा दाखल केला आहे त्यामध्ये त्यांनी आमच्या अशीलाविरुद्ध तूर्तातूर्त मनाईची दाद मागणी केली होती मा. न्यायालयाने त्यांची मागणी नामंजूर केली आहे सदर निर्णयाविरुद्ध त्यांनी मा. जिल्हा न्यायाधीश जयसिंगपूर यांचे कोर्टात किरकोळ दिवाणी अपील नं. १६/२०२५ दाखल केला आहे तो न्याय प्रविष्ट व प्रलंबित आहे सदर, अपीलामध्ये देखील आमच्या अशिलांविरुद्ध कोणताही हुकूम झालेला नाही . तसेच त्यांचे अशिलांना आमच्या अशिलांची मिळकत खरेदी घेण्याचा कोणताही कायद्याने हक्क प्राप्त होत नाही. असे असताना तमाम लोकांची दिशाभूल व्हावी या दृष्टीने ॲड. माने याचे अशिलांनी खोटी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे त्यावर कोणीही विश्वास ठेवू नये म्हणून दिली जाहीर नोटीसीस हरकत दि. १७/७/२०२६

ॲड.अबिद अ.बागवान
रा.६/५४१ मंगळवार पेठ इचलकरंजी ता.हातकणंगले जि.कोल्हापुर
मो.८७८८०५४६३६

## जाहीर नोटीस

मौजे कबनूर येथील गट नंबर ८१ पैकी क्षेत्र २८ चौरस मिटर ची जागा व या वरील घर मिळकत यासी चतुःसिमा पुर्वेस – जवाहर हायस्कूलची मिळकत, पश्चिमेस – १५ फुट रुंदीचा रस्ता, दक्षिणेस – श्री शिवाजी माळी यांची मिळकत, उत्तरेस– श्री शेख यांची मिळकत. सदरची मिळकत श्री तानाजी रामचंद्र पाटील रा. इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची मिळकत असुन त्यांनी सदर मिळकतीचे तोंडी करारपत्र आमचे अशिलांना करून दिलेले आहे. सदर मिळकती संदर्भात कोणाचा कोणताही हक्क, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस सही

ता. १६/०७/२०२६

ॲड.आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

जि. व तु. कोल्हापूर पो. तु. इचलकरंजी, ता. हातकणंगले पैकी तारदाळ येथील गट नं.५८३ क्षेत्र हे. ३.२० आर आकार रु.९.१८ =९५ पैसे यापैकी ०.०१.११ आकार रु. ०=०७ पैसे याचे ११९८ चौ.फुट ची मिळकत यासी चतुःसिमा – पुर्वेस – संदिप बाळगोंडा पाटील, पश्चिमेस – शिल्लक जमिन, दक्षिणेस – आवळे यांची मिळकत, उत्तरेस – ३० फुट रस्ता, येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही सौ. रुपाली पांडूरंग शिंदे, रा. तारदाळ यांचे कब्जा वहिवाटीची असून सदर मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचा निर्वाळा आमचे अशिलांना देवून संचकार पावतीने मिळकत देवू केली आहे. सबब वर नमूद मिळकतीबाबत कोणाचीही कोणताही, हक्क,दावा, पोटगी, बक्षीस,बोजा इ. स्वरुपाचे हक्कसंबंध अथवा हितसंबंध असलेस सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत अस्सल कागदपत्रानिशी लेखी हरकत द्यावी म्हणून दिली जाहिर नोटीस

ता.१६/०७/२०२६.

ॲड.एन.ए.मिसाळ
२३/१३५, खंजिरे नगर, इंड.इस्टेट,शहापूर,इचलकरंजी.
मो.नं. ९८९०५८०९००

## जाहीर नोटीस

मौजे कोरोची येथील क.ग.नं. १४४ पैकी प्लॉट नं. ११ चे क्षेत्र १११.५२ चौ.मी. ची खुली जागा व त्यातील बांधीव घर मिळकत यासी चतुःसिमा – पुर्वेस – बामणे यांची मिळकत, पश्चिमेस– गट नं. १४४ ची मिळकत, दक्षिणेस–रस्ता, उत्तरेस – माळवी यांची मिळकत येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत ही श्री. शिवाजी विष्णू आवळे रा. कोरोची यांचे कब्जे मालकीची मिळकत असून त्यांनी सदर मिळकतीचा तोंडी करार आमचे अशिलांना करून देवून त्यांचेकडून संचकार रक्कम स्विकारली आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचा कोणताही हक्क, करार, दावा, पोटगी, इजमेंट इत्यादी वगैरे असलेस सदर नोटीस प्रसिध्दीपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी मुदतीनंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. म्हणून दिली नोटीस सही

ता.१६/०७/२०२६ रोजी.

ॲड.आनंद प्रकाश पटवा
रा. आसरा नगर, बस स्टॉप जवळ सांगली रोड, इचलकरंजी
मो.नं. ९४२०७७६४८६

## जाहीर नोटीस

मौजे तारदाळ येथील गट नं. ६९८ पैकी प्लॉट नं. ०८ चे क्षेत्र – १८२.७२ चौ. मी . खुली मिळकत संपुर्ण . यासी चतुःसिमा पुर्वेस – प्लॉट नं. ०७ ची मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. ०९ ची मिळकत, दक्षिणेस – २० फुट रस्ता, उत्तरेस – सदर गट नं. ची शिल्लक मिळकत . येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत हि अनिल मधुकर वडेकर, सुनिल मधुकर वडेकर व रेखा पांडुरंग मुसळे रा. सरुड, ता. शाहुवाडी यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलाशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ.वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी.म्हणून दिली नोटीस.सही

ता.१७/०७/२०२६

ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मौजे खोतवाडी येथील गट नं. १६४ पैकी प्लॉट नं. ३५ चे क्षेत्र – ९६.१८ चौ. मी . खुली मिळकत संपुर्ण . यासी चतुःसिमा पुर्वेस–प्लॉट नं. ३४ची मिळकत, पश्चिमेस – प्लॉट नं. ३६ ची मिळकत, दक्षिणेस – १५ फुट रस्ता, उत्तरेस – शंकर माने यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत हि जमेला अकबर मुल्ला रा.शहापूर – इचलकरंजी यांचे कब्जे मालकीची असून त्यांनी आमचे अशिलाशी मिळकत निर्वेध व निष्कर्जी असलेचे सांगुन संचकार रक्कम स्विकारून त्यांच्याशी मिळकत विक्री करण्याचे संचकारपत्र केले आहे. तरी सदर मिळकती बाबत कोणाचा हक्क, दावा, बोजा, वारसा, करार, इजमेंट इ. वगैरे असल्यास सदर नोटीस प्रसिध्दीपासुन ७ दिवसांचे मुदतीत खालील पत्यावर कागदपत्रासह लेखी तक्रार नोंदवावी. म्हणून दिली नोटीस . सही ता. १७/०७/२०२६

ॲड.अर्जुन तात्यासाहेब माने
पत्ता– गाळा नं. ३४, दुय्यम निबंधक ऑफिस शेजारी, राजाराम स्टेडियम, इचलकरंजी,
मो. ७८२०९०९७०५

## जाहीर नोटीस

मिळकतीचे वर्णन– मौजे तारदाळ येथील क.ग.नं. ७५२ यापैकी प्लॉट नं. ५० व ५१ याचे क्षेत्र २१०० चौ. फूट याचे १९५.१६ चौ. फूट खुली मिळकत व यांसी चतुः सिमा पूर्वेस – २० फूट रस्ता, पश्चिमेस – प्लॉट नं.४९ ची मिळकत, दक्षिणेस – २० फूट रस्ता, उत्तरेस–उत्तम विभूते यांची मिळकत. येणेप्रमाणे चतुःसिमेतील मिळकत श्री. उत्तम बापू विभूते, रा. तारदाळ यांचेकडून दत्तात्रय अशोक मांजरे, रा. इचलकरंजी यांनी करारपत्राने घेतलेली असून त्यांचेकडून आमचे अशिल श्री. सचिन वसंत सांगले, रा. इचलकरंजी यांनी संचकार देवून खरेदीपत्राने घेणेचे ठरले आहे. त्यांना सदरची मिळकत निर्वेध, निष्कर्जी असल्याचा निर्वाळा देवून खरेदी देणेचे ठरले आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही, न्यायालयीन वाद, हक्क, पोटगी कोणतीही खाजगी, सरकारी बोजा, तक्रार अगर हरकत असलेस ७ (सात) दिवसात खाली दिले पत्त्यावर लेखी तक्रार नोंदवावी. मुदतीनंतर येणाऱ्या तक्रारींचा अगर हरकतींचा विचार केला जाणार नाही.म्हणून दिली जाहिर नोटीस

ता.१७/०७/२०२६.

ॲड. दत्तात्रय सुर्यकांत कांबळे
२२/१२०२/१, डॉ. आंबेडकरनगर, इचलकरंजी,
मो. ९२७०७०७४७६.

# ४१० दूध संस्थांवरील कारवाई बेकायदेशीर

## मतदान हक्कासाठी न्यायालयात लढणार ;गोकुळच्या १५ संचालकांचे प्रसिद्धीपत्रक

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**गोकुळ दूध संघाच्या प्रशासकांनी ४१० सभासद दूध संस्थांचे सभासदत्व रद्द करण्यासाठी केलेली कारवाई बेकायदेशीर असून ती संघाच्या हितालाही बाधक असल्याचा आरोप गोकुळ दूध संघाच्या १५ संचालकांनी केला आहे. या संस्थांना आगामी पंचवार्षिक निवडणुकीत मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी घटनात्मक मार्गाने न्यायालयीन लढा देणार असल्याचे त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले.**

प्रसिद्धीपत्रकावर माजी अध्यक्ष नवीद मुश्रीफ, विश्वासराव पाटील, अरुणराव डोंगळे, अजित नरके, किसन चौगुले, रणजितसिंह पाटील, नंदकुमार ढेंगे, कर्णसिंह गायकवाड, अमरसिंह पाटील, अंबरीशसिंह घाटगे, बाळासाहेब खाडे, एस. आर. पाटील, सुजित मिणचेकर, युवराज पाटील आणि मुरलीधर जाधव यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, ४१० संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याच्या आदेशाविरोधात काही संस्थांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान राज्य शासनाने न्यायालयात केवळ निर्देश दिले असून सभासदत्व रद्द करण्याचे आदेश दिले नसल्याचे स्पष्ट केले होते. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६० मधील कलम २५ नुसार सभासदत्व रद्द करण्याचा अधिकार गोकुळ दूध संघालाच असल्याचेही शासनाने नमूद केले होते.

न्यायालयाने कायद्यातील तरतुदी आणि नैसर्गिक न्याय तत्त्वांचे पालन करूनच निर्णय घेण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे संबंधित संस्थांना प्रथम नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकणे आवश्यक होते. मात्र, ही प्रक्रिया न राबविताच कारवाई करण्यात आल्याचा आरोप संचालकांनी केला आहे.

संचालकांच्या म्हणण्यानुसार, कलम २५ अंतर्गत विशिष्ट परिस्थितीतच सभासदत्व रद्द करता येते आणि त्याचा अधिकार संचालक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभेलाच आहे. असे असताना प्रशासकांनी कार्यकारी संचालकांमार्फत हा ठराव मंजूर करणे कायद्याच्या विरोधात असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

या ४१० दूध संस्थांनी गेल्या तीन वर्षांत गोकुळ दूध संघाला साडेचार कोटी लिटर दुधाचा पुरवठा केला आहे. त्यामुळे त्यांचे सभासदत्व रद्द झाल्यास दूध संकलनावर तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर विपरीत परिणाम होईल. या निर्णयाची सर्व जबाबदारी गोकुळ दूध संघाच्या प्रशासकीय मंडळावर राहील, असा इशाराही प्रसिद्धीपत्रकातून देण्यात आला आहे.

# बिरदेव बँकेच्या चेअरमनपदी बंडगर,व्हा.चेअरमनपदी जानवेकर

इचलकरंजी,ता.१७-

**येथील बिरदेव सहकारी बँक लि., इचलकरंजी या बँकेच्या चेअरमनपदी महादेव राघू बंडगर तर व्हा.चेअरमनपदी संतोष आप्पासो जानवेकर यांची बिनविरोध निवड झाली आहे.**



महादेव बंडगर संतोष जानवेकर

संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये एकमताने ही निवड करण्यात आली. अध्यक्षस्थानी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर तथा अध्यासी अधिकारी डॉ. डी. यू. पाटील ह्या होत्या. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे संस्थापक चेअरमन व्यंकाप्पा कुंभोजे, संचालक रमेश पुजारी, सोमा वाळकुंजे, तानाजी हराळे, रामचंद्र कोळेकर, महादेव लवटे, प्रदीप पुजारी, अण्णु लवटे, शिवाजी सायमोते, मनोहर कारके, वासुदेव कोष्टी, राजू पुजारी, सौ.जाकुबाई कुंभोजे, सौ. सुमन वाळकुंजे, तज्ञ संचालक सुभाष मिठारी, संजय मेटे,मॅनेजर दिपक घाटगे तसेच कर्मचारी बांधव उपस्थित होते.



कोरोचीत पुरस्कार वितरणवेळी जिल्हा परिषद सदस्या सानिका आवाडे, कुमार कांबळे,सरपंच डॉ.संतोष भोरे व इतर मान्यवर.

# कोरोची ग्रामपंचायतीतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण

कोरोची,ता.१७(वार्ताहर)-

**कोरोची ग्रामपंचायतीच्यावतीने दिला जाणारा आदर्श मुख्याध्यापक व आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**

यावेळी गावातील जिल्हा परिषद शाळा पटवाढीसाठी आणि गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करणाऱ्या लोकमान्य नगर विद्यामंदिरचे मुख्याध्यापक बाबासाहेब नवनाथ डोळे यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार व गावभाग जिल्हा परिषद विद्यामंदिरच्या शिक्षिका दिपाली चंद्रकांत आमते यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार देऊन प्रमुख पाहुण्या जिल्हा परिषद सदस्या सौ. सानिका आवाडे -यड्रावकर, सरपंच डॉ. संतोष भोरे, कबनूर जिल्हा परिषद सदस्य कुमार कांबळे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह,सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी उपसरपंच सतीश सूर्यवंशी, ग्रामविकास अधिकारी रांझा पाटील, माजी पंचायत समिती सदस्य पुनम भोसले, संगीता कांबळे, वंदना शिरसाटे, उज्वला कुदळे यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



नांदणीमार्गे ई-बस सेवा सुरु करण्याच्या मागणीचे निवेदन महापौर उदय धातुंडे यांना देताना नागरिक.

# नांदणीमार्गे ई-बस सेवा सुरू करण्याची मागणी

नांदणी,ता.१७(वार्ताहर)-

**इचलकरंजी महानगरपालिकेने शहरांतर्गत आधुनिक पर्यावरणपूरक आणि सुलभ सार्वजनिक ई -बस सेवा सुरू करण्यासाठी पूर्वतयारी केली आहे, याचा लाभ यड्राव, जांभळी, हरोली व नांदणी या गावांना व्हावा, या मागणीचे निवेदन इचलकरंजीचे महापौर उदय धातुंडे,परिवहन समिती सभापती अरुणा बचाटे यांच्याकडे देण्यात आले आहे.**

या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या पीएम ई बस योजनेअंतर्गत इचलकरंजीसाठी २० पैकी पहिल्या टप्प्यात आठ बस धावणार आहेत यापैकी काही बसेस इचलकरंजी ते जयसिंगपूर अशा सरळ धावणार आहेत. तरी असा मार्ग न अवलंबता इचलकरंजी,यड्राव, जांभळी,हरोली, नांदणी ते जयसिंगपूर असा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. यावेळी महापौर उदय धातुंडे व परिवहन समिती सभापती अरुणा बचाटे यांनी आपल्या मागणीनुसार या मार्गावर ही बस सेवा सुरू करण्याची ग्वाही दिली आहे. यावेळी राजेश शंभूशेटे, अजित बुबणे, राहुल पाटील, तातोबा कुरडे (नांदणी), बाबासो राजमाने, अजित सूर्यवंशी (यड्राव) आदी मान्यवर उपस्थित होते.

# समाजोपयोगी कार्यात सेवाभाव जपणे आवश्यक-कदम

इचलकरंजी,ता.१७-

**रोटरीचे काम समाजोपयोगी असून जागतिक पातळीवर सेवा आणि मैत्रीचा संदेश देणारी ही संस्था आहे. त्याचप्रमाणे आपणही समाजातील सर्व घटकांसाठी काम करणे आणि ते करीत असताना सेवाभाव जपणे आवश्यक आहे. अशा आशयाचे उद्‌गार रोटरी प्रांत ३१७२चे नियुक्त प्रांतपाल विक्रांतसिंह कदम, कोल्हापूर यांनी काढले.**



रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रलच्या पदग्रहण समारंभात पदभार स्वीकारताना नूतन अध्यक्ष व सेक्रेटरी.

येथील रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी सेंट्रलच्या पदग्रहण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी श्री.कदम यांच्या हस्ते, रोटरी क्लब सेंट्रलचे नूतन अध्यक्ष विमलकुमार बंब यांनी मावळते अध्यक्ष घनश्याम सावलानी यांच्याकडून तर सेक्रेटरी प्रमोद महाजन यांनी मावळते सेक्रेटरी डॉ. अमर कांबळे यांच्याकडून पदाची सूत्रे स्वीकारली. याप्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते नूतन ट्रेझरर सुभाष राठी तसेच इतर संचालक सदस्य आणि विविध सदस्यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर ॲनस् कमिटीच्या चेअरमन सौ. सायली बंब आणि व्हाईस चेअरमन सौ. राजश्री महाजन व इतर ॲनस् कमिटी सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नूतन सहाय्यक प्रांतपाल रोहित शहा तसेच मावळते सहाय्यक प्रांतपाल गिरीश कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.प्रारंभी रोटरी मानव सेवा ट्रस्टचे चेअरमन अंबरीश सारडा यांनी स्वागत तर पाहुण्यांचा परिचय माजी अध्यक्ष शिवकुमार धड्डु यांनी करून दिला. यावेळी फोर वे टेस्टचे वाचन डॉ.शरद मिठारी यांनी केले. सूत्रसंचालन माजी अध्यक्ष संजय होगाडे यांनी केले.या कार्यक्रमास निमंत्रित आणि रोटरी परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# आंबा येथे ड्रंक अँड ड्राईव्ह विशेष मोहीम

बोरपाडळे,ता.१७(प्रतिनिधी)-

**मद्यप्राशन करून वाहन चालविणे हे गंभीर अपघातांचे प्रमुख कारण ठरत असल्याने पोलीस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली ड्रंक अँड ड्राईव्ह विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.**

महामार्ग पोलीस मदत केंद्र, आंबा (ता.शाहूवाडी) यांच्या कार्यक्षेत्रात या विशेष मोहिमेदरम्यान वाहनचालकांची ब्रेथ ॲनालायझरद्वारे तपासणी करण्यात येत असून, मद्यप्राशन करून वाहन चालविताना आढळून येणाऱ्या वाहनचालकांवर मोटार वाहन अधिनियमातील संबंधित तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.तसेच या कारवाईतील कसूरदार वाहनचालकांचे वाहनचालक परवाने,ड्रायव्हिंग लायसन निलंबित करण्यासाठी संबंधित प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे (आरटीओ)प्रस्ताव पाठविण्यात येत आहेत.महामार्गावर वाहन चालविताना मद्यप्राशन करून वाहन चालवू नये. सर्व वाहनचालकांनी वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून सुरक्षित वाहन चालवावे व स्वतःच्या तसेच इतरांच्या जीविताची काळजी घ्यावी,असे आवाहन महामार्ग पोलीस मदत केंद्र, आंबा यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# एसआयआरचे काम करणाऱ्या शिक्षकांचा छळ नको

## शैक्षणिक व्यासपीठाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

कोल्हापूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**बीएलओ, एसआयआरचे काम करणाऱ्या शिक्षक-कर्मचाऱ्यांच्यावर वरिष्ठ अधिकारी प्रचंड दबाव टाकत आहेत. त्यांना अपशब्द वापरत आहेत. टारगेट पूर्ण न करणाऱ्यांचा मानसिक छळ केला जात आहे. फौजदारी गुन्हा दाखल करण्याची भीती दाखवत आहेत. हा छळ त्वरित थांबवावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल,असा इशारा कोल्हापूर जिल्हा शैक्षणिक व्यासपीठाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे देण्यात आला.**



निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांना लेखी निवेदन देताना आ.जयंत आसगावकर,एस.डी.लाड यांच्यासह अन्य मान्यवर.

शिष्टमंडळाने लेखी निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांना दिले.या शिष्टमंडळामध्ये आमदार जयंत आसगावकर, शैक्षणिक व्यासपीठाचे अध्यक्ष एस.डी.लाड, मुख्याध्यापक संघाचे सचिव आर. वाय. पाटील, शिक्षक नेते दादासाहेब लाड, खाजगी प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष भरत रसाळे, आयफेटोचे राष्ट्रीय महासचिव सुधाकर सावंत, राजाराम वरुटे, राजेश वरक, उमेश देसाई, राजेंद्र कोरे, बाळ डेळेकर, गणपती मांडवकर, जयवंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

# कुरूंदवाड येथे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर

कुरुंदवाड,ता.१७(प्रतिनिधी)-

**पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पूर प्रवण शिरोळ तालुक्यातील शाळा आणि विद्यार्थ्यांना आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावी सामना करता यावा यासाठी शिरोळ तालुक्याचे तहसीलदार अनिलकुमार हेळकर यांच्या विशेष प्रयत्नातून साने गुरुजी विद्यालय कुरुंदवाड येथे विशेष आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.**




साने गुरुजी विद्यालय कुरुंदवाड येथे आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देताना एनडीआरएफचे जवान.

राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल एनडीआरएफ आणि शिरोळ तालुका आपत्ती व्यवस्थापन, वजीर रेस्क्यू फोर्स दल यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या या प्रशिक्षणात विविध शाळांमधील मुख्याध्यापक,शिक्षक, शिक्षिका आणि हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपत्ती व्यवस्थापनाचे महत्त्वपूर्ण धडे आत्मसात केले. या प्रशिक्षणादरम्यान एनडीआरएफचे प्रमुख टीम कमांडर महेश शिंदे, अजय यादव आणि त्यांच्यासोबत आलेल्या २७ जवान आणि इतर फोर्सच्या अनुभवी बचाव पथकाने प्रात्यक्षिक सादर केले. पूरस्थितीत स्वतःचे जीव आणि इतरांचे प्राण कसे वाचवावेत याची माहिती उपस्थितांना दिली. सुरुवातीस स्वागत व प्रास्ताविक साने गुरुजी विद्यालयाचे मुख्याध्यापक किरण पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय विजय माळी यांनी करून दिला.

श्रीहरी
शुक्रवार, ता. १७/०७/२०२६ पासून
रोज ३ खेळ, दु. १ व ४ वाजता
ओरिजीनल हिंदी इचलकरंजीत प्रथमच
मजबूर लडकी
सायं. ७ वा.
A प्यार की मस्ती प्रौढांसाठी

श्रीदत्त
शुक्रवार, ता. १७ पासून
रोज ४ खेळ १*४*७ व १० वाजता
मस्त रोमँटीक इंग्रजी चित्रपट
लिगल सिडक्शन
A फक्त प्रौढांसाठी A

पंचवटी चित्रमंदिर, इचलकरंजी.
संपर्क : 9623150103
पंचवटी वॉटसअॅप ग्रुप
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ *१२*३*६*९ वा.


धमाल-४
ॲडव्हान्स बुकिंग सकाळी 10 वाजल्यापासून सुरू राहील
DOLBY DIGITAL PLUS 7.1
मनोरंजनाचा धमाका अनुभवा आपल्या आवडत्या पंचवटी चित्रमंदिरात
ऑनलाईन पेमेंट स्विकारले जाईल
ऑनलाईन बुकिंग साठी bookmyshow

५७ वर्षे सिनेरसिकांच्या सेवेत
DOLBY DIGITAL
भाग्यरेखा चित्रमंदिर इचलकरंजी
नवीन डॉल्बी डिजिटल साउंड सिस्टीम
वाढत्या गर्दीचा २ रा आठवडा
रोज ४ खेळ १२-३-६-९ वा.

DHAMAAL
धमाल-४ (हिंदी)

कल्पना लेजर प्रोजेक्टरसहीत शुक्रवार ता.१७ पासून
रोज ४ खेळ १२ * ३ * ६ * ९

अल्फा (हिंदीमध्ये)
भू. - अनिल कपूर, बॉबी देओल, आलिया भट

गुरु शुक्रवार,ता. १७ पासून
ऑनलाईन बुकींग bookmyshow
रोज ४ खेळ १२.१५ * ३.३० * ६.३० * ९.३० वा.
हाउसफुल गर्दीचा दुसरा आठवडा

DHAMAAL 4
ॲडव्हान्स बुकींग रोज सकाळी ११ पासून

RK CINEMA 3 SCREEN MULTIPLEX
राधाकृष्ण सिनेमा
3 स्क्रीन मल्टिप्लेक्स
REAL 3D EFFECTS & DOLBY ATMOS SOUND
ONLY IN RADHAKRISHNA MULTIPLEX
7447440070 bookmyshow

THE ODYSSEY 07.17.26
" द ओडिसी " ( हिंदी ) 11:30 AM, 03:00 PM 06:30 PM, 10:00 PM
" द ओडिसी " ( इंग्लिश ) 07:00 PM, 10:30 PM
" धमाल 4 " ( हिंदी ) 10:30 AM, 01:30 PM 04:30 PM, 07:30 PM 10:30 PM
" वेलकम टू द जंगल " ( हिंदी ) 01:00 PM
" अल्फा " ( हिंदी ) 04:00 PM
आता कोणताही शो पहा 100/-* पासून पुढे

फोर्च्युन सिनेफ्लेक्स इचलकरंजी
Now Book Tickets on bookmyshow OR Via www.fortuneshahgroup.com
अधिक माहितीसाठी संपर्क +91 88 88 01 51 11

DHAMAAL 4 IN CINEMAS 10TH JULY
धमाल 4 (HIN) (U/A) 11.15am, 01.45, 04.30, 07.15, 10.00pm
द ओडिसी (HIN) (A) 10.30am, 12.45, 04.00, 10.30pm
द ओडिसी (ENG) (A) 07.15pm
ईव्हिल डेड बर्न (HIN) (A) 05.00, 10.15pm
बोल बोल राणी (MAR) (U/A) 02.15, 07.30pm
आता पहा कोणताही शो फक्त 100 पासून पुढे

# ढेबेवाडी बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची दुरावस्था

ढेबेवाडी,ता.१७(प्रतिनीधी)-

**चार वर्षांपासून रस्त्याचे काम अपूर्ण** — **रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये साचले पावसाचे पाणी** — **वाहनधारकांसह नागरिकांना नाहक त्रास**

**ढेबेवाडी एसटी स्टँड चौक ते ग्रामीण रुग्णालय या अंतर्गत रस्त्याचे काम एप्रिल २०२२ ला पूर्ण करत असताना ढेबेवाडी एसटी स्टँड चौक ते बाजारतळ पर्यंत मुख्य बाजारपेठेत सुमारे १०० मीटर अंतराचे कार्पेट अपूर्ण राहिले. पुढे काम पूर्ण न झाल्याने चार वर्षांमध्ये रस्त्यात मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून अपूर्ण राहिलेल्या रस्त्याला जबाबदार कोण? असा संतप्त प्रश्न ग्रामस्थ विचारत असून सध्या पावसात रस्त्यावरूनच पाणी वाहत असून मुख्य बाजारपेठेतील रस्त्याची दुरावस्था संपणार कधी असा प्रश्न ग्रामस्थांतून विचारला जात आहे.**

तालुक्याचे तत्कालीन लोकप्रतिनिधी नामदार शंभूराज देसाई यांच्याकडून ढेबेवाडी अंतर्गत रस्ता सुधारणा कामी १६ लाख ९९ हजार रुपये निधीचे काम मंजूर झाले. सदर काम सुरू झाल्यानंतर ढेबेवाडी एसटी स्टँड चौक ते ग्रामीण रुणालय पर्यंतच्या साईड पट्ट्या बॉक्स भरून घेतल्या व यानंतर या रस्त्यावरील कार्पेटसाठी वर्षभर वाट पाहावी लागली. शेवटी एप्रिल २०२२ मध्ये हे काम सुरू होऊन एसटी स्टँड चौकपर्यंत कार्पेट टाकण्यासाठी रस्ता साफ करण्यात आला परंतु प्रत्यक्ष कार्पेटचे काम या गावाच्या प्रवेशद्वारापासून सुरू करणेऐवजी ढेबेवाडी ग्रामीण रुणालयाकडून उलट्या बाजूने सुरू करण्यात आले.कार्पेट टाकत असताना ढेबेवाडी बाजारतळापासून ग्रामीण रुग्णालयापर्यंत रस्त्याची रुंदी वाढवण्यात आल्याने ढेबेवाडी बाजारतळ संपताच रस्त्यावरील कार्पेटचे काम बंद करण्यात आले. पुढील बाजारतळ ते एसटी स्टँड चौकापर्यंत मुख्य बाजारपेठेतील सुमारे १०० मीटर रस्त्याचे साईड पट्ट्या एपीएमचे काम पूर्ण होऊन सुद्धा कार्पेट न टाकल्याने रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत राहिले.



ढेबेवाडी बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये साचलेल्या पाण्यातून वाट काढताना वाहनधारक.

ढेबेवाडी एसटी स्टँड चौकापासून बाजारातळ पर्यंत सुमारे १०० मीटर रस्त्याचे कार्पेटचे काम अर्धवट राहिले पुढे हे काम पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाने दुर्लक्ष केल्याने सध्या रस्त्यावर मोठे खड्डे पडलेले आहेत त्यामध्ये पाणी साचून रस्त्यावरून हे पाणी वाहत आहे ही परिस्थिती चार वर्षापासून आहे.

ढेबेवाडी बाजारपेठ अशी ओळख असलेला हा परिसर मंद्रूळकोळे ग्रामपंचायतीच्या कार्य कक्षात येतो त्यामुळे या रस्त्याची अवस्था त्रिशंकू सारखी झाली असून नेमका हा रस्ता कधी पूर्ण होणार आणि बाजारपेठेतील वाट कधी सुखकर होणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

या रस्त्याच्या दुरावस्थेमुळे मंगळवारी आठवडी बाजारा दिवशी बसणारे व्यापारी, खरेदीदार यांना त्रास सहन करावा लागत असून या रस्त्याने ढेबेवाडी हायस्कूलकडे जाणारे विद्यार्थी, विद्यार्थिनी,दैनंदिन कामकाजासाठी बाजारपेठेत येणारे ग्राहक, महिला,जेष्ठ नागरिक,वाहन चालक यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. अनेकदा येथून वाहन जात असताना पादचारी,विद्यार्थी यांच्या अंगावर रस्त्याच्या पाण्याचे शिडकावे पडत आहेत. हा मुख्य बाजारपेठेतील रस्ता असल्याने याची दुरावस्था कधी संपणार असा प्रश्न ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

# चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण दिमाखात संपन्न

सातारा,ता.१७(प्रतिनिधी)-

**संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सातारा जिल्ह्यात चांदोबाचा लिंब येथे पहिले उभे रिंगण मोठ्या भक्ती भावाने व लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या रिंगण सोहळ्याला अनेक वर्षांची मोठी परंपरा असून सुरुवातीला अश्व पूजन करून वारकऱ्यांच्या टाळ मृदूंगाच्या गजरात अश्व या उभ्या रिंगणात धावत येतात.**

तरडगाव ते फलटण या मार्गावर सुरू असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर पालखी सोहळ्यात यंदा तरुण-तरुणींचा सहभाग लक्षणीय वाढलेला दिसून येत आहे. दिंडीत चालत असताना युवक-युवती टाळ-मृदुंगाच्या गजरात अभंग गात, विठ्ठलनामाचा जयघोष करत मार्गक्रमण करत आहेत.काही जण सेवाभावी उपक्रमांमध्येही सक्रिय सहभाग घेत असून वारकऱ्यांना पाणी, औषधे, तसेच अन्नदानाची सेवा देताना दिसत आहेत. त्यामुळे



चांदोबाचा लिंब येथे उभे रिंगणात धावणारे अश्व.

## लाखो भाविकांची मांदियाळी

पालखी सोहळ्यात भक्तीबरोबरच सामाजिक जाणीवही वृद्धिंगत होत आहे.

तरडगाव ते फलटण या टप्प्यातील दिंडी शिस्तबद्ध पद्धतीने पुढे सरकत असून स्थानिक ग्रामस्थांकडून वारकऱ्यांचे उत्साहाने स्वागत केले जात आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सातारा जिल्हा प्रशासनाकडूनही योग्य ती व्यवस्था करण्यात आली आहे. माऊलींच्या सेवेसाठी सातारा जिल्हा प्रशासन दिवस रात्र सज्ज असून श्री संत ज्ञानेश्वर पालखीचे तरडगाव येथून प्रस्थान झाले असून तरडगाव ते फलटण या महत्त्वाच्या टप्प्यातील माऊली वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग आरोग्य विभाग,सातारा जिल्हा प्रशासन यांच्या वतीने माऊलींच्या सेवेसाठी मोफत आरोग्य सेवा यासह मोफत मोबाईल चार्जिंग स्टेशन, ठिकठिकाणी आंघोळीची व पिण्याचे पाण्याची सोय सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने कर्मचारी अत्यंत चांगल्या पद्धतीने करीत आहेत.

## कराड येथे एसआयआरचे पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण

कराड ,ता.१७(प्रतिनिधी)-

**केंद्रीय निवडणूक आयोगाच्या विशेष सधन मतदार पुनर्निरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत प्रत्येक पात्र नागरिकाचा मतदानाचा हक्क सुरक्षित राहावा, यासाठी आवश्यक अर्ज भरून घेण्याचे काम कराड नगरपालिकेच्या बूथ लेव्हल अधिकाऱ्यांकडून (बीएलओ) शहरात युद्धपातळीवर सुरू आहे. या मोहिमेत बीएलओ घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती पडताळून पाहात असून आवश्यक अर्ज भरून घेण्यासह नागरिकांना मतदान यादीतील नोंदीबाबत मार्गदर्शनही करत आहेत.**

कराड नगरपालिकेच्या सर्व विभागांतील बीएलओ या मोहिमेत सक्रियपणे सहभागी झाले असून नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. पात्र मतदारांची माहिती अद्ययावत ठेवणे, नव्या मतदारांची नोंदणी करणे, तसेच आवश्यक दुरूस्त्या करून घेणे, हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. नगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या या विशेष मोहिमेच्या पहिल्या टप्प्यातील काम जवळपास पूर्णत्वाकडे आले आहे.उर्वरित पात्र नागरिकांनीही आवश्यक कागदपत्रांसह सहकार्य करून अर्ज भरून द्यावे, असे आवाहन संबंधित प्रशासनाने केले आहे.मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व सर्वसमावेशक करण्याच्या दृष्टीने ही मोहीम महत्त्वाची असून, प्रत्येक पात्र नागरिकाने आपला मतदानाचा हक्क अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असेही प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.

## मिरजेत उद्यापासून चातुर्मास महोत्सवाचे आयोजन

मिरज,ता.१७(प्रतिनिधी)-

**जैन धर्मीयांसाठी अत्यंत पवित्र आणि आध्यात्मिक महत्त्व असलेला चातुर्मास महोत्सव यंदा तब्बल ३० वर्षांनंतर मिरजेत होत आहे.आचार्य श्री १०८ विदेहसागर महाराज आणि श्री १०८ सुगमयसागर महाराज यांच्या सान्निध्यात हा चातुर्मास सोहळा पार पडणार असून, शहरातील सकल दिगंबर जैन समाजातर्फे त्याचे आयोजन करण्यात आले आहे.**

या महोत्सवासाठी सांगली, कोल्हापूर आणि परिसरातील हजारो श्रावक-श्राविका सहभागी होणार आहेत.सुमारे ११० दिवस चालणाऱ्या या चातुर्मासात प्रवचने, स्वाध्याय, तपश्चर्या, धर्माचरण, संयम,संस्कार वर्ग तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. चातुर्मासाची सुरुवात रविवार,१९ जुलै रोजी सकाळी ९ वाजता मंगल प्रवेश सोहळ्याने होईल. त्यानंतर मंगळवार, २१ जुलै रोजी दुपारी १२ वाजता चौगुले मळा येथील मुनी सुव्रतनाथ दिगंबर जैन समाज मंदिरात अकरावा संयम दीक्षा महोत्सव होणार आहे. २९ जुलै रोजी गुरुपौर्णिमेनिमित्त पाटील हौद येथील शांतिनाथ दिगंबर जैन मंदिरात गुरुपूजन, प्रवचने, भक्तीपर कार्यक्रम आणि विविध धार्मिक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. तसेच २ ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता शांतिनाथ दिगंबर जैन मंदिरात कलशस्थापना सोहळा होणार आहे. या पवित्र चातुर्मास महोत्सवाचा लाभ जास्तीत जास्त भाविकांनी घ्यावा,असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

# कावडी, मान्याचीवाडी ग्रामपंचायतींचे मूल्यमापन होणार

## पंचायतराज अभियानांतर्गत बुधवारी समितीकडून पडताळणी

सातारा,ता.१७(प्रतिनिधी)-

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार धाराशिव जिल्हास्तरीय मूल्यमापन समितीमार्फत सातारा जिल्ह्यातील तालुकास्तरावरील प्रथम दोन ग्रामपंचायतींचे मूल्यमापन केले जाणार आहे. बुधवार ता. २२ जुलै रोजी कावडी (ता.जावळी) व मान्याचीवाडी (ता.पाटण) या ग्रामपंचायतीची निवड केली आहे. यापूर्वी समितीने सातारा जिल्ह्यातील २२ ग्रामपंचायतींचे मूल्यमापन केले आहे.**

सदर मूल्यमापन प्रक्रियेनंतर सर्वाधिक गुण प्राप्त मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत पुणे विभागस्तरीय प्रथम, द्वितीय व



कावडी ग्रामपंचायत गावात राबवत असलेले उपक्रम.

तृतीय पुरस्कारासाठी होणाऱ्या मूल्यमापनासाठी निवड करण्यात आली आहे. पुणे विभागातील जिल्हा परिषदांचे मूल्यमापन करण्यासाठी विजय मुळीक अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय मूल्यमापन समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीमार्फत बुधवार, ता. २२ जुलै २०२६ रोजी सातारा जिल्हा परिषद कार्यक्षेत्रातील निवड झालेल्या दोन ग्रामपंचायतींचे विभागस्तरीय मूल्यमापन करण्यात येणार आहे. या मूल्यमापनामध्ये ग्रामपंचायतींची अभियानातील निकषांच्या अनुषंगाने सविस्तर पडताळणी होणार आहे.

सातारा जिल्हा परिषद, सातारा यांनी संबंधित ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, प्रशासक, ग्रामपंचायत अधिकारी, विस्तार अधिकारी,तालुका स्तरावरील सर्व खाते प्रमुख, गट विकास अधिकारी,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.), प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हास्तरीय सर्व खातेप्रमुख, अभियान जिल्हा कक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सातारा जिल्हा परिषदेच्या वतीने विशेष अभिनंदन केले आहे.

विभागस्तरीय मूल्यमापनात सातारा जिल्हयातील मान्याचीवाडी आणि कावडी या ग्रामपंचायती यशस्वी होऊन राज्यस्तरीय पुरस्कारासाठी त्यांची निवड व्हावी. यासाठी जिल्हा परिषद सातारा मार्फत शुभेच्छा देण्यात आल्या.

# सरकारच्या संवेदनशील निर्णयामुळे अजितदादांचे कार्य उजळून निघेल

**-निशिकांत पाटील**

ईश्वरपूर,ता.१७(प्रतिनिधी)-

**महाराष्ट्र शासनाने सन २०२६ पासून स्व.अजितदादा अनंतराव पवार यांची जयंती शासकीय पातळीवर साजरी करण्याचा निर्णय घेतला आहे.या निर्णयाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सांगली जिल्हा (ग्रामीण) जिल्हाध्यक्ष निशिकांत भोसले-पाटील यांनी स्वागत केले आहे.**



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात भोसले-पाटील यांनी म्हटले आहे की, स्व. अजितदादा पवार हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते,तर संघर्ष,त्याग आणि समाजसेवेचे प्रतीक होते. सामान्य माणसासाठी आयुष्यभर झटणारे, गोर-गरिबांचे कैवारी तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सहकार, कृषी, अर्थ, उद्योग आणि व्यवसाय क्षेत्रातील आधारस्तंभ म्हणून त्यांची ओळख होती. शासनाच्या या निर्णयामुळे नवीन पिढीला स्व.अजितदादांच्या कार्याचा, विचारांचा आणि लोकसेवेच्या आदर्शाचा परिचय होईल. त्यांच्या कार्यातून समाजसेवेची प्रेरणा मिळेल आणि त्यांचा वारसा अधिक प्रभावीपणे पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचेल, तसेच सरकारच्या या संवेदनशील आणि दूरदृष्टीच्या निर्णयामुळे स्व. अजितदादांचे कार्य अधिक उजळून निघेल.अविश्रांत परिश्रम,संयमी नेतृत्व, गोर-गरिबांसाठीची तळमळ आणि लोकसेवेचा आदर्श जपणाऱ्या स्व.अजितदादांच्या कार्याला मिळालेली ही शासकीय पावती असल्याचेही भोसले-पाटील यांनी नमूद केले.

# मिरज शासकीय रुग्णालयासाठी निधी द्यावा

## आ.सुरेश खाडे यांचे मंत्री मुश्रीफांना निवेदन

मिरज,ता.१७(प्रतिनिधी)-

**मिरज शासकीय रुग्णालयाची क्षमता सातशे बेडपर्यंत वाढवून या ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी निधी देण्याची मागणी राज्याचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे आ. डॉ. सुरेश खाडे यांनी केली आहे.याबाबतचे निवेदन त्यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना दिले.**

सुविधांच्या अभावी येथे येणाऱ्या गरजू सर्वसामान्य रुग्णांची गैरसोय होत असून बेडची संख्याही अपुरी पडत असल्याने या कामासाठी निधी मंजूर करण्याची विनंती त्यांनी वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांच्याकडे केली आहे.याबाबत मिरजेत झालेल्या पत्रकार परिषदेत आ.खाडे यांनी माहिती दिली.यावेळी धनंजय कुलकर्णी, माजी नगरसेवक पांडुरंग कोरे, दिगंबर जाधव यांच्यासंह पदाधिकारी उपस्थित होते.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांना आ.



वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांना निवेदन देताना आ. डॉ. सुरेश खाडे.

सुरेश खाडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, येथील शासकीय रुग्णालयात मॉड्युलर ऑपरेशन थिएटर,मॉड्युलर आयसीयू,डीएसए अशा अत्याधुनिक सुविधा आहेत. रुग्णालयात सांगली, मिरज, कोल्हापूर, सोलापूर तसेच कर्नाटक सीमा भागातील गरजू रुग्ण उपचार घेण्यासाठी येतात. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत उपलब्ध असलेली बेडची संख्या अपुरी पडत आहे.या रुग्णालयाची क्षमता सातशे बेड पर्यंत वाढवून येथे अत्याधुनिक सोयी सुविधांनी परिपूर्ण नवीन इमारत बांधण्यासाठी निधी मंजूर करावा.

# संत साहित्य आदर्श जीवनाचा वस्तुपाठ-जोशी

भिलवडी,ता.१७(प्रतिनिधी)-

**मानवी जीवन भक्ती आणि प्रेमाशिवाय व्यर्थ आहे. शिक्षणाने साक्षर झालेल्या माणसाला शहाणपण प्राप्त होण्यासाठी ग्रंथांशी मैत्री केल्याशिवाय पर्याय नाही. संतांनी निर्माण केलेली साहित्य संपदा ही आदर्श मानवी जीवनाचा वस्तुपाठ असल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध लेखक माधव जोशी यांनी केले.**

भिलवडी शिक्षण संस्थेच्या माजी अध्यक्षा व थोर समाजसेविका कै.डॉ. चंद्राताई शेणोलीकर यांच्या स्मृतिदिनानिमित 'ग्रंथांच्या सांगाती' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. भिलवडी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विश्वास चितळे अध्यक्षस्थानी होते.प्रारंभी



डॉ.चंद्राताई शेणोलीकर यांच्या प्रतिमेचे पूजन करताना माधव जोशी, विश्वास चितळे,अनघा चितळे,जे.बी.चौगुले आदी मान्यवर.

मान्यवरांच्या हस्ते डॉ.चंद्राताई शेणोलीकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून समाधीस्थळाचे दर्शन घेण्यात आले.प्रास्ताविक व स्वागत संस्थेचे सचिव मानसिंग हाके यांनी केले. पाहुणे परिचय सहसचिव के. डी. पाटील यांनी केला.अश्विनी बंडगर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.महेश पाटील यांनी आभार मानले.यावेळी भिलवडी शिक्षण संस्थेचे विश्वस्त अशोक चौगुले, डॉ.सुहास जोशी, संचालक महावीर वठारे, डॉ.रविंद्र वाळवेकर, संभाजी सूर्यवंशी,अजय चौगुले, मुकुंद जोग,प्रा.धनंजय पाटील, सदाशिव तावदर, जे. बी. चौगुले,भू.ना.मगदूम,सुनिता चितळे,अनघा चितळे,अशोक साठे, रोहित नलवडे, मुख्याध्यापक संजय मोरे, प्राचार्य सुरेश शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

# प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कारभाराची चौकशी करा

## जिल्हा परिषदेच्या सभेत सदस्यांची मागणी

सांगली,ता.१७(प्रतिनिधी)-

**प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी मोहन गायकवाड यांच्या कार्यकाळात विविध बाबींमध्ये गैरप्रकार झाल्याचा आरोप करत त्यांच्या संपूर्ण कारभाराची सखोल चौकशी करावी,अशी आक्रमक मागणी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत सदस्यांनी केली. या मागणीची दखल घेत अध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांनी गायकवाड यांच्या कार्यकाळाची चौकशी करण्याचे आदेश प्रशासनाला दिले. त्याचबरोबर त्यांची चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांच्याकडे कोणत्याही विभागाचा कार्यभार देऊ नये, असेही निर्देश देत यासंदर्भात शासनाकडे ठराव पाठविण्याचा निर्णय घेण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.**

इन्ट्रॅक्टीव्ह पॅनेलच्या खरेदीसह अनेक गोष्टींमध्ये मोठा गैरप्रकार झाला आहे. केंद्रप्रमुख पदोन्नतीला स्थगिती असतानाही पदोन्नती देण्यात आल्याचा आरोप करत त्यामध्ये आर्थिक व्यवहार झाल्याची चर्चाही सदस्यांनी सभागृहात मांडली. याशिवाय, सदस्यांना योग्य प्रतिसाद दिला जात नसल्याची तक्रार करण्यात आली. जिल्ह्यात काही शाळांमध्ये निवृत्त शिक्षकांना कंत्राटी पद्धतीने नियुक्ती देण्यात आली; मात्र त्यांना वेळेवर वेतन मिळाले नाही. तसेच प्रशासकीय दुर्लक्षामुळे काही शाळांमध्ये महिनाभर शिक्षक उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याने याला जबाबदार कोण,असा सवालही उपस्थित करण्यात आला. महिनाभर शिक्षकच नसल्याने विद्यार्थी इतर शाळांत गेल्याने पटसंख्यावरही परिणाम झालेला असल्याचे सदस्यांनी समोर आणले.

एका केंद्र शाळेच्या अंतर्गत दहा ते बारा शाळा आहेत.तसेच कर्मचारी नसल्याने केंद्रप्रमुख किंवा मुख्याध्यापक यांनाच संगणकावर डाटा भरावा लागतो.त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे.याची गांभीर्याने दखल घेऊन १३६ केंद्र शाळेत डाटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्तीसाठी ठराव पाठवा,अशी मागणी सदस्य अस्मिता होनमोरे यांनी सभेत केली.

यावर उत्तर देताना उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांनी शिक्षण विभागाच्या संपूर्ण कामकाजाची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येईल, चौकशी समितीचा अहवाल शासनाकडे पाठवणार.तोपर्यंत गायकवाड यांना माध्यमिक विभागात हजर करून घेणार नाही. मतदार यादी पुनरिक्षणाचे काम २९ जुलैपर्यंत संपेल, तत्पूर्वी गायकवाड यांच्यावर कारवाईसाठी प्रयत्न करू, असे त्यांनी स्पष्ट केले.मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी समितीच्या ठरावानुसार हा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठविण्यात येईल, अशी ग्वाही दिली.सभेत सदस्य सरदार पाटील,सुनील पवार,आशिष जाधव, शशिकांत जमदाडे, मोहन पाटील यांच्यासह अनेक सदस्यांनी शिक्षणाधिकारी गायकवाड यांच्या कामकाजाविषयी विविध तक्रारी मांडत कारवाईची मागणी केली.





# सौरऊर्जा प्रकल्पांच्या कामात गैरव्यवहाराचा आरोप

## चौकशीसाठी समिती गठीत करण्याचा निर्णय

सांगली,ता.१७(प्रतिनिधी)-

**जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा,आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायत कार्यालये आणि मुख्यालयात बसविण्यात आलेल्या सौरउर्जा प्रकल्पांच्या कामात अधिकाऱ्यांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करत सदस्यांनी प्रशासनाला सर्वसाधारण सभेत धारेवर धरले.सदस्यांच्या आक्रमकपणाची दखल घेत सौर ऊर्जा प्रकल्पाची सर्वंकष चौकशीसाठी समिती गठीत करण्याचा निर्णय अध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष ऋषिकेश लाड यांनी जाहीर केला.**

सदस्य अक्षय पाटील, वर्षा कांबळे, कडेगावचे सभापती डॉ. जितेश कदम, साईतेजस्वी देशमुख, मोहन पाटील, शशिकांत जमदाडे, संजय बनसोडे, विराज नाईक, विजय धेंडे आदींनी हा विषय सभागृहात लावून धरला.अक्षय पाटील, वर्षा कांबळे यांनी सांगितले की, जिल्हाभरातील ५५ प्राथमिक आरोग्य केंद्रांत कोट्यवधी रुपये खर्चून सौर ऊर्जा प्रकल्प बसवले आहेते. मात्र त्यांचे नेट मिटरिंग सुरु झालेले नाही. गेल्या वर्षभरापासून या प्रकल्पांचे घोंगडे भिजत आहे.सुमारे २७ लाख रुपयांची वीजबिले जिल्हा परिषदेला भरावी लागली आहेत. जुनी वीजबिले भरल्याशिवाय नेट मिटरींगला मंजुरी देणार नाही,अशी भूमिका महावितरणने घेतलेली आहे. त्यामुळे सौरउर्जा प्रकल्प अद्याप अपूर्ण आहेत. प्राथमिक शाळा, ग्रामपंचायती तसेच जिल्हा परिषद मुख्यालयात बसवण्यात आलेल्या सौर प्रकल्पांच्या कामांतही अनेक आक्षेपार्ह कृत्ये झाली आहेत.याची चौकशी करावी. मोहन पाटील म्हणाले,या सर्व प्रकारांमागे असणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांचा शोध घ्या.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे यांनी सांगितले,की कराडच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून गुणवत्ता चाचणी झाल्यानंतरच बिले अदा केली आहेत. पण सदस्यांनी चौकशीची मागणी लावून धरली.अखेर उपाध्यक्ष लाड यांनी चौकशी समिती नेमण्याचा निर्णय जाहीर केला.ते म्हणाले, समितीचा अहवाल येईपर्यंत बिले दिली जाणार नाहीत. बिले दिली असल्यास चौकशीअंती पैसे वसुल केले जातील, असे स्पष्ट करून सदस्यांना विश्वास दिला.

## विरंगुळा संघटनेचे कार्य कौतुकास्पद-पुदाले

पलूस,ता.१७(प्रतिनिधी)-

**ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही नेहमीच प्रयत्नशील राहू. ज्येष्ठांचे आशीर्वाद हेच आमचे खरे बळ असून त्याच पाठबळावर सहकार क्षेत्रातील प्रगतीची वाटचाल सुरू आहे, असे प्रतिपादन पलूस बँकेचे अध्यक्ष तथा सांगली जिल्हा बँक असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष वैभवराव पुदाले यांनी केले.**

पलूस येथील विरंगुळा ज्येष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने आयोजित गुणवंत सत्कार समारंभात त्यांचा सांगली जिल्हा बँक असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल गौरव करण्यात आला. यावेळी संघटनेचे अध्यक्ष एस. एन. कुलकर्णी, उपाध्यक्ष मोहनराव घोरपडे, कार्याध्यक्ष विलास लोंढे, सचिव संपतराव कदम,मिलिंद वाघमारे, सचिन कांबळे,पी. वाय. पाटील, बाळकृष्ण पवार,यांच्यासह पलूस तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# D अक्षराच्या व्यक्ती असतात जिद्दी, कुटुंबावर प्रेम करणारे

D नावाच्या व्यक्तींचे व्यक्तिमत्त्व खूप वेगळे आणि अद्वितीय असते. जिद्दी आणि कुटुंबाला जपणाऱ्या D अक्षर नावाचे व्यक्तिमत्त्व, करिअर आणि प्रेमजीवन नक्की कसे असते याबद्दल सविस्तरपणे जाणून घ्या

अंकशास्त्रानुसार, व्यक्तीच्या नावातील पहिल्या अक्षराला विशेष महत्त्व आहे. अंकशास्त्रानुसार, 'D' हे अक्षर ४ या अंकाशी आणि राहू ग्रहाशी संबंधित आहे. यामुळे त्यांच्या आयुष्यात अनपेक्षित आणि असामान्य घटना घडतात. या लोकांमध्ये प्रबळ आत्म-नियंत्रण असते, जे त्यांची सर्वात मोठी ताकद बनते. वास्तु गुरू आणि अंकशास्त्र तज्ज्ञ यांच्या मते, हे लोक अद्वितीय आणि मानसिक व शारीरिकदृष्ट्या कणखर असतात. त्यांना शिस्त आवडते आणि ते आपल्या सभोवतालच्या सर्व गोष्टी व्यवस्थित ठेवतात. चला, 'D' अक्षराने सुरू होणाऱ्या नावांच्या लोकांचे करिअर, प्रेम जीवन आणि व्यक्तिमत्त्व याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

'D' अक्षरावरून नाव सुरू होणाऱ्या व्यक्तीचा स्वभाव

शिस्तप्रिय: ज्या लोकांची नावे 'D' अक्षराने सुरू होतात त्यांचे व्यक्तिमत्त्व अद्वितीय असते. ते कोणाच्याही बोलण्यावर सहज विश्वास ठेवत नाहीत, तर स्वतः त्याची पडताळणी करतात. त्यांनी जे स्वतः पाहिले आहे आणि अनुभवले आहे, त्यावरच ते विश्वास ठेवतात. हे लोक खूप शिस्तप्रिय असतात.

कुटुंबवत्सल: हे लोक आपल्या कुटुंबावर खूप प्रेम करतात आणि त्यांच्या आनंदाची खूप काळजी घेतात. ते आपल्या कुटुंबासाठी काहीही करण्यास तयार असतात आणि त्यांची मनापासून काळजी घेतात.

हट्टी: एकदा का त्यांनी काही करायचे ठरवले की, ते पूर्ण होईपर्यंत स्वस्थ बसत नाहीत. त्यांच्या हट्टीपणामुळे, त्यांच्या आजूबाजूचे लोक त्यांना कधीकधी अहंकारी समजतात.



स्वच्छतेची आवड: त्यांना आपल्या सभोवतालच्या सर्व गोष्टी व्यवस्थित ठेवायला आवडतात. ते स्वच्छतेकडेही खूप लक्ष देतात.

'D' अक्षराने नाव सुरू होणाऱ्या व्यक्तींचे करिअर

संथ सुरूवात पण मोठे यश: 'D' अक्षराने नाव सुरू होणाऱ्या व्यक्ती त्यांच्या करिअरमध्ये हळू प्रगती करतात, परंतु मोठे यश मिळवतात

कष्टाळू: त्यांना त्यांच्या आयुष्यात सर्व काही सहज मिळत नाही; त्याऐवजी, ते त्यांच्या कठोर परिश्रमाच्या आणि क्षमतेच्या आधारावर पुढे जातात. अडचणींवर मात केल्यानंतरच ते यश मिळवतात.

व्यावसायिक तज्ज्ञ: या व्यक्तींकडे तीक्ष्ण आर्थिक बुद्धी असते. त्यांच्याकडे एक अद्वितीय मानसिकता देखील असते आणि ते व्यवसायात निपुण असतात.

विजय आणि यशाची इच्छा: या व्यक्तींच्या मनात जिंकण्याची आणि यश मिळवण्याची एक सुप्त इच्छा असते. ते त्यासाठी कठोर परिश्रम करतात आणि प्रयत्नही करतात आणि त्यांची ही इच्छा पूर्णही होते

या क्षेत्रांमधील प्रगती: ज्यांची नावे 'D' अक्षराने सुरू होतात, ते व्यवस्थापन, वित्त, अभियांत्रिकी आणि व्यवसाय या क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी करतात आणि नाव कमावतात.

'D' अक्षराने नावे सुरू होणाऱ्या व्यक्तींचे प्रेम जीवन

एखाद्यावर मनापासून प्रेम करतात: ज्यांची नावे 'D' अक्षराने सुरू होतात, ते खूप निष्ठावान आणि प्रामाणिक असतात. ते सहजपणे नातेसंबंधात येत नाहीत, पण एकदा आले की ते मनापासून ते नाते टिकवून ठेवतात

नियंत्रण करणारा स्वभाव: या व्यक्ती कधीकधी आपल्या जोडीदारावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या या नियंत्रण करणाऱ्या स्वभावामुळे नात्यात संघर्ष होण्याचा धोका असतो पण ते कायम नातं टिकविण्याचा प्रयत्न करतात

आपल्या कुटुंबाची काळजी घेतात: हे लोक आपल्या जोडीदाराला आणि मुलांना सर्व प्रकारची सुरक्षा आणि सुखसोयी देण्यासाठी प्रयत्नशील असतात. ते नेहमी आपल्या कुटुंबाची अत्यंत काळजी घेतात.

वास्तु गुरू आणि अंकशास्त्र तज्ज्ञ यांच्या मते, ज्यांचे नाव 'D' अक्षराने सुरू होते, त्यांनी उत्तम आणि संतुलित जीवन जगण्यासाठी आपल्या घरातील ईशान्य आणि पूर्व दिशांमधील ऊर्जा नेहमी संतुलित आणि स्वच्छ ठेवली पाहिजे.

## मोजून पोळ्या बनवत असाल तर राहू दोषाला आमंत्रण

मोजून पोळ्या बनवण्याचा तुमच्या आरोग्यावर, नातेसंबंधांवर आणि घराच्या समृद्धीवर कसा परिणाम होतो, ते जाणून घ्या.

आशीर्वादांची कमतरता: वास्तूच्या नियमांनुसार, जेव्हा आपण अन्नाची मोजणी करतो, तेव्हा आपण नकळतपणे आपल्या घरातील आशीर्वादांना मर्यादित करतो. अन्नाला अन्नपूर्णा मातेचे एक रूप मानले जाते. आणि त्याचे मोजमाप करणे किंवा मोजणे हे अन्नाचा अनादर मानले जाते.स्वयंपाक हे मंगळाचे स्थान मानले जाते. असे मानले जाते की खूप कष्टाने पोळ्या बनवल्याने कुंडलीतील राहूचा नकारात्मक प्रभाव वाढतो, ज्यामुळे घरात मानसिक ताण आणि अनावश्यक खर्च वाढतो. पाहुण्यांना देव मानले जाते. जर घाईघाईने पोळ्या बनवल्या जात असतील आणि अचानक पाहुणे आले, तर त्यांना आदराने भोजन देता येत नाही. यामुळे बुध आणि गुरू हे ग्रह कमजोर होतात.पहिली पोळी नेहमी गाईसाठी बनवावी, यामुळे घरातील सर्व वास्तू दोष दूर होतात आणि पूर्वजांचा आशीर्वाद मिळतो. पोळीचा शेवटचा तुकडा नेहमी कुत्र्यांसाठी बनवावा, यामुळे राहू, केतू आणि शनी शांत राहतात. नेहमी २-३ पोळ्या जास्त बनवा, जेणेकरून कोणताही भुकेला प्राणी, पक्षी किंवा अनपेक्षित भुकेल्या पोटाने परत जाणार नाही.

## चांदी परिधान करण्याचे ज्योतिषीय फायदे

आजच्या धकाधकीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीमुळे मानसिक अस्वस्थता, चिंता आणि अस्थिरता ही अनेकांच्या आयुष्याचा भाग बनली आहे. अशा परिस्थितीत ध्यान, योग, प्राणायाम यांसारख्या उपायांचा अवलंब केला जातो. मात्र, ज्योतिषशास्त्रानुसार चांदीचे दागिने परिधान केल्यानेही मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा मिळण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.

ज्योतिषशास्त्रात चांदीचा संबंध चंद्र ग्रहाशी जोडला जातो. चंद्र हा मन, भावना, संवेदनशीलता आणि मानसिक स्थैर्याचा कारक मानला जातो. त्यामुळे चांदी धारण



केल्याने चंद्राची सकारात्मक ऊर्जा वाढते आणि मन अधिक शांत राहण्यास मदत होते, असे मानले जाते.

मानसिक शांतता: चांदी मनातील अस्थिरता कमी करून मानसिक संतुलन राखण्यास मदत करते, अशी श्रद्धा आहे.

चंद्र ग्रह बळकट होतो: जन्मकुंडलीत चंद्र कमजोर असल्यास योग्य सल्ल्यानुसार चांदी धारण करण्याची शिफारस केली जाते.

सकारात्मक ऊर्जा: चांदी नकारात्मक ऊर्जेचा प्रभाव कमी करून सकारात्मक विचारांना चालना देते, अशी मान्यता आहे.

भावनांवर नियंत्रण: राग, चिडचिड आणि भावनिक अस्थिरता कमी करण्यास चांदी उपयुक्त ठरते, असे ज्योतिषशास्त्र सांगते.

शीतलतेचे प्रतीक: चांदीचा स्वभाव थंड मानला जात असल्याने शरीर आणि मनावर शांततेचा प्रभाव पडतो, अशी धारणा आहे.

चांदी कशी परिधान करावी?

ज्योतिषशास्त्रानुसार चांदीची अंगठी, चेन, ब्रेसलेट किंवा कडा परिधान केली जाऊ शकते. अनेक तज्ज्ञ सोमवारी किंवा शुभ मुहूर्तावर चांदी धारण करण्याचा सल्ला देतात. मात्र,ज्योतिषीय उपाय म्हणून वापरण्यापूर्वी जाणकार ज्योतिषांचा सल्ला घेणे उचित मानले जाते.

## घराच्या टेरेसवर 'या' वस्तू असतील तर ताबडतोब काढा, नाहीतर..

वास्तुशास्त्रानुसार घर बांधण्यापासून ते घरातील प्रत्येक दिशा प्रत्येक कोपरा आणि वस्तूला विशेष महत्त्व दिले जाते. शिवाय, ज्याप्रमाणे मुख्य दरवाजातून सकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करते, त्याचप्रमाणे घराच्या छतालाही एक महत्त्वाचे ऊर्जा केंद्र मानले जाते. प्रत्येकजण रोज घराची स्वच्छता करत असतात. पण कधी कधी आपण घराच्या छताकडे मात्र बरेच दिवस पाहत देखील नाही. त्यामुळे अनेकदा वस्तू वर्षानुवर्षे तिथेच पडून राहतात आणि कोणाच्या लक्षातही येत नाहीत.



अनेक लोकं घराच्या छतावर निरुपयोगी वस्तू जमा करतात, असा विचार करून की काही दिवसांनी त्या तुटलेल्या वस्तू विकल्या जातील किंवा टाकून दिल्या जातील. मात्र अनेकदा ती जागा साफ करायला विसरतात. वास्तुशास्त्रानुसार छतावर वापरत नसलेल्या वस्तू आणून ठेवल्याने वास्तूदोष निर्माण होऊ शकतात. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जेचा प्रवाह तर वाढतोच, पण आर्थिक अडचणी, मानसिक ताण आणि कौटुंबिक कलह देखील निर्माण होऊ शकतात. चला तर मग घराच्या छतावर कोणत्या वस्तू ताबोडतोब काढून टाकणे योग्यतेचं ठरेल ते जाणून घेऊयात.

अनेकजण आपल्या छताच्या कोपऱ्यात जुने फर्निचर, प्लास्टिकचे डबे किंवा इतर गोष्टी ठेवतात. वास्तुशास्त्रानुसार छतावर वापरात नसलेल्या वस्तू ठेवल्याने संपत्तीची देवी लक्ष्मी क्रोधित होते. याचा परिणाम घरातील सुखसोयी, समृद्धी आणि आशीर्वादांवर होतो. तसेच यामुळे घरात येणाऱ्या पैशाच्या प्रवाहातही अडथळा निर्माण होतो.

जुने लोखंडी भाग, यंत्रांचे तुकडे किंवा गंजलेल्या वस्तू छतावर कधीही उघड्यावर ठेवू नयेत. वास्तुशास्त्रानुसार अशा वस्तूंमुळे राहू आणि केतूचा नकारात्मक प्रभाव वाढतो, ज्यामुळे व्यक्तीच्या प्रगतीत अडथळा येऊ शकतो. जेव्हा एखादी व्यक्ती एखादे शुभ कार्य करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा राहू आणि केतू त्यात अडथळा आणतात.

छतावर बागकाम करणे शुभ मानले जाते, परंतु तेथे लावलेली झाडे सुकून गेली असतील किंवा कोमेजली असतील तर ती ताबडतोब काढून टाकावीत. वास्तुशास्त्रानुसार सुकलेली झाडे नकारात्मक ऊर्जेचे प्रतीक आहेत. साफसफाई केल्यानंतर झाडू किंवा केरसुणी छतावर कधीही सोडू नका. वास्तुशास्त्रानुसार, केरसुणी ही देवी लक्ष्मीचे प्रतीक मानली जाते, त्यामुळे ती घराबाहेर किंवा छतावर ठेवणे अशुभ मानले जाते.

## प्रमोशन रखडलंय? कामाचा ताण जाणवतोय?



हिंदू धर्मशास्त्रामध्ये वास्तुशास्त्राला अत्यंत महत्त्व आहे. अनेकदा दैनंदिन आयुष्यात आपण अशा काही गोष्टी करतो, ज्यामुळे तुमच्या घरात वास्तुदोष निर्माण होतो. जेव्हा घरात वास्तुदोष निर्माण होतो, तेव्हा त्याचे अनेक नकारात्मक परिणाम तुम्हाला पहायला मिळतात. जंस की अचानक काहीही कारण नसताना एखादं मोठं आर्थिक संकट येतं. किंवा तुम्ही प्रचंड कष्ट करतात, परंतु तुम्हाला तुमच्या करिअरमध्ये अपेक्षित यश मिळत नाही? त्यामुळे वास्तुदोष दूर करणं गरजेचं असतं. वास्तुदोष दूर करण्यासाठी वास्तुशास्त्रामध्ये विविध उपाय सांगण्यात आले आहेत. आज आपण त्यातील एका सोप्या आणि सहज शक्य असलेल्या एका उपायाबद्दल जाणून घेणार आहोत. या उपायामुळे तुमची तुमच्या करिअरमध्ये उत्तम प्रगती होऊ शकते, असं वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आलं आहे.

लॅपटॉपजवळ अनावश्य वस्तू ठेवू नका वास्तुशास्त्रानुसार आपल्याला ऑफिसमध्ये अचानक एखाद्या दिवशी कामाचा ताण जाणवायला लागतो. कामाचा कंटाळा येते. नकारात्मक ऊर्जेमुळे अशा गोष्टी तुमच्यासोबत होऊ शकतात. वास्तुशास्त्रानुसार तुम्ही जर तुमच्या लॅपटॉपजवळ अनावश्यक गोष्टी ठेवल्या तर त्यामुळे नकारात्मक ऊर्जा निर्माण होते, ज्याचा प्रभाव हा तुमच्यावर पडतो, त्यामुळे तुम्हाला कामाचा कंटाळा येतो. त्यामुळे लॅपटॉपजवळ कधीही अनावश्यक वस्तू ठेवू नये, असं वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आलं आहे.

सुकलेली झाडं वास्तुशास्त्रानुसार लॅपटॉपच्या जवळ कधीही सुकलेली झाडं ठेवू नयेत, तसेच गुलाब वगळता इतर कोणतंही काटे असलेलं झाडं देखील ठेवू नये, जर तुमच्या लॅपटॉप जवळ ठेवलेली झाडं ही सुकली असतील तर त्यांना ताबडतोब काढून टाकावं आणि त्याच्या जागी फ्रेश नवीन झाडं लावावीत, असं वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आलं आहे.

धारदार वस्तू वास्तुशास्त्रानुसार लॅपटॉपजवळ कधीही धारदार वस्तू जसं की चाकू, कात्री अशा वस्तू ठेवू नये, या वस्तू एखाद्या डब्यामध्ये लॅपटॉप पासून लांब ठेवाव्यात असं वास्तुशास्त्रामध्ये सांगण्यात आलं आहे. अशा वस्तू लॅपटपसमोर ठेवणं अशुभ माण्यात आलं आहे.

खाराब इलेक्ट्रॉनिक वस्तू वास्तुशास्त्रानुसार तुमच्या ऑफिसमध्ये तुमच्या लॅपटॉपसमोर कधीही खराब झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ठेवू नका, यामुळे वास्तुदोष निर्माण होतो, असं वास्तुशास्त्र सांगतं.

## घरातील सुख-समृद्धीसाठी संध्याकाळनंतर या वस्तू खरेदी करणे टाळावे

सूर्यास्तानंतर काही वस्तू घरात आणल्यास आर्थिक अडचणी किंवा नकारात्मक परिणाम होऊ शकतात, अशी धार्मिक धारणा काही ठिकाणी आढळते. या मान्यतेनुसार संध्याकाळच्या वेळी घरातील लक्ष्मीचे आगमन आणि सकारात्मक ऊर्जेचा काळ मानला जातो. त्यामुळे या वेळेत काही गोष्टींची खरेदी करण्यापेक्षा त्या आधीच आणणे शुभ मानले जाते. अर्थात, या सर्व गोष्टी श्रद्धा आणि परंपरांशी संबंधित आहेत; याला वैज्ञानिक पुरावा नाही. तरीही अनेक कुटुंबांमध्ये या नियमांचे पालन आजही केले जाते. संध्याकाळनंतर खरेदी करू नये असे सांगितलेल्या वस्तूंमध्ये दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा उल्लेख केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार दूध हे पवित्र आणि शुभ मानले जाते. ते चंद्राशी आणि शांततेशी संबंधित असल्याचे मानले जाते. काही परंपरांमध्ये असे सांगितले जाते की संध्याकाळच्या वेळेत दूध खरेदी केल्याने घरातील सकारात्मक ऊर्जा कमी होऊ शकते.

विशेषतः पूजा, धार्मिक विधी किंवा घरातील शुभ कार्यांसाठी वापरण्यात येणारे दूध योग्य वेळी आणावे असे मानले जाते. त्याचप्रमाणे मीठ खरेदी करण्याबाबतही काही समजुती आहेत. मीठाचा संबंध घरातील समृद्धी आणि नकारात्मक ऊर्जा दूर करण्याशी जोडला जातो. त्यामुळे सूर्यास्तानंतर मीठ खरेदी केल्यास आर्थिक अडचणी येऊ शकतात, अशी काही लोकांची श्रद्धा आहे. पूर्वीच्या काळात बाजारपेठा लवकर बंद होत असल्यामुळेही संध्याकाळनंतर खरेदी करण्यावर मर्यादा असायच्या. त्यामुळे अशा अनेक प्रथा निर्माण झाल्या असाव्यात. मात्र आधुनिक जीवनशैलीमध्ये लोकांच्या गरजा बदलल्या आहेत आणि अनेकदा वेळेअभावी रात्री खरेदी करावी लागते. त्यामुळे या मान्यता पाळणे हे प्रत्येकाच्या वैयक्तिक श्रद्धेवर अवलंबून आहे. तिसरी वस्तू म्हणून हळद आणि इतर मसाल्यांचा उल्लेख केला जातो. भारतीय संस्कृतीत हळदीला धार्मिक आणि औषधी महत्त्व आहे. विवाह, पूजा आणि शुभ प्रसंगी हळदीचा वापर केला जातो. वास्तु आणि धार्मिक मान्यतेनुसार हळद ही गुरु ग्रहाशी संबंधित मानली जाते आणि ती घरात समृद्धी आणणारी असल्याचे मानले जाते. त्यामुळे काही लोक संध्याकाळनंतर हळद खरेदी करणे टाळतात. याशिवाय लोखंडाच्या वस्तूंच्या खरेदीबाबतही काही समजुती आहेत. लोखंडाचा संबंध शनिदेवाशी जोडला जातो. त्यामुळे शनिवार किंवा संध्याकाळच्या वेळी लोखंडाशी संबंधित वस्तू खरेदी केल्यास अडचणी येऊ शकतात, अशी काही धार्मिक



धारणा आहे. यामध्ये लोखंडी साधने, वस्तू किंवा घरगुती उपकरणांचा समावेश केला जातो. मात्र व्यवहाराच्या दृष्टीने पाहिले तर वस्तू खरेदी करण्याची वेळ ही ग्राहकांच्या सोयीवर अवलंबून असते. तरीही परंपरांमध्ये शुभ-अशुभ वेळेचा विचार केला जातो आणि अनेक लोक आजही त्यानुसार निर्णय घेतात. याशिवाय पैशाशी संबंधित वस्तू, जसे की पर्स, तिजोरी किंवा आर्थिक वापराच्या काही वस्तू संध्याकाळनंतर खरेदी करू नयेत, अशीही काही मान्यता आहे. लक्ष्मी देवीचा संबंध धन आणि समृद्धीशी जोडला जातो. त्यामुळे घरात धनवृद्धी व्हावी आणि आर्थिक स्थैर्य टिकून राहावे यासाठी काही लोक अशा वस्तू खरेदी करण्यासाठी शुभ वेळ निवडतात. तसेच पूजा साहित्य किंवा धार्मिक वस्तू खरेदी करतानाही योग्य वेळेचा विचार केला जातो. कारण या वस्तू घरातील आध्यात्मिक वातावरणाशी संबंधित मानल्या जातात. भारतीय परंपरेमध्ये दिवसातील सकाळचा वेळ नवीन कामांसाठी अधिक शुभ मानला जातो. त्यामुळे अनेक शुभ वस्तूंची खरेदी सकाळी किंवा दिवसा करण्याची प्रथा आहे. या मान्यतांमागे घरातील शिस्त, नियोजन आणि सकारात्मक विचार टिकवून ठेवण्याचा उद्देश असल्याचे काही लोक मानतात. पूर्वीच्या काळात लोक सूर्याच्या हालचालींनुसार जीवन जगत असत. त्यामुळे सूर्यास्तानंतर कामे कमी करणे, विश्रांती घेणे आणि घरातील वातावरण शांत ठेवणे यालाही महत्त्व दिले जात असे. शेवटी, अशा धार्मिक आणि वास्तुशी संबंधित मान्यता या मुख्यतः श्रद्धेवर आधारित आहेत हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. कोणती वस्तू कधी खरेदी करावी किंवा करू नये याबाबत प्रत्येक व्यक्तीची विचारसरणी वेगळी असू शकते. काही लोक या नियमांचे पालन करून मानसिक समाधान आणि सकारात्मकता अनुभवतात, तर काही लोक त्याकडे केवळ परंपरा म्हणून पाहतात. आर्थिक समृद्धीसाठी केवळ खरेदीची वेळ महत्त्वाची नसून योग्य आर्थिक नियोजन, बचत, मेहनत आणि योग्य निर्णय घेणे अधिक महत्त्वाचे आहे. घरातील आनंद आणि शांतता टिकवण्यासाठी परस्पर प्रेम, विश्वास आणि चांगले विचार आवश्यक असतात. त्यामुळे अशा परंपरांचा आदर करताना त्यांचा अर्थ समजून घेणे आणि त्यांना अंधश्रद्धेऐवजी सांस्कृतिक वारसा म्हणून पाहणे योग्य ठरते. श्रद्धा ठेवणाऱ्यांनी या नियमांचे पालन करावे, परंतु दैनंदिन जीवनातील आवश्यक गरजांसाठी व्यवहारिक विचार करणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

# साप्ताहिक राशीभविष्य

## १८ जुलै २०२६ ते २४ जुलै २०२६

**अनुकूलता जाणवेल**

**मेष** – आजूबाजूच्या परिस्थितीतून आपल्याला अनुकूलता जाणवेल. लहान-मोठी रोजची कामे सहज होत असल्याकारणाने आपल्याला आश्चर्य वाटेल. मात्र जास्त जोखीम भरलेली कामे पूर्ण करताना खबरदारी अवश्य घ्या. कोणावरही डोळे झाकून विश्वास ठेवणे नुकसानकारक होऊ शकते. नोकरीमध्ये मुत्सद्दीपणाने वागण्याची गरज आहे. राजकारणापासून तसेच गटबाजीपासून दूर राहणे हिताचे ठरेल. तुमच्या बोलल्यामुळे अनेक अडचणी दूर होतील. आपल्या मताला प्राधान्य मिळून इतरांवर प्रभाव टाकाल. कौटुंबिक स्थिती चांगली राहील.

**शुभ घटना घडतील**

**वृषभ** –गेल्या काही दिवसांमध्ये ज्या तब्येतीच्या कुरबुरी होत्या त्या संपुष्टात येतील. त्यामुळे उत्साहात वाढ होईल तसेच अनेक चांगल्या आणि शुभ घटना घडून येतील. भावंडांच्या भेटीगाठी होतील. जवळचा प्रवास करावा लागेल. देवदर्शनाच्या निमित्ताने हे प्रवास होतील. नोकरीमध्ये परिस्थिती चांगली राहील. प्रगती दिसेल. काहींना पदोन्नती, तर काहींची बदलीदेखील होऊ शकते. कामाच्या स्वरूपात बदल होईल. अधिकार वाढतील. मुलांच्या प्रगतीपर वार्ता कानी पडेल. अचानक धनलाभ होऊ शकतो.

**भागीदाराबरोबर उत्तम संबंध राहतील**

**मिथुन** – हा आठवडा तसा अनुकूल स्वरूपाचा जाणार आहे. घेतलेल्या परिश्रमांचे चीज होईल. नोकरदारांना दिलासा मिळू शकतो. पदोन्नती व वेतन वृद्धीची शक्यता. नोकरीनिमित्त प्रवासाचे योग जवळचे किंवा दूरचे प्रवास करण्याचे नियोजन करू शकाल; परंतु वादविवादाचे प्रसंग टाळा. कुटुंबात मुला-मुलींकडून मनाला समाधान देणाऱ्या वार्ता मिळतील. त्यांच्याविषयीच्या समस्या संपुष्टात आल्यामुळे कुटुंबातील वातावरण आनंदी व समाधान अनुभवाल. व्यवसायात उलाढाल वाढून नफ्याचे प्रमाण वाढल्याने समाधानी राहाल. व्यावसायिक भागीदाराबरोबर उत्तम संबंध राहतील.

**अचानक धनलाभ**

**कर्क** – निरनिराळ्या मार्गांनी अचानक धनलाभ होऊ शकतो. जमिनीची तसेच मालमत्तेची कामे मार्गी लागून आर्थिक आवक होईल. कार्यमग्न राहाल, मात्र स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे क्रमप्राप्त ठरेल. जीवनसाथीचे सहकार्य सर्व बाबतीत मिळेल. नातेवाइकांच्या संपर्कात याल. मात्र वादविवाद टाळणे हिताचे ठरेल. घरात आनंदी वातावरण कसे राहील, याच्या प्रयत्नात असाल. मनात एक अनामिक भीती घर करून राहू शकते. नोकरी-व्यवसायात सहकाऱ्यांचे अपेक्षित सहकार्य मिळेल. महत्त्वाची कामे हातावेगळी करू शकाल, मात्र सरकारी कामात विलंब लागू शकतो. प्रवासाचे बेत आखले जातील.

**गैरसमज दूर होतील**

**सिंह** – होती ती पूर्ण होण्याच्या मार्गावर असतील. काही कामे पूर्ण करण्यात यश मिळेल तसेच या सप्ताहात धनप्राप्तीचे प्रभावी योग आहेत. अनेक मार्गांनी धनलाभ होतील. व्यवसाय धंद्यातील जुनी येणी वसूल झाल्यामुळे आर्थिक परिस्थिती सुधारेल. व्यवसायात नवीन संकल्पना राबवू शकाल. जमिनीच्या व्यवहारांमध्ये लाभ होतील. वारसाहक्काची कामे होतील. भावंड आणि नातेवाईक यांच्यातील गैरसमज दूर होतील. चांगले संबंध प्रस्थापित होतील. मित्रमंडळी भेटतील.

**शैक्षणिक प्रगती होईल**

**कन्या** – बहुतेक क्षेत्रातील नियोजन यशस्वी झाल्याकारणाने ताणतणाव मुक्त वातावरणाचा लाभ मिळेल. मनासारख्या घटना घडतील. जी महत्त्वाची कामे पूर्ण होण्याची आपण वाट बघत होतात ती होऊ शकतात. महत्त्वाचे निरोप येतील. कुटुंबातील विवाहयोग्य तरुण-तरुणींचे विवाह निश्चित होण्यामधील अडचणी दूर होतील. कुटुंबातील मुला-मुलींचे प्रश्न संपुष्टात येतील. शैक्षणिक प्रगती होईल. कुटुंबात आनंदी वातावरण राहील. अवघड कामे पूर्ण होतील. त्यामुळे डोक्यावरचे ओझे उतरल्यासारखे वाटेल.

**खर्चावर नियंत्रण ठेवायला हवे**

**तूळ** – मनासारख्या घटना घडल्यामुळे आनंदी आणि प्रसन्न राहाल. धनप्राप्तीचे योग आहेत. काही अडकलेले पैसे मिळतील. व्यवसाय-धंद्यात भरभराट होईल. नोकरीत आपल्या कामामुळे वरिष्ठ प्रभावित होऊ शकतात. खर्चावर नियंत्रण ठेवायला हवे. काहींना दूरचे प्रवास करावे लागतील. धार्मिक कार्यक्रमांमध्ये भाग घ्याल. जीवन साथीचे सहकार्य लाभेल. तरुण-तरुणींना प्रेमामध्ये यश मिळू शकते. अनुकूल प्रतिसाद मिळेल. एखाद्या महत्त्वाच्या कार्यामध्ये अनपेक्षित अडचणी निर्माण होण्याची शक्यता.

**धार्मिक स्थळी भेट द्याल**

**वृश्चिक** – सामाजिक तसेच धार्मिक कार्यात सक्रिय योगदान द्याल. स्वतः खर्च कराल तसेच सहकुटुंब सहपरिवार एखाद्या पवित्र धार्मिक स्थळी भेट द्याल. दान धर्माकडे कल राहील. पूजापाठ करण्यात मन रमेल. लोकांना मदत कराल. मालमत्तेच्या अथवा जमिनीच्या व्यवहारात आर्थिक लाभ होऊ शकतात. वडिलोपार्जित संपत्तीबद्दलचे वाद-विवाद मिटतील. आर्थिक परिस्थिती सुधारेल. पैशाचा ओघ राहील. नोकरीत सहकारी तसेच वरिष्ठांचे अपेक्षित सहकार्य मिळेल. आवडत्या कलेसाठी, छंदासाठी वेळ, पैसा खर्च करू शकाल.

**जीवनसाथीची साथ मिळेल**

**धनु** – कुटुंबामध्ये आनंदी आणि उत्साही वातावरण राहील. एखादे धार्मिक किंवा मंगलकार्याचे आयोजन होऊ शकते. गृहसौख्य चांगले राहील. घरातील सदस्यांचे अपेक्षित सहकार्य मिळेल. जीवनसाथी साथ मिळेल. तसेच मदतही मिळेल. व्यवसाय-धंद्यात उलाढाल वाढेल. मात्र संबंधितांशी मधुर संभाषण करा. नोकरीत अनुकूल परिस्थिती राहून ताणतणाव संपुष्टात येऊ शकतो. वरिष्ठांचे तसेच हाताखालील मंडळींचे अपेक्षित सहकार्य लाभेल. महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. सहकुटुंब प्रवासाचे बेत निश्चित कराल. काही वेळेस महत्त्वाच्या कामांत समस्या वाढण्याची शक्यता.

**जमिनीच्या कामात यश**

**मकर** – पूर्वी केलेल्या नियोजनाद्वारे कामे पूर्ण होत असलेली बघून आत्मविश्वासात वाढ होईल. विविध प्रकारच्या कामांना गती मिळून कामे पूर्णत्वाच्या मार्गावर राहतील. स्थावर मालमत्ता अथवा जमिनीच्या कामात यश लाभेल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी संपादित करण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. कामांमधील शिस्त पाळण्याची आवश्यकता तसेच आपले कामांमधील ज्ञान अद्यावत ठेवण्याची आवश्यकता आहे. हाताखालील मंडळींचे सहकार्य अपेक्षेप्रमाणे मिळेल. मुला-मुलींच्या प्रश्नांकडे वेळीच लक्ष देणे क्रमप्राप्त ठरेल. आर्थिक परिस्थिती ठीक राहील.

**आनंदित राहाल**

**कुंभ** – सामाजिक तसेच धार्मिक आतापर्यंत जे जातक नोकरीच्या शोधात होते अशा जातकांचा नोकरीविषयक प्रश्न अथवा समस्या सुटून नोकरी मिळेल. रोजगार उपलब्ध होईल. पूर्वी दिलेल्या नोकरीविषयक मुलाखती यशस्वी ठरून नोकरीसाठी बोलावणे येऊ शकते तसेच कॉलेज कॅम्पसमधून नोकरीसाठी निवड होऊ शकते. आपल्या आवडत्या क्षेत्रात काम करायची संधी मिळाल्यामुळे आनंदित राहाल. चालू नोकरीमध्ये कामाचे स्वरूप बदलू शकते. जबाबदाऱ्या वाढतील. नोकरीत अतिरिक्त कार्यभार सोपवला जाऊ शकतो.

**प्रवासात सावधानता बाळगा**

**मीन** – सहकुटुंब सहपरिवार अथवा मित्रमंडळींसह लहान तसेच दूरच्या अंतराचे प्रवास करू शकाल. मात्र प्रवासात सावधानता बाळगणे गरजेचे आहे. प्रवासात खाण्या-पिण्यावर नियंत्रण आवश्यक आहे. देवदर्शन घडेल. सकारात्मक विचारांमध्ये वृद्धी होईल. नातेवाईक आप्तेष्टांच्या भेटीगाठी होऊन त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हाल. व्यवसाय धंद्यातील परिस्थिती समाधानकारक राहून नवीन गुंतवणूक करण्याची इच्छा होईल अथवा व्यवसाय विस्तार करता येईल. नोकरीत परिस्थिती सर्वसामान्य राहील. अपेक्षित कामे होतील. आर्थिक चिंता कमी होईल.

# मिरज पचायत समितीतील सत्तासमीकरणाला धक्का

## सभापती–उपसभापती निवड अवैध

**मिरज,ता.१७ (प्रतिनिधी)–**

**मिरज पंचायत समिती सभापती आणि उपसभापती निवड पुणे विभागीय आयुक्त कार्यालयाने रद्द केली आहे. याबाबतचा निकाल शुक्रवारी दिला.**

मिरज पंचायत समितीत काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी, शिवसेना शिंदे गट यांनी आघाडी करत सत्ता स्थापन करून सभापती व उपसभापतींची निवड केली होती. पंचायत समिती निवडणुकीत सर्वात मोठा ठरलेला भाजप पक्ष व युती तसेच विरोधी आघाडी यांची सदस्य संख्या समान होत होती. त्यामुळे भाजप युती मधील शिवसेनेच्या एका सदस्याचे अपहरण करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. त्याबाबत पोलिसात गुन्हाही दाखल झाला आहे. या पार्श्वभूमीवर मिरज पंचायत समितीच्या सभापती, उपसभापती निवडीला विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात आव्हान देण्यात आले होते. यावर झालेल्या सुनावणीमध्ये अतिरिक्त विभागीय आयुक्त कविता द्विवेदी यांनी याबाबतचे आदेश दिले.

सभापतीपदी काँग्रेसच्या तन्वी कमलेकर व उपसभापतीपदी शिवसेना शिंदे गटाच्या सदस्या ललिता शेजुळ यांची निवड करण्यात आली होती. २२ सदस्य संख्या असलेल्या मिरज पंचायत समितीमध्ये काँग्रेस दोन्ही राष्ट्रवादी व शिवसेना शिंदे गटाकडे ११ सदस्य तर भाजप व शिवसेना शिंदे गट युतीकडे ११ सदस्य होते. दोन्ही आघाड्यांची सदस्य संख्या समान होत होती. मात्र सभापती निवडीवेळी बुधगावचे शिवसेना शिंदे गटाचे सदस्य पांडुरंग इंगळे हे गैरहजर राहिले. आघाडीच्या कार्यकर्ते व नेत्यांकडून इंगळे यांचे अपहरण करून त्यांना जाणीवपूर्वक सभापती निवडीवेळी गैरहजर ठेवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. कवलापूर येथील सदस्य राणी भोरे यांनी सभापती, उपसभापती निवडीला आव्हान देणारा अर्ज विभागीय आयुक्त कार्यालयाकडे केला होता. हे प्रकरण पोलिस ठाण्यापर्यंत गेले असून पोलिसात इंगळे यांच्या अपहरण प्रकरणी आघाडीच्या नेत्यांविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. यानंतर सभापती –उपसभापती निवडीला पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात आव्हान देण्यात आले होते. मार्चमध्ये झालेल्या सभापती उपसभापती निवडीनंतर चार महिन्यांनी विभागीय आयुक्त कार्यालयाचा शुक्रवारी निकाल जाहीर झाला. या निर्णयामुळे पंचायत समितीतील सत्ताधारी काँग्रेस, दोन्ही राष्ट्रवादी व शिवसेना आघाडीला धक्का बसला आहे.

**राणी भोरे यांनी दाखल केलेला अर्ज मान्य करत सभापती निवड प्रक्रिया रद्द करण्यात येत असून जिल्हाधिकारी यांनी सभापती पदासाठी फेर निवडणूक घेण्याबाबत कार्यवाही करावी, असे आदेश देण्यात आले आहेत. निर्णय मान्य नसल्यास राज्य शासनाकडे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम अनुसार आदेश पारित झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.**

# स्व. विजयसिंह यादव यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम

**पेठवडगाव,ता.१७( प्रतिनिधी)–**

**रौप्यमहोत्सवी माजी नगराध्यक्ष स्व. विजयसिंह यादव यांच्या जयंतीनिमित्त विजयसिंह यादव प्रतिष्ठानच्या वतीने शनिवारी १८ रोजी विविध सामाजिक, वैद्यकीय आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांना नागरिकांनी उपस्थित रहावे,असे आवाहन नगराध्यक्षा विद्याताई पोळ यांनी केले आहे.**



स्व. विजयसिंह यादव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबवले जातात. यंदाही प्रतिष्ठानने समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.यामध्ये सकाळी १० वाजता स्व. विजयसिंह यादव चौक येथे त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात येईल.त्यानंतर दिगंबर जैन सांस्कृतिक हॉल येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, ए.एम.सी. संचलित गिरीजा हॉस्पिटलच्या वतीने मोफत विशेष हृदयविकार निदान शिबिर आयोजिले आहे. याचबरोबर सायंकाळी ६ वाजता बळवंतराव यादव हायस्कूलच्या क्रीडांगणावर विशेष सांगीतिक मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील प्रतिभावान अंध व दिव्यांग कलाकारांचा नेत्रस्वरदीप हा बहारदार संगीतमय कार्यक्रम रंगणार आहे. यामध्ये जुन्या व नव्या मराठी–हिंदी गाण्यांचा नजराणा सादर केला जाईल.



संविधान स्तंभाच्या उभारणीबाबत जाब विचारताना भीमसैनिक.

# संविधान स्तंभाची निर्मिती महिन्यात न केल्यास आंदोलन

**कबनूर,ता.१७(वार्ताहर )–**

**कबनूर ग्रामपंचायत समोरील चौकात संविधान स्तंभाची महिन्यात निर्मिती करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.असा इशारा समस्त बौद्ध समाज व भीमसैनिकांनी सरपंच सुलोचना कट्टी व उपसरपंच सुधीर लिगाडे यांना निवेदनाद्वारे दिला.**

संविधान स्तंभ उभारण्याबाबत कबनूर ग्रामपंचायतीला २५ नोव्हेंबर २०२४ रोजी निवेदन दिले होते. मागणी करूनही काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे बौध्द समाजामध्ये असंतोष उफाळून आल्यामुळे बौध्द समाजातील भीमसैनिकांनी सरपंच सुलोचना कट्टी व उपसरपंच सुधीर लिगाडे यांना प्रश्नांचा भडीमार करून जाब विचारला. भीमसैनिकांनी एक महिन्याच्या आत संविधान स्तंभाची मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला.यावेळी नेताजी कांबळे,मधुकर फरांडे, डी. टी.शिंगे, श्रीकांत कांबळे, जालिंदर कांबळे, राजरत्न शांतीसम्राट,सुदाम फरांडे, संदीप आवळे,ओंकार कांबळे,सर्वेश कांबळे, पृथ्वीराज कांबळे उपस्थित होते.

महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

**ई–निविदा नोटीस**

एसआरएम निविदा क्र. १६/२०२६–२७; **(RFX No. ७०००४०८१४)**
११० के.व्ही. कोथळी उपकेंद्र, ११० के.व्ही. पुईखडी उपकेंद्र आणि ११० के.व्ही. राधानगरी उपकेंद्र, जिल्हा कोल्हापूर येथील दैनंदिन देखभालीची कामे.
**अंदाजित रक्कम** रु. १४,०४,९४४.००, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख :** १७.०७.२०२६ (११.००) ते ०२.०८.२०२६ (११.००)
**टीप :** सदरच्या कामाची फेरनिविदा करण्याची गरज पडल्यास वृत्तपत्रांमध्ये पुन्हा प्रसिद्ध करण्यात येणार नाही. पुढील प्रक्रियेकरिता इच्छुक निविदा सादर करणाऱ्यांनी महापारेषण कंपनीच्या वेबसाईटला भेट द्यावी.
अधिक माहितीसाठी वेबसाईटला भेट द्या –
**https://srmetender.mahatransco.in**

**कार्यकारी अभियंता (स्था)**
**अउदा स्था. बांध. नि सु. विभाग, कोल्हापूर**

# रमाई आवास योजनेतील भ्रष्टाचाराची चौकशी करा

**इचलकरंजी ता.१७ –**

**रमाई आवास योजनेमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी अशी मागणी रमाई आवास घरकुल संघटनेचे अध्यक्ष सुखदेव माळकरी यांनी जिल्हाधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.**

### जिल्हाधिकारी व समाज कल्याण अधिकारी यांना निवेदन



समाज कल्याण अधिकारी यांना निवेदन देताना सुखदेव माळकरी.

दिलेल्या निवेदनात, इचलकरंजी महानगरपालिकेने साईट नंबर १०२ याठिकाणी १८१ घरकुलापैकी तीन बिल्डींग एबीसी यामध्ये ९६ खोल्या बांधलेल्या आहेत.त्याचे वाटप कोरोनाच्या काळात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी अतिशय घाई गडबडीत व सदरची घरे अर्धवट स्थितीत केले आहे. बांधकाम अतिशय निकृष्ठ दर्जाचे असून राहायला आलेल्या माणसांच्या जीवनाशी खेळ केला जात आहे. यामध्ये जीवितहानी होण्याचा मोठा धोका आहे.

याबाबत प्रशासनास वारंवार अर्ज, तक्रारी, हरकती दिल्या असून देखील कोणीही अधिकारी याबाबतीत लक्ष द्यायला तयार नाही. सदरची योजना ही मागासवर्गीयांसाठी असल्याने जाणूनबुजून निकृष्ठ दर्जाचे काम केलेले आहे. आजपर्यंत महानगरपालिका झाल्यापासून सर्व आयुक्त पाहणी करुन गेले.परंतू त्यानंतर याबाबतीत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

अधिकारी व मक्तेदार यांनी संगनमताने कोणीही विचारणार नाही म्हणून ढिसाळ दर्जाचे काम केले आहे. जिथे आवश्यकता नाही तिथे शौचालय बांधले आहे. ते देखील सध्या पडीक अवस्थेमध्ये आहे.

याबाबत जातीनीशी लक्ष घालून झालेले निकृष्ठ दर्जाचे बांधकाम पाडून नविन बांधकाम करुन घरकुलाचा लाभ ते लाभार्थ्यांना द्यावा अशी मागणी केली आहे.

# सत्तारूढ व विरोधकांत जुंपली

## गडहिंग्लज नगरपालिका सभा वादळी

**गडहिंग्लज,ता.१७(प्रतिनिधी)–**



**आम्ही निधी आणतो तुम्ही ठराव करून द्या यातून सत्तारूढ व विरोधी नगरसेवकांत वादावादी होऊन गडहिंग्लज नगरपालिकेच्या सभेत गदारोळ उडाला. भाजपच्या विरोधी पक्षनेत्या प्रा.स्वाती शिंदे कोरी यांच्यासह पाच सदस्यांनी सत्तारूढ राष्ट्रवादी काँग्रेसच्या सदस्यांच्या भूमिकेवरून खेद व्यक्त करत सभात्याग केला.**

आम्ही विकास कामांची यादी देऊन देखील सभेच्या पत्रिकेवर सुचवलेली विकास कामे घेतली जात नाहीत.विरोधातून निधीच उपलब्ध करून दिला नसल्याने आमच्या प्रभागातील कामे होत नाहीत याबद्दल संताप व्यक्त करत स्वाती शिंदे कोरी, प्रा.बिनादेवी कुराडे, नितीन देसाई, संजय रोटे, अनिता खोत यांनी राष्ट्रवादीच्या नगरसेवकांच्या भूमिकेचा निषेध करीत सभात्याग केला. सत्तारूढ नगरसेवकांनीदेखील विरोधी भाजप सदस्यांचा तीव्र निषेध करून ५ नगरसेवक पळपुटे ठरले आहेत असा आक्रमक पवित्रा घेतल्याने पालिकेची सभा गाजली. अध्यक्षस्थानी प्रभारी नगराध्यक्ष महेश सलवादे होते.प्रशासनाची बाजू मुख्याधिकारी देवानंद ढेकळे यांनी सांभाळली. भाजपच्या नगरसेवकांच्या या भूमीकेबद्दल बांधकाम सभापती गुंडोपंत पाटील, नरेंद्र भद्रापूर, रश्मीराज देसाई, बसवराज खनगावे, अमर मांगले संतोष चिकोडे यांनी जोरदार आक्षेप घेत त्या पाच सदस्यांचा निषेध केला. गुंडोपंत पाटील म्हणाले, २०१६ ते २०२१ या कालावधीत स्वाती कोरी नगराध्यक्ष म्हणून सत्तेवर असताना ज्यावेळी गडहिंग्लजचा पाणी प्रश्न निर्माण झाला होता.त्यावेळी सावित्री पाटील यांनी लक्ष वेधताच त्यांना अपमानास्पद वागणूक देत त्यांचा माईक काढून घेण्याचा प्रकार घडला होता. नरेंद्र भद्रापूर म्हणाले, मंत्री हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाने गडहिंग्लज शहरासाठी १३५ कोटीचा निधी आणला आहे. शहर विकासाच्या दृष्टीने विविध योजना मार्गी लावल्या आहेत.यावेळी भाजपचे शहराध्यक्ष प्रीतम कापसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

देवदासी चळवळीतील दिवंगत गौराबाई सलवादे यांचा नातू महेश सलवादे प्रभारी नगराध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या अभिनंदनचा ठराव गुंडोपंत पाटील मांडत असतानाच स्वाती शिंदे कोरी यांनी सभागृहाचा निषेध केल्याने यासारखे दुसरे दुःख कोणते? अशी विचारणा रश्मीराज देसाई यांनी केली. गडहिंग्लज नगरपालिकेतील काही गोपनीय कागदपत्रे विरोधी सदस्यांच्या माध्यमातून भाजपचे पदाधिकारी बेकायदेशीररित्या बाहेर नेत असल्याचा आरोप नरेंद्र भद्रापूर यांनी केला. त्यावर प्रभारी नगराध्यक्षानी चौकशी समिती नेमून चौकशी करण्याचे आश्वासन सभागृहाला दिले.

# हालशुगरमधील साखर चोरीचा तपास ७ ऑगस्टपर्यंत करावा

### प्रा.सुभाष जोशी :अन्यथा सीपीआय कार्यालयासमोर उपोषण

**निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–**

**येथील श्री हालसिध्दनाथ सहकारी साखर कारखान्यात झालेल्या साखर चोरीच्या प्रकारामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. मात्र, या प्रकरणी पोलिसांना तपास करण्यासाठी उच्च न्यायालयाने निर्देश असून देखील पोलीस तपासात हलगर्जीपणा करत आहेत.येत्या ७ ऑगस्टपर्यंत तपास न झाल्यास ८ रोजी सीपीआय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू, त्यानंतर १५ ऑगस्टपर्यंत चौकशी झाली नाही; तर,बेमुदत उपोषण सुरू करणार आहोत. त्यास संपूर्णपणे निपाणीचे सीपीआयच जबाबदार राहतील असा इशारा माजी आमदार प्रा.सुभाष जोशी यांनी दिला.**

प्रा.जोशी म्हणाले, हालसिध्दनाथ कारखान्यामध्ये ५० हजार साखर पोत्यांचा हिशोब लागत नव्हता. म्हणून तक्रार केल्यानंतर जीएसटी विभागाने साखर कारखान्याची चौकशी करून पाच हजार बेहिशेबी साखर पोती पकडून सुमारे ९६ लाख रुपयांचा दंड आकारला.त्यानंतर निपाणी सिव्हिल कोर्टात दावा दाखल केल्यानंतर कारखान्याच्या सर्व संचालकांना दोषी धरून त्यांना जामीनासाठी अर्ज करायला सांगितले.फक्त संचालक सुकुमार पाटील यांनीच जामीन घेतला. त्यानंतर या चौकशीविरोधात संचालकांनी हायकोर्टात अपील केले.

हायकोर्टनेही त्यांना स्टे–ऑर्डर दिला. हायकोर्टने काही दिवसांनी हा स्टे उठवून परत हे प्रकरण निपाणी सिव्हिल कोर्टाकडे पाठवले.कोर्टने सर्वांना नोटीस पाठवून सीपीआय निपाणी यांना चौकशी करण्याचे आदेश दिले होते.मात्र अधिकाऱ्यांनी चौकशी केल्यानंतर ५० हजार पोत्यांचा हिशेब लागत नाही, असा अहवाल जिल्हा पोलीस प्रमुखांना दिला.अजूनही सीपीआयनी कोणतीही चौकशी केलेली नाही.

७ ऑगस्टपर्यंत सीपीआयनी चौकशी केली नाही तर ५००० कार्यकर्त्यांसह सीपीआय कार्यालयासमोर धरणे आंदोलन करू. तसेच १५ ऑगस्टपर्यंत चौकशी केली नाही; तर, त्यापुढे बेमुदत उपोषण सुरू केले जाईल.याला पूर्णपणे निपाणी सीपीआय हेच जबाबदार असतील.असा इशारा प्रा.जोशी यांनी दिला.

**TENDER NOTICE**

**1. Supply, Installation, Commissioning and Testing of Generator Set 125 KVA**

**2. Supply of Utility Pick up Vehicle and Refrigerated Container**

The Government of Maharashtra is implementing the World Bank-funded Hon. Balasaheb Thackeray Agribusiness and Rural Transformation (SMART) Project. **Meatyens Farmer Producer Company Ltd, 1156 Unit No. F10 First Floor,Manik chambers Rajarampuri Kolhapur 416221** is one of the beneficiaries of the project and is inviting offline bids for the above-mentioned machinery. The bid document is available on the project website, **www.smart-mh.org,** in the tender and procurement section. The last date for submission of offline bids is **27/07/2026 up to 2.00 PM.** any updates or notices shall be published on the aforementioned website only.

**Meatyens Farmer Producer Company Ltd, 1156 Unit No. F10 First Floor,Manik chambers Rajarampuri Kolhapur 416221**

# श्री नामदेव समाज सेवा मंडळातर्फे आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन

**इचलकरंजी ता. १७ –**

**संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या ६७६ व्या समाधी महोत्सवानिमित्त, श्री नामदेव समाज सेवा मंडळ आणि श्री संत नामदेव युवक व महिला मंडळ, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने इचलकरंजी व परिसरातील विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.**

२६ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत चित्रकला, सामान्यज्ञान, बुद्धीबळ, निबंध, वक्तृत्व, पाठांतर, गायन आणि वेशभूषा अशा विविध स्पर्धांचे आयोजन संत नामदेव भवन येथे करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये इयत्ता पहिली ते दहावीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. शाळांमार्फत नोंदणीची अंतिम तारीख २२ जुलै २०२६ आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले जाणार असून, २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता पारितोषिक वितरण समारंभ होईल. अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी किंवा शाळांनी संत नामदेव भवन येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.



खास.प्रियंका जारकीहोळी यांना निवेदन देताना माजी सैनिक यांच्यासह ग्रामस्थ.

# पांडेगाव–कंगनोळी रस्त्याची दुर्दशा

**अथणी,ता.१७ (प्रतिनिधी)–**

**अवजड वाहनामुळे पांडेगाव –कंगनोळी रस्त्याची दुर्दशा झाली आहे. रस्ता दुरुस्त करून डांबरीकरण करावा, अशी मागणी माजी सैनिक सचिन पाटील, राजाराम आठवले यांच्यासह ग्रामस्थांनी खास.प्रियंका जाहिरकीहोळी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.**

पांडेगाव–कंगनोळी मार्गावर कारखान्याचे काम सुरू असून त्या कारखान्याकडे अवजड वाहने जात आहेत.रस्ता खराब झाल्याने या रस्त्यावरून वाहतूक करणे अडचणीचे झाले आहे. या परिसरातील नागरिक दवाखान्यासाठी सांगली येथे जातात. खराब रस्त्यामुळे जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागतो. रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. यावेळी धनाजी जाधव, सुभाष पाटील, संदीप पाटील, अजित पाटील, राजू कागले उपस्थित होते.याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, आम. राजू कागे, पंचायत पंचायत अधिकारी यांनाही दिले आहे.याबाबत लवकर निर्णय झाला नाही तर तहसील कार्यालयासमोर उपोषण करू,असा इशारा देण्यात आला आहे.

# निपाणी पालिका आयुक्तांनी साधला अपात्र घरकुल लाभार्थ्यांशी सवांद

**निपाणी,ता.१७(प्रतिनिधी)–**

### हरकतींसाठी २० जुलैपर्यंत अंतिम मुदत

**आम्हाला घरे नसल्याने घरकुलासाठी अर्ज केला आहे.यासाठी कर्जे घेऊन आम्ही बँकेत पैसे भरले आहेत.त्यामुळे आम्हाला अपात्र ठरवू नये, इतरांप्रमाणे आम्हालाही घरकुलांचा लाभ मिळावा, असे म्हणणे अपात्र लाभार्थी आयुक्तांसमोर मांडत आहेत.मात्र सर्व अपात्र लाभार्थ्यांशी चर्चा करून पालिका घरकुल वाटपाचा निर्णय घेणार आहे.**

**पंतप्रधान आवास योजने अंतर्गत लाभार्थींचा सर्व्हे अखेर पूर्ण झाल्यानंतर घर नसलेल्या ६१९ पात्र व ४०२२ अपात्र लाभार्थ्यांची नवीन यादी पालिकेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केली होती.**

**त्यानंतर ४०२ अपात्र लाभार्थ्यांपैकी २०० हून अधिक जणांनी या लावलेल्या यादीवर आक्षेप घेतला होता.त्यांनतर अपात्र लाभार्थ्यांना पालिकेने नोटीसा पाठविल्या असून दररोज २५ लाभार्थ्यांशी आयुक्तांकडून बैठक घेऊन त्यांच्याशी वैयक्तिकपणे सवांद साधला जात आहे.सर्व अपात्र लाभार्थ्यांशी सवांद साधल्यानंतर पालिका प्रशासन अंतिम निर्णय घेणार आहे.**

२० मे २०२६ रोजी घरकुल वितरण कार्यक्रम पट्टणकुडी येथील दाईंगडे मळा येथे आयोजिला होता.मात्र घरकुल लाभार्थी यादीत दोष असल्याच्या कारणावरून काँग्रेस व भाजपमध्ये मोठा राडा झाला.त्यानंतर अधिकाऱ्यांना हा कार्यक्रम रद्द करावा लागला.

कार्यक्रम रद्द झाल्यानंतर नगरपालिका प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांची यादी सर्वप्रथम रक्कम भरलेल्या बँक पावत्यांच्या अनुक्रमांकानुसार फलकावर ५ जून रोजी लावली होती.त्यानंतर पुन्हा कोटेकोरपणे सर्व्हे करण्याच्या सुचना प्रांताधिकाऱ्यांनी पालिकेस दिल्या होत्या.

तसेच सर्व्हेमध्ये दोष आढळल्यास कडक कारवाईचा इशारा पालिका कर्मचाऱ्यांना दिला होता.त्यानुसार १०२१ लाभार्थ्यांचा नव्याने सर्व्हे करून पात्र ६१९ व अपात्र ४०२ अशा नवीन याद्या प्रसिध्द केल्या आहेत.

सर्व्हे करताना संबधित कुटबांचे घर आहे की नाही, तसेच यासाठी साक्षीदार म्हणून ४ शेजाऱ्यांच्या सह्या घेण्यात आल्या आहेत.त्यानंतरच नवीन याद्या प्रसिध्द केल्या आहेत.या यादीवर २०० हून अधिक हरकती दाखल झाल्या असून अजूनही २० जुलैपर्यंत हरकती नोंदविता येणार आहेत.

**कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.** (मल्टी–स्टेट शेड्युल्ड बँक)
मुख्य शाखा कार्यालय :–वॉर्ड नं. १२, घर नं. १, मेन रोड, जनता बँक भवन, इचलकरंजी – ४१६११५ जिल्हा–कोल्हापूर (महा.राज्य ) फोन नं. ०२३०–२४३३५०५ ते ५०८,
मुख्य शाखा कार्यालय :– वॉर्ड नं. १२, घर नं. १, मेन रोड, जनता बँक भवन, इचलकरंजी – ४१६११५ जिल्हा – कोल्हापूर.

**जाहीर विक्री नोटीस**

बँकेच्या ताब्यात असलेल्या तारण जंगम मालमत्ता (म्हणजेच वाहन) विक्री बाबत जाहीर नोटीस.

खालील नमूद कर्जदार यांना बँकेने वेळोवेळी लेखी व तोंडी विनंती करुन सुध्दा कर्जाची परतफेड करणेस कसूर केलेली आहे व सदर कर्ज खाते एन. पी. ए. झालेले आहे. तसेच खालील नमुद कर्जदार यांनी खालील तक्त्यामधील वाहनाच्या वर्णनातील नमुद केलेले वाहने विक्री करुन येणारी रक्कम कर्जाच्या वसुली पोटी जमा करुन घेणेसाठी बँकेच्या ताब्यात घेतलेले आहे. तसेच बँकेने खाली नमूद कर्जदार व त्यांचे जामीनदार यानां सदर वाहन बँक विक्री करणार असलेबाबत कळविले आहे. त्यामुळे खाली सही करणार कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि., प्राधिकृत अधिकारी यांनी आपली येणेबाकी वसुलीसाठी खाली नमुद केलेप्रमाणे तारण वाहन जशी आहे तशी व जिथे आहे तशी या तत्वावर खरेदी करण्यास इच्छुक खरेदीदाराकडून विहित नमुन्यातील निविदामधुन त्यांचे खरेदी प्रस्ताव मागविले आहेत.

| कर्जदार व जामीनदार यांची नावे व कर्जखाते नं. | शाखा | मागणी रक्कम | वाहनाचे वर्णन | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १) श्री. जावेद महम्मद मुजावर रा. ८ / २४७, शहापुररोड, विक्रमनगर,इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर, (कर्जदार) २) श्री. सुभाष रघुनाथ पवार रा. २५/२९५, शहापुर, नवीन नाका, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.–कोल्हापुर (जामीनदार),३) श्री. संजय यशवंत चौगुले रा. १८/७९४, जिव्हेश्वर मंदिर जवळ, भोने माळ, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि. कोल्हापुर–(जामीनदार) (कर्जखाते नं. पी.एस.एम.टी.ई.एम.आय.–९८६) | मुख्य | सदर कर्जाची कर्जदार व जामिनदार यांचेकडून दि.३०/०६/२०२६ रोजी पर्यंतची येणे बाकी रक्कम रु.८,५१,५९८– व दि.०१/०७/२०२६ पासुन त्यावर करारातील व्याज दराप्रमाणे होणारे पुढील व्याज व खर्च आदी. | "VOLKSWAGEN Vento Four wheeler Car 1.6 MPI MT highline Blue Colour Bearing Registration No. MH09 EK-6622, Mfg. year June-2017, Engine No.CLS434648, Chassis No.MEXM156070T053085, Fuel-Petrol, Engine CC-1600cc, Cylinder: 4 No.s which is owned by borrower Mr. Javed Mahamad Mujawar." | रू. ४,००,०००/– |

विक्री निविदा, अटी व शर्तीसह बँकेच्या प्रधान कार्यालयाच्या व बँकेच्या मुख्य शाखा येथे वरील पत्त्यावर उपलब्ध होतील. इच्छुक खरेदीदारांनी निविदा, शर्ती व अटीनुसार शुल्क आणि मागणी रक्कमेच्या १०% बयाणा रक्कमेचा मुख्य शाखा येथील डिमांड ड्राफ्ट / पे – ऑर्डरसह सिल बंद लखोट्यातून आपल्या निविदा द्याव्यात. निविदा रक्कम ही सदर राखीव किंमतीपेक्षा जास्त असली पाहीजे.. तसेच सदर वरील नमूद वाहन स्वतःच्या नावावर करुन घेण्याकरिता येणारा सर्व खर्च हा वाहन खरेदी करणार यांनीच करणेचा आहे. त्याची कोणतीही जबाबदारी बँकेची असणार नाही. सदर वाहनाची पाहणी प्राधिकृत अधिकारी व जनरल मॅनेजर श्री.दिपक वसंत पाटील (मो.नं. ९६६५०४१७६८) यांच्या पुर्व परवानगीने दि. १७/०८/२०२६ इ. पर्यत कार्यालयीन वेळेत करता येईल. वरीलप्रमाणे निविदा प्रधान कार्यालयात दिनांक १८/०८/२०२६ इ. अखेर सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत स्विकारल्या जातील आणि तारीख १९/०८/२०२६ इ. रोजी दुपारी २ वाजता प्रधान कार्यालय इचलकरंजी येथे उघडल्या जातील. अधिक माहितीसाठी बँकेच्या प्राधिकृत अधिकारी व जनरल मॅनेजर यांना मो.नं. ९६६५०४१७६८ वर संपर्क साधावा.

तारीख : १७/०७/२०२६.

**सही/–**
**जनरल मॅनेजर व प्राधिकृत अधिकारी**
कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँक लि.,



## इंग्लंडची ऑफर फ्लॉवरनी धुडकावली

### मुख्य प्रशिक्षपदाच्या शर्यतीत नाही

लंडन,ता.१७ –

**ब्रेंडन मॅक्युलमने इंग्लंडच्या कसोटी संघाचे मुख्य प्रशिक्षपद सोडल्यानंतर रिक्त जागेवर अनेक नावांची चर्चा रंगली. त्यात अँड फ्लॉवर यांचेही होते, परंतु रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे मुख्य प्रशिक्षक फ्लॉवर यांनी ही ऑफर नाकारली आहे.**

मी जिथे आहे, तिथे समाधानी आहे, असे स्पष्ट मत फ्लॉवर यांनी इंग्लंडच्या मुख्य प्रशिक्षकाच्या शर्यतीतून स्वतःला बाजूला केले. या पदासाठी फ्लॉवर यांची इंग्लंड क्रिकेट बोर्ड आणि व्यवस्थापकीय संचालक रॉब की यांच्याशी चर्चा झाली होती.मॅक्युलम यांच्या कार्यकाळातील बेझबॉल स्टाईलमध्ये इंग्लंडला फार यश मिळवता आले नाही. त्यामुळेच मॅक्युलमने राजीनामा दिला. फ्लॉवर यांनी यापूर्वी २००९ ते २०१४ या कालावधीत इंग्लंड संघासोबत काम केले आहे. त्यांच्या कार्यकाळात इंग्लंडने होम व अवे अॅशेस मालिका जिंकली, तर भारत दौऱ्यावरही विजय मिळवला.टी-२० लीगमध्ये त्यांनी आरसीबीला मार्गदर्शन करताना सलग दोन आयपीएल जेतेपद जिंकून दिली.

मॅक्युलमने पद सोडल्यानंतर भारताचा माजी कर्णधार राहुल द्रविड याचे नाव अचानक समोर आले. त्याच्यासह ग्लॅमॉर्गनचे मुख्य प्रशिक्षक रिचर्ड डॉसन, श्रीलंकेचा दिग्गज कुमार संगकारा, इंग्लंड लायन्सचा कोच अँड्यू फ्लिंटॉफ, पाकिस्तानचे मुख्य प्रशिक्षक माइक हेसन आणि ऑस्ट्रेलियाचा माजी प्रशिक्षक जस्टीन लँगर यांचेही नाव चर्चेत आहे.



## राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत इन्शा बाणदारला सुवर्ण पदक

शिरढोण,ता.१७ (प्रतिनिधी)–

**राज्यस्तरीय नेमबाजी स्पर्धेत ओपन साईट एअर रायफल प्रकारामध्ये सर्वाधिक गुण मिळवून शिरढोण (ता.शिरोळ) येथील इन्शा सुहेल बाणदार हिने सुवर्णपदक प्राप्त केले. ती मँचेस्टर सिटी शूटिंग अकॅडमी इचलकरंजीची खेळाडू असून रमजानशेठ बाणदार विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन सुहेल दस्तगीर बाणदार यांची कन्या आहे.**

नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र एअर गण स्पर्धेत इन्शा बाणदार हिने ओपन साईट एअर रायफल प्रकारामध्ये सब युथ गटात ४०० पैकी ३३४ गुण मिळवून सुवर्णपदक पटकावले. तसेच अकॅडमीच्या प्रियांशु काब्रा हिने एअर पिस्टल प्रकारामध्ये,पीप साईट एअर रायफलमध्ये अभय कोरवी याने, प्रज्ञा बद्दूर, सीनियर शुभम गायकवाड, जितेश माळी, पीप साईट रायफल सब युथमध्ये आरव माने, अमय जगताप, अन्वी थोरवडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. सर्व खेळाडूंना प्रशिक्षक विनय पाटील, बापू भोईया, जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

# लॉड्‌र्सवर उद्या रंगतदार लढत

### भारत – इंग्लंडसाठी ठरणार करो या मरो !

लंडन,ता.१७ –

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना १९ जुलै ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर खेळवला जाणार आहे.**

मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने दमदार विजय मिळवत १-० अशी आघाडी घेतली होती. मात्र, दुसऱ्या वनडेत इंग्लंडने ४ विकेट्स राखून विजय मिळवत मालिकेत १-१ अशी बरोबरी साधली. त्यामुळे आता दोन्ही संघांसाठी हा सामना करो या मरो चा ठरणार आहे.

पहिल्या वनडेत भारताने ६ विकेट्स राखून विजय मिळवला होता. अक्षर पटेलने ४ विकेट्स घेतल्या, तर शुभमन गिल, अक्षर पटेल आणि वॉशिंग्टन सुंदर यांनी अर्धशतके झळकावत संघाला विजय मिळवून दिला होता.मात्र, दुसऱ्या वनडेत भारतीय फलंदाजांनी निराशा केली. विराट कोहली (६५) आणि श्रेयस अय्यर यांच्या अर्धशतकांमुळे भारताने २३३ धावा केल्या. प्रत्युत्तरात जो रूटच्या नाबाद ९९ धावांच्या जोरावर इंग्लंडने लक्ष्य सहज पार करत मालिका १-१ अशी बरोबरीत आणली. त्यामुळे आता लॉड्‌र्सवरील सामना मालिकेचा विजेता ठरवणार आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसरा वनडे सामना भारतीय वेळेनुसार दुपारी ३:३० वाजता सुरू होणार आहे. नाणेफेक दुपारी ३ वाजता होईल.

**भारत मालिकेवर नाव कोरण्यासाठी मैदानात उतरणार आहे, तर इंग्लंड घरच्या मैदानावर विजय मिळवत मालिका जिंकण्याचा प्रयत्न करेल. त्यामुळे लॉड्‌र्सवर क्रिकेट चाहत्यांना रंगतदार लढत पाहायला मिळण्याची शक्यता आहे.**



### २०२७ च्या वन डे वर्ल्ड कपमधून

# रोहित शर्माला डच्चू ?

### चॅम्पियन्स ट्रॉफीनंतरच निर्णय घ्यायला हवा होता : आर. अश्विन

नवी दिल्ली,ता.१७ –

**भारत-इंग्लंड वन डे मालिकेनंतर रोहित शर्माची गरज संपणार आहे. बीसीसीआयच्या निवड समितीने तसा स्पष्ट संदेश हिटमॅनला दिला आहे आणि हीच गोष्ट भारताचा फिरकीपटू आर. अश्विन याला खटकली आहे. निवड समिती प्रमुख अजित आगरकर आणि त्याच्या टीमला रोहित शर्मा २०२७ च्या वन डे वर्ल्ड कप स्पर्धेसाठी योग्य नसल्याचे वाटत आहे. हा निर्णय त्यांनी २०२५ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतरच रोहितला सांगायला हवा होता,असे आर. अश्विनने सांगितले.**

रोहितच्या जागी यशस्वी जैस्वालला संधी मिळण्याची शक्यता अधिक आहे. त्याने त्याच्या पहिल्या ७ वन डे सामन्यांत २ शतके झळकावली होती, परंतु रोहित संघात असल्याने त्याला नियमित संधी मिळाली नाही. आता त्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

आर. अश्विन म्हणाला, मला या भारतीय संघाबद्दलच अडचण आहे. आपण सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये दक्षिण आफ्रिकेला जाणार आहोत. यशस्वी जैस्वाल जोरदार प्रयत्न करत आहे, हे मला माहित आहे. पण, एक निवडकर्ता, प्रशिक्षक, कर्णधार किंवा निर्णय घेणारी जी कोणीही व्यक्ती असेल. जर तुम्हाला या खेळाडूला २०२७ चा वर्ल्ड कप खेळवणार नाही, हे माहित होते आणि हे तुम्ही आधीच ठरवले होते, तर ते त्याला चॅम्पियन्स ट्रॉफीनंतरच सांगायला हवे होते.रोहित आणि विराट काही खराब खेळलेले नाहीत. दक्षिण आफ्रिकेतील २०२७ च्या वर्ल्ड कप स्पर्धेला फक्त १०-१२ महिने उरले असताना, आपण ही गोष्ट ऑगस्ट २०२६ पर्यंत का येऊ दिली? माझा हा प्रश्न आहे. विराट व रोहित, यांच्यासारख्या खेळाडूंचा आदर केलाच पाहिजे. किमान त्यांच्यासोबत योग्य संवाद साधायला हवा.



#### रोहितसाठी अखेरचा सामना?

भारत आणि इंग्लंड यांच्यात लॉर्ड्स येथे होणारा तिसरा आणि अखेरचा सामना निर्णायक ठरणार आहे. या सामन्यापूर्वी माजी कर्णधार आणि सलामीवीर रोहित शर्माच्या संभाव्य निवृत्तीची भारतीय क्रिकेट वर्तुळात सर्वाधिक चर्चा सुरू आहे.तिसरा एकदिवसीय सामना रोहित शर्मासाठी अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना ठरू शकतो, अशी शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.२०२७ च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या दृष्टीने भारतीय निवड समितीने आतापासूनच नव्या खेळाडूंना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र भारतीय क्रिकेट नियामक मंडळाकडून यासंदर्भात अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

#### रोहित लॉड्‌र्समध्ये मोठी खेळी करू शकतो

रोहित शर्माच्या निवृत्तीच्या अटकळांदरम्यान, भारतीय प्रशिक्षक सितांशु कोटक म्हणाले, रोहित ना दबावाखाली आहे, ना संघर्ष करत आहे. तो लॉड्‌र्समध्ये मोठी खेळी खेळू शकतो. एक दिवसापूर्वी एका अहवालात दावा करण्यात आला होता की, लॉड्‌र्स वनडे रोहित शर्माच्या कारकिर्दीतील शेवटचा वनडे असेल. त्यानंतर त्याच्या निवृत्तीच्या अटकळीही सुरू झाल्या.

कोटक म्हणाले, आजही असे वाटत होते की, रोहित मोठी खेळी खेळेल, पण तसे होऊ शकले नाही. पिचवर चेंडूला असामान्य उसळी होती. रोहित जे शॉट्स सहसा सहजपणे खेळतो, त्यात त्याला आरामदायक वाटले नाही. असे अनेक फलंदाजांसोबत होते. तुम्ही लॉड्‌र्समध्ये रोहित शर्माची पूर्णपणे वेगळी खेळी पाहू शकता.

## विश्वचषकासाठी महिला हॉकी संघ जाहीर

### सलीमाकडे धुरा

नवी दिल्ली,ता.१७ –

**बेल्जियम आणि नेदरलँड्स येथे होणाऱ्या एफआयएच महिला हॉकी विश्वचषक २०२६ साठी हॉकी इंडियाने शुक्रवारी २० सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. अनुभवी मिडफिल्डर सलीमा टेटे हिच्याकडे संघाचे कर्णधारपद सोपवण्यात आले आहे. मुख्य प्रशिक्षक सजॉर्ड मारिजन यांनी संघ निवडला आहे.**

महिला हॉकी विश्वचषकाचे आयोजन १५ ते ३० ऑगस्ट २०२६ दरम्यान बेल्जियम आणि नेदरलँड्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे. भारतीय संघ सध्या बंगळुरू येथील राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरात तयारी करत आहे.भारतीय संघाने गेल्या महिन्यात न्यूझीलंडमध्ये झालेल्या एफआयएच



नेशन्स कप स्पर्धेत शानदार कामगिरी करत अपराजित राहून विजेतेपद पटकावले होते. विश्वचषकासाठी निवडलेल्या संघात त्या कामगिरीने प्रभावित झालेल्या अनेक खेळाडूंना स्थान देण्यात आले आहे.

विश्वचषकात भारताचा समावेश पूल-डीमध्ये चीन, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यासोबत करण्यात आला आहे. भारतीय संघ आपले सर्व साखळी सामने नेदरलँड्समधील आम्स्टेलव्हीन येथील वागेनर हॉकी स्टेडियमवर खेळणार आहे. भारत आपल्या मोहिमेची सुरुवात १६ ऑगस्ट रोजी चीनविरुध्द करेल. १८ ऑगस्ट रोजी दक्षिण आफ्रिका आणि २० ऑगस्टला इंग्लंडविरुध्द सामना खेळला जाईल.

**भारतीय संघ :** गोलरक्षक : सविता, बिचू देवी खारीबाम, **बचावपटू :** इशिका चौधरी, सुशीला चानू पुखरामबम, लालथांतलुआंगी, ज्योती, शिल्पी डबास,**मिडफिल्डर :** सलीमा टेटे (कर्णधार), निक्की प्रधान, साक्षी राणा, सुनेलिता टोप्पो, नेहा, दीपिका सोरेंग, **फॉरवर्ड :** लालरेमसियामी, रुतुजा दादासो पिसाळ, नवनीत कौर, दीपिका, इशिका, बलजीत कौर, ब्यूटी डुंगडुंग.

## मनजोत कार्लाला कोलंबोत अटक

कोलंबो,ता.१७ –

**भारताच्या १९ वर्षांखालील वर्ल्ड कप विजेत्या संघातील खेळाडू आणि लंका प्रीमिअर लीगमधील जाफना किंग्स संघाचा सहमालक मनजोत कार्ला याला कोलंबो येथील फाईव्ह स्टार हॉटेलमधून अटक करण्यात आली आहे. श्रीलंका पोलिसांनी मनजोतवर खेळाडूंना मॅच फिक्सिंग करण्यासाठी विचारणा केल्याचा आरोप लावला आहे.**



२०२६ च्या उद्घाटन सामन्याच्या काही तास आधी, क्रीडा क्षेत्रातील गुन्हे प्रतिबंधक विशेष तपास पथकाने ही कारवाई केली. हॉटेलमध्ये कार्ला खेळाडूंना मॅच फिक्सिंगसाठी ९.५ मिलियन देण्याचा प्रयत्न करत होता.

पोलिसांच्या तपासात मनजोत याने १० दिवसांपूर्वी खेळाडूंना फिक्सिंग संदर्भात विचारणा केली होती आणि त्यानंतरच्या पुढील तपासात मनजोतचे नाव समोर आले. त्याला कोलंबो दंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

मनजोत हा २०१८ च्या १९ वर्षांखालील वर्ल्ड कप विजेत्या संघातील सदस्य होता. त्या संघाचे नेतृत्व पृथ्वी शॉ याने केले होते. शुभमन गिल, अर्शदीप सिंग व शिवम मावी यांचाही त्या संघात समावेश होता. ऑस्ट्रेलियाविरुध्दच्या फायनलमध्ये त्याने नाबाद शतक झळकावून जेतेपदात सिंहाचा वाटा उचलला होता. आयपीएल २०२६च्या सुरुवातीला त्याने लंका प्रीमिअर लीगमधील जाफना किंग्स फ्रँचायझीच्या मालकी हक्क विकत घेतले.

## सर गार्फिल्ड सोबर्स यांचे निधन

### क्रीडा जगतावर शोककळा

जमैका,ता.१७ –

**वेस्ट इंडिजचे महान अष्टपैलू खेळाडू आणि क्रीडा इतिहासातील सर्वोत्कृष्ट व्यक्तींपैकी एक असलेले सर गार्फिल्ड सोबर्स यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या ९० व्या वाढदिवसाच्या केवळ दोन आठवडे आधीच त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाच्या बातमीने क्रीडा जगतात शोक व्यक्त केला जात आहे.**



सर गार्फिल्ड सोबर्स हे १९५४ ते १९७४ या काळात जवळपास दोन दशके वेस्ट इंडिज क्रिकेट संघाकडून खेळले. सोबर्स यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते एकाच वेळी जागतिक दर्जाचे फलंदाज, एक घातक वेगवान गोलंदाज, एक उत्कृष्ट फिरकी गोलंदाज आणि एक विलक्षण क्षेत्ररक्षक होते. त्यांनी वेस्ट इंडिजचे ९३ कसोटी सामन्यांमध्ये प्रतिनिधित्व केले. या काळात त्यांनी २६ शतके आणि ३० अर्धशतकांसह ५७.७८ च्या अविश्वसनीय सरासरीने ८०३२ धावा केल्या. त्यांच्या गोलंदाजीतील पराक्रमाचीही सर्वत्र दखल घेतली गेली.

## राज्यस्तरीय स्पर्धेवर इचलकरंजीच्या खेळाडूंचा ठसा

### ५ सुवर्ण, १ रौप्य व १ कांस्य पदकांची कमाई

इचलकरंजी,ता.१७ –

**महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत इचलकरंजीच्या मँचेस्टर तायक्वांदो क्लबच्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याचा ठसा उमटवत राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले.**

अहिल्यानगर येथे झालेल्या राज्यस्तरीय महाराष्ट्र ओपन तायक्वांदो स्पर्धेत मँचेस्टर तायक्वांदो क्लबच्या खेळाडूंनी ५ सुवर्ण, १ रौप्य आणि १ कांस्य अशी एकूण ७ पदकांची कमाई करत इचलकरंजीच्या क्रीडा क्षेत्राची मान उंचावली.



स्पर्धेतील पी-वी गटात मनस्वी चंदुरे व श्रीजा खारगे यांनी सुवर्णपदकांची कमाई केली, तर अद्विक माळी याने कांस्यपदक पटकावले.सब-ज्युनियर गटात आरोही रेडेकर, मिझबा शेख आणि वेदांश धूत यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर सुवर्णपदकांवर नाव कोरले.कॅडेट गटात ईश्वरी गोज्जी हिने रौप्यपदक पटकावत असोसिएशनच्या यशात मोलाची भर घातली.याशिवाय सान्वी सहानी, असद जमखंडी, युसुफ शेख, सिद्धीद खाडे आणि प्रविण माणिगप्पागोल यांनीही स्पर्धेत सहभाग घेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन घडविले.

या सर्व खेळाडूंना प्रमुख प्रशिक्षक विश्वा यम्मी, प्रशिक्षक इर्शाद शेख आणि सुरज साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल सर्व पदक विजेते, सहभागी खेळाडू, प्रशिक्षक आणि पालकांवर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, मँचेस्टर तायक्वांदो क्लब (इचलकरंजी)ने राज्यस्तरावर आणखी एक उल्लेखनीय कामगिरी नोंदवत आपल्या यशाची परंपरा कायम राखली आहे.

## गेले सांगून ज्ञाना तुका, झाला उशीर तरीही शिका!

### पालखी मार्गावर साक्षरतेचा जागर

हेरले,ता.१७ (प्रतिनिधी)–

**संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गावर तरडगाव (जि. सातारा) येथे साक्षरता वारीच्या चमूने साक्षरतेच्या घोषणा, माहिती पत्रकांचे वाटप, भारुड, पोवाडा व साक्षरता गीते गायन, मुलाखती, असाक्षरांची नोंदणी अशा उपक्रमांनी जनजागृती केली. कोल्हापूर - कोकण विभागीय मंडळाचे अध्यक्ष तथा उल्लासचे विभागीय समन्वयक राजेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत साक्षरता गीते व घोषणांच्या निनादात पथकाने वारकऱ्यांना आपलेसे केले. वारकऱ्यांशी समरस होत पथकाने फुगडी खेळण्याचाही आनंद घेतला.**




मागील तीन वर्षापासून योजना शिक्षण संचालनालय पुणे यांनी संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्या समवेत जनजागृतीसाठी साक्षरता वारीचा उपक्रम सुरू केला आहे. या दोन प्रमुख पालखी सोहळ्यात राज्यभरातून सर्व जिल्ह्यातील वारकरी मोठ्या संख्येने सहभागी असतात, त्यात असाक्षरांचे प्रमाणही मोठे असते. या पथकामार्फत भारुड,साक्षरता गीते,पोवाडा गायन,शाळा स्तरावर कार्यक्रम, पत्रक वाटप, पालखी मार्गावरील गावोगावी भित्तीपत्रक चिटकवणे, प्रत्यक्ष दिंडीत जनजागृती, मुलाखती, शिक्षणाचे महत्व यावर चर्चा असे उपक्रम घेण्यात येत आहेत.नागसेन साबळे (बुलढाणा) हे स्वयंसेवक वयस्कर आई-वडिलांसह सहकुटुंब या साक्षरता पथकासोबत सामील झाले आहेत. त्यांच्या उत्तम सादरीकरणाने पालखी सोहळ्यातील वारकरी साक्षरता वारीकडे आकृष्ट होत आहेत.गोमू संगतीनं माझ्या तू शिकशील काय..यासारख्या गाण्यांवर वारकरी या पथकासोबत ठेका धरत आहेत.तर,जन जन साक्षर.. गेले सांगून ज्ञाना तुका,झाला उशीर तरीही शिका..अक्षर कळे,संकट टळे.. अंगठा नको सही हवी.. ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा.. अशा साक्षरतेच्या घोषणांनी लक्ष वेधले.

## राधानगरी ६६ टक्के भरले!

शिरगाव, ता. १७ (प्रतिनिधी)–

**राधानगरी धरण पाणलोट क्षेत्रासह नागरी भागात गेले दोन दिवस पावसाचा जोर वाढला आहे. त्यामुळे लक्ष्मी तलाव (राधानगरी धरण)च्या पाणी पातळीत वाढ झाली असून धरण ६६ टक्के भरले आहे.**



तालुक्यात सुमारे आठवडभराच्या विश्रांतीनंतर गुरुवारी पावसाने पुन्हा हजेरी लावली. दरम्यान गुरुवार रात्री व शुक्रवारी दिवसभर राधानगरी धरण परिक्षेत्रासह नागरी भागात दमदार पाऊस सुरु आहे. धरण परिक्षेत्रात गेल्या आठ तासात ५८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

एकदरीतच तालुक्यात पावसाने बरेच दिवस ओढ दिल्याने रखडलेल्या शेती कामांना पुन्हा वेग आला आहे.तसेच पावसाअभावी रोप लागण केलेल्या भात पिकांच्या जमिनीत भेगा पडून पिक सुकून चालले होते. या पिकासाठी हा पाऊस पोषक ठरला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे.